नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com








* वर्ष ५२ * अंक १४० * * अकोला * रविवार, दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


# दोन अपघातात ९ ठार

## क्रूझर - ट्रॅक्टरच्या अपघातात पाच भाविकांचा मृत्यू : कारने दुचाकींना चिरडत घेतला चौघांचा बळी

■ वृत्तसंस्था
धाराशिव/ठाणे, दि. २२ :
धाराशिव आणि ठाणे येथे झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला.



धाराशिवमध्ये शनिवारी सकाळी झालेल्या एका भीषण अपघातात नळदुर्ग येथे देवदर्शनाला जाणाऱ्या ५ भाविकांचा बळी गेला. टायर फुटल्यामुळे भरधाव वेगातील जीप एका ट्रॅक्टरला धडकल्यामुळे ही दुर्घटना घडली. या घटनेत इतर ८ जण गंभीर जखमी झालेत. त्यापैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

माहितीनुसार, धाराशिव जिल्ह्यातील सोलापूर - हैदराबाद महामार्गावरून शनिवारी सकाळी एक क्रूझर जीप भरधाव वेगात जात होती. या गाडीतील प्रवाशी सोलापूरहून नळदुर्ग येथे देवदर्शनासाठी जात होते. ही क्रूझर धाराशिवच्या अणदूर परिसरात आली असताना अचानक तिचे टायर फुटले.

यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून क्रूझर रस्त्यात उभ्या एका ट्रॅक्टरला धडकली. त्यानंतर ती रस्त्यावरच उलटली. या घटनेत ५ जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांत ३ महिलांचा समावेश आहे. क्रूझरमधील इतर ८ जणही या अपघातात गंभीर जखमी झालेत. त्यांना उपचारासाठी सोलापूर स्थित शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

क्रूझरने ट्रॅक्टरला धडक दिल्यानंतर जोराचा आवाज झाला. आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळाच्या दिशेने धाव घेतली. त्यांनी क्रूझर सरळ करून त्यातून मृतदेह व जखमींना बाहेर काढले. सर्व मृत व जखमी दक्षिण उळे, सोलापूर येथील रहिवासी असल्याची माहिती आहे. हे सर्वजण क्रूझरमध्ये दाटीवाटीने बसून नळदुर्गला देवदर्शनासाठी जात होते. पण रस्त्यातच काळाने घाला घातली.

दुसऱ्या एका घटनेत एका कारने ठाण्याच्या अंबरनाथ येथील एका उड्डाणपुलावर ४ - ५ दुचाकींना ठोकर मारली. अपघातग्रस्त कार चालकाला हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर कारने विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांना धडक मारली. या दुर्घटनेत ४ जण ठार झाले असून, ३ जण जखमी झालेत.

ही संपूर्ण घटना उड्डाणपुलालगत असलेल्या सीसीटीव्हीमध्ये रेकॉर्ड झाली आहे. व्हिडिओत दिसून येत आहे की, कार दुचाकींना धडकल्यानंतर एक दुचाकीस्वार हवेत उडून काही फूट अंतरावर जाऊन उड्डाणपुलावरून खाली पडतो. सुदैवाने खालून रस्त्याने जाणाऱ्या कुणालाही दुखापत होत नाही.

अपघातानंतर उड्डाणपूल व रस्ता या दोन्ही ठिकाणी गर्दी जमा होते. त्यानंतर जखमींना ३ रुग्णालयात हलवण्यात येते. जखमींवर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती गभीर असल्याचे सांगण्यात येते. कार चालकाचाही यात मृत्यू झाला.

# भरधाव कारच्या धडकेत दोन महिलांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २२ :
नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर आज सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला. भरधाव वेगात येणाऱ्या क्रेटा कारने दोन्ही महिलांना मागून जोरदार धडक दिली.





प्राप्त माहितीनुसार, एमएच ०५ एफजी ४७७६ क्रमांकाची क्रेटा कार नागपूरकडून जबलपूरच्या दिशेने प्रचंड वेगात जात होती. त्याचवेळी कांद्री शिवारातील मंदा दिलीप उपासे (४९) आणि प्रमिला राजेश शेंद्रे (४१), दोन्ही रा. कांद्री माईन या दोन महिला शेतात कामासाठी महामार्गाच्या खालच्या बाजूने जात होत्या.

अचानक भरधाव कारने त्यांना जबर धडक दिली. धडक इतकी भीषण होती की महिला हवेत उडून खाली पडल्या आणि घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर कारचालकाने वाहन खुमारी टोल प्लाझा परिसरात सोडून दिले व तो पसार झाला. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी चालकाला अटक केली आहे.

अपघातानंतर संतप्त नागरिकांनी महामार्गावरील एका बाजूचा मार्ग बंद केला. जवळपास दीड तास वाहतूक कोंडी निर्माण झाली. नागरिकांनी टोल परिसरात उभ्या असलेल्या अपघातग्रस्त वाहनाला आग लावण्याचा प्रयत्न केला; मात्र काही जागरूक नागरिकांनी वेळेतच ती आग विझवली.

स्थानिकांनी या घटनेला परिसरातील पेट्रोल पंपालाही जबाबदार धरले असून पोलीस आणि टोल व्यवस्थापनाला तात्काळ घटनास्थळी पाचारण करण्यात आले.

उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते, पोलीस निरीक्षक अरविंद कुमार कतलाम आणि टोल व्यवस्थापनाने नागरिकांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

**नागरिकांच्या प्रमुख मागण्या**

महामार्गावर स्ट्रीट लाईटची व्यवस्था करावी, सर्व्हिस रोडची तातडीने निर्मिती करण्यात यावी, परिसरातील वादग्रस्त पेट्रोल पंप मालकावर कारवाई कारवाई करावी, अनधिकृतपणे तोडण्यात आलेले दुभाजक पुनर्स्थापित करावेत, अशा मागण्या नागरिकांनी केल्या आहेत. दोन्ही मृतदेह उपजिल्हा रुग्णालय रामटेक येथे पाठविण्यात आले आहेत. पुढील तपास रामटेक पोलीस करीत आहेत.

## थोडक्यात..

### काश्मीरमध्ये रचला होता दिल्ली बॉम्बस्फोटाचा कट

■ फरिदाबाद : दिल्ली बॉम्बस्फोट घडवणाऱ्या व्हाईट कॉलर फरीदाबाद मॉड्यूलचे नियोजन अत्यंत गुंतागुंतीचे होते. तपास यंत्रणांनी काश्मीरपासून अल-फलाह विद्यापीठ आणि नूह व्हाया दिल्लीपर्यंतचा संपूर्ण कट उलगडला आहे. फरिदाबाद मॉड्यूलच्या संपर्कात आलेल्या १,००० हून अधिक व्यक्तींची चौकशी केल्यानंतर, राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) धक्कादायक माहिती उघड केली आहे.



फरिदाबाद मॉड्यूल काश्मीरमध्ये स्थापित केले गेले आणि धौजमधील अल-फलाह विद्यापीठ कॅम्पसला त्याचे नियोजन केंद्र बनवले. मॉड्यूलच्या निर्मितीदरम्यान डॉक्टरांना सहभागी करून घेण्याची योजना अंतिम करण्यात आली.

### खुनाच्या आरोपीला घातल्या गोळ्या

■ बेगुसराय : बिहारमध्ये नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर पोलिसांनी गुन्हेगारांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. बेगुसरायमध्ये स्पेशल टास्क फोर्स (एसटीएफ) आणि जिल्हा पोलिसांनी एका कुख्यात गुन्हेगाराला गोळ्या घातल्या. त्याच्यावर सरपंचाच्या मुलाची हत्या केल्याचा आरोप आहे. ही घटना साहेबपूर कमल पोलिस स्टेशन परिसरातील शालीग्राम आणि मल्हीपूर गावांच्या परिसरात घडली. जखमी गुन्हेगाराचे नाव शिवदत्त राय (२७) आहे. जो तेघरा पोलिस स्टेशन परिसरातील बनहरा गावातील रहिवासी राजकिशोर राय यांचा मुलगा आहे. घटनास्थळावरून पोलिसांनी मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि रोख रक्कम जप्त केली आहे.



### एसआयआरमध्ये चुकीची माहिती दिल्यास १ वर्ष शिक्षा

■ रायपूर : छत्तीसगडमध्ये मतदार यादीची विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने एक महत्त्वाचे निर्देश जारी केले आहेत. फॉर्म भरताना खोटी माहिती देणाऱ्या किंवा खोटी कागदपत्रे जोडणाऱ्या मतदारांना एक वर्षापर्यंत तुरुंगवास आणि दंड होऊ शकतो. निवडणूक आयोगाने मतदारांना एसआयआरबाबत सतर्क केले आहे, असे म्हटले आहे की बीएलओ फॉर्म भरताना कोणताही ओटीपी विचारत नाहीत. तसेच निवडणूक आयोगाचा कोणताही कर्मचारी मतदाराकडून फोनवरून ओटीपी मागत नाही. निवडणूक आयोगाने मतदारांना सल्ला दिला आहे की त्यांनी वैयक्तिक माहिती विनंती करणाऱ्या कोणालाही उघड करू नये. जर असे घडले तर ते पोलिस तक्रार दाखल करू शकतात. एसआयआर फॉर्म भरण्याची अंतिम मुदत वाढवण्याची मागणी एका संघटनेने केली आहे.

# शिंदेंचे ३५ आमदार फुटणार?

## ठाकरे गटाच्या दाव्याने राज्यात खळबळ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेचे तब्बल ३५ आमदार भाजपत जाणार असल्याचा मोठा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने केला आहे.



एकनाथ शिंदे यांनी जे पेरले तेच उगवले. भाजपला ते आता नकोसे झालेत. त्यामुळे महाराष्ट्रात त्यांना त्यांची जागा दाखवण्याचा लोट्स कार्यक्रम सुरू झाला आहे, असे ठाकरे गटाने म्हटले आहे. भाजपच्या कथित फोडाफोडीच्या राजकारणाला कंटाळलेले शिंदे सध्या नाराज असताना ठाकरे गटाने हा दावा केल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे.

ठाकरे गटाने म्हटले आहे की, महाराष्ट्रात सध्या जे नाराजी महानाट्य सुरू आहे, ते गांभीर्याने घेण्याची गरज नाही. उपमुख्यमंत्री शिंदे दिल्लीतील त्यांचे पक्षप्रमुख अमित शहांना भेटले आणि त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस व भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांची तक्रार केली, हे लोक आमचा पक्ष फोडत आहेत. चव्हाण पैशांचा वापर करून आमचे पदाधिकारी विकत घेत आहेत. हे आम्ही सहन करणार नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपने शिंदे यांची अनेक माणसे फोडली. युतीच्या राजकारणात हे शोभत नाही. भारतीय जनता पक्षाने हे असे केले तर आमचा पक्ष टिकणार नाही अशी शिंदे व त्यांच्या लोकांची चिंता आहे. रवींद्र चव्हाण हे ठाणे जिल्ह्यातील आहेत. त्यामुळे ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी असे म्हणायला हवे.

रवींद्र चव्हाण भाजपचे प्रदेशाध्यक्ष झाल्यापासून त्यांनी ठाणे जिल्ह्यातील शिंदे गटास खिंडार पाडले. शिंदे यांनी जी माणसे पाच-पंचवीस लाखांना विकत घेतली, त्यातील बरीच माणसे चव्हाण यांनी होलसेलात विकत घेतली. म्हणजे शिंदे यांचाच मार्ग चव्हाण यांनी अवलंबला.उपमुख्यमंत्री शिंदे या घडामोडींमुळे नाराज आहेत, पण त्यांच्या नाराजीची दखल कोणी घ्यायला तयार नाही असेही ठाकरे गटाने म्हटले आहे.

# शपथविधी सोहळ्याला ७ देशांचे चीफ जस्टिस येणार

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २२ :
न्यायमूर्ती सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी देशाचे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतील. राष्ट्रपती भवनात होणाऱ्या या शपथविधी समारंभात ब्राझीलसह सात देशांचे मुख्य न्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश उपस्थित राहतील.



या समारंभाला भूतान, केनिया, मलेशिया, मॉरिशस, नेपाळ आणि श्रीलंकेचे मुख्य न्यायाधीश त्यांच्या कुटुंबीयांसह उपस्थित राहतील.
सध्याचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती गवई यांचा कार्यकाळ २३ नोव्हेंबर रोजी संपत आहे. सूर्यकांत ९ फेब्रुवारी २०२७ रोजी निवृत्त होतील.

# जी २० शिखर परिषदेत मेलोनी - मोदी भेट



■ वृत्तसंस्था,केप टाउन, दि. २२ :
शनिवारी जोहान्सबर्ग येथे झालेल्या जी २० शिखर परिषदेत पंतप्रधान मोदींनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आणि जागतिक नेत्यांची भेट घेतली.
बैठकीदरम्यान त्यांनी ब्राझीलचे अध्यक्ष लुला दा सिल्वा यांना मिठी मारली. त्यानंतर मोदींनी शिखर परिषदेच्या पहिल्या सत्रात भाषण दिले, ज्यात जागतिक आव्हानांवर भारताचा दृष्टिकोन मांडला.
जागतिक विकासाच्या जुन्या मानकांचा पुनर्विचार करण्याचे आवाहन मोदींनी केले.

# काँग्रेसने स्थापन केली जागावाटपासाठी समिती



■ वृत्तसंस्था, चेन्नई, दि. २२ :
२०२६ च्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेस पक्षाने त्यांच्या मित्रपक्ष द्रमुकसोबत जागावाटपाची औपचारिक वाटाघाटी करण्यासाठी पाच सदस्यांची समिती स्थापन केली आहे. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निर्देशानुसार ही समिती स्थापन करण्यात आली आहे आणि ती दोन्ही पक्षांमध्ये युतीच्या आराखड्यांबाबत चर्चा करेल.

तामिळनाडू आणि पुद्दुचेरीचे काँग्रेस प्रभारी गिरीश चोडणकर यांची समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. टीएनसीसीचे अध्यक्ष के. सेल्वापेरुंथागाई, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते एस. राजेश कुमार आणि इतर दोन सदस्य देखील समितीचा भाग आहेत. काँग्रेस २०२६ च्या निवडणुका अभिनेता विजयचा नवीन पक्ष टीव्हीके सोबत युती करून लढवू शकते. परंतु, ज्येष्ठ काँग्रेस नेते पी. चिदंबरम यांनी या अटकळी फेटाळून लावल्या आहेत.


करिअरच्या सुवर्णसंधी!

**महासागर**

विदर्भाचे प्रसिद्ध मराठी दैनिक, गरजू व्यक्तींसाठी सुवर्णसंधी!

**तत्काळ भरती - नवी संधी**

महासागर, विदर्भाचे प्रसिद्ध मराठी दैनिक, ५५ वर्षांचा अनुभव असलेले, विदर्भ, मुंबई, पालघर आणि नाशिक येथे प्रकाशित होणारे, गरजू व्यक्तींसाठी सुवर्णसंधी!

**१. समाचार संपादक (न्यूज एडिटर)**
- मराठीमध्ये उत्कृष्ट कमांड
- ५ वर्षांचा अनुभव

**२. असिस्टंट जाहिरात व्यवस्थापक (एडव्हर्टायझमेंट असिस्टंट मॅनेजर)**
- अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य
- शेड्युलिंगचे ज्ञान

**३. इव्हेंट मॅनेजर**
- अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य
- पुरुष/महिला

**४. सर्क्युलेशन मॅनेजर**
- विदर्भातील जिल्ह्यांचे ज्ञान आवश्यक
- अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य

**५. एकाउंटंट**
- पुरुष/महिला
- न्यूजपेपर बिलिंग आणि अकाउंटन्सीचे ज्ञान आवश्यक

अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य

मुलाखत दिनांक व वेळ
• दिनांक: मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५ • वेळ : दु.१२:०० ते ३:०० वाजेपर्यंत
स्थान: महासागर, चांडक ले-आउट, कॉटन मार्केट, नागपूर

आपले बायोडाटा आणि आवश्यक दस्तऐवज साथ लावून उपस्थित राहावे.





# शालेय विद्यार्थ्यांसाठी लवकरच एसटीची हेल्पलाईन

## मंत्री सरनाईक यांची घोषणा; शालेय बस फेऱ्यांच्या गैरव्यवस्थापनावर कडक कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :

राज्यातील शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सुरक्षित आणि वेळेवर एसटी प्रवासाचा प्रश्न गंभीर होत चालला असताना, परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी मोठा निर्णय जाहीर केला आहे. लवकरच संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांसाठी एसटीची विशेष हेल्पलाईन सुरू करण्यात येणार आहे. ही हेल्पलाईन विद्यार्थ्यांना शाळेत जाण्या-येण्याच्या प्रवासात कोणतीही अडचण आल्यास तात्काळ मदत मिळावी या उद्देशाने तयार करण्यात येणार आहे. धाराशिव बसस्थानकाला दिलेल्या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी बस उशिराने येणे, अचानक रद्द होणे आणि थांब्यावर न थांबण्याच्या तक्रारी थेट मंत्र्यांसमोर मांडल्या. या समस्यांवर तातडीने तोडगा काढण्याची ग्वाही सरनाईक यांनी यावेळी दिली.



राज्यातील अनेक दुर्गम आणि आदिवासीबहुल भागांत सरकारने मानव विकास बसेस विद्यार्थिनींच्या सुरक्षित प्रवासासाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. मात्र, या बसेसचा वापर काही ठिकाणी इतर प्रवासी वाहतुकीसाठी केला जात असल्याच्या तक्रारीही मंत्र्यांच्या निदर्शनास आल्या. विद्यार्थीनीना सुरक्षित प्रवास उपलब्ध व्हावा यासाठी या बसेसचा केवळ शालेय वापरच व्हावा, अशा सक्त सूचना आधीच दिल्या आहेत. तरीही काही आगारांत या नियमाकडे दुर्लक्ष होत असल्याचे समोर आले. विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारीत बस वेळेवर न सुटल्याने किंवा रद्द झाल्याने शाळेत उशीर होतो, तास बुडतात, तर कधी संध्याकाळी घरी पोहोचायलाच खूप उशीर होतो. त्यामुळे पालकांच्या ओरडालाही त्यांना सामोरे जावे लागते. गैरसमजातून काही विद्यार्थिनींनी आत्महत्याही केल्याची गंभीर उदाहरणे समोर आल्याने मंत्री सरनाईक यांनी या विषयाला अत्यंत गांभीर्याने घेतले आहे.

लवकरच सुरू होणाऱ्या या हेल्पलाईनद्वारे विद्यार्थ्यांना अचानक बस रद्द झाल्यास, तांत्रिक बिघाडामुळे बस बंद पडल्यास किंवा बस वेळेत न आल्यास थेट मदत मिळणार आहे. राज्यातील सर्व 31 विभाग नियंत्रकांचे संपर्क क्रमांक शाळा आणि महाविद्यालयांना देण्यात येणार आहेत. अशा वेळी शाळांचे मुख्याध्यापक, प्राचार्य किंवा थेट विद्यार्थीही विभाग नियंत्रकांशी संपर्क साधून तातडीचा तोडगा मागू शकतील. ही सेवा उपलब्ध झाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रवासातील असुरक्षितता आणि दिरंगाईचा त्रास कमी होईल, असेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीची जबाबदारी आता थेट एसटीच्या स्थानिक प्रशासनावर टाकण्यात आली आहे. बसेस उशिरा सुटल्याने किंवा रद्द झाल्याने जर विद्यार्थ्यांचे तास चुकले, ते परीक्षेला उशीर झाला किंवा एखादी परीक्षा बुडाली, तर त्यासाठी संबंधित आगार व्यवस्थापक आणि पर्यवेक्षक जबाबदार धरले जाणार आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीचे जितके दिवस, तितके दिवस संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करणे किंवा सक्तीची रजा देणे, अशा कठोर कारवाईचे आदेशही सरनाईक यांनी दिले आहेत. त्यामुळे एसटी प्रशासनावर शालेय बस फेऱ्या वेळेत आणि नियमितपणे चालवण्याची जबाबदारी आणखी कडक झाली आहे. एसटी सेवा ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागांत विद्यार्थ्यांसाठी जीवनवाहिनीच ठरते. त्यामुळे प्रवासात येणाऱ्या समस्या दूर करणे अत्यावश्यक असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत एसटी व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध व जबाबदार होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. हेल्पलाईन सेवेच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना तातडीची मदत मिळणे अधिक सुलभ होईल, तसेच शाळेत जाण्या-येण्याचा प्रवास अधिक सुरक्षित आणि विश्वसनीय बनवणे हेच उद्दिष्ट असल्याचे सरनाईक यांनी नमूद केले.

# भाजपकडून भाषिक प्रांतवाद पेटवण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :



उद्धव ठाकरेंचा आरोप

भाजपकडून मुंबई व महाराष्ट्रात भाषिक प्रांतवाद पेटवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी कल्याण येथील अर्णव खैरे आत्महत्या प्रकरणावर भाष्य करताना केला. भाजप व संघ मुंबईत भाषिक प्रांतवादाचे विष पसरवत आहेत. पण त्याचे खापर आपल्यावर फोडण्याचा प्रयत्न करत आहेत.

काल-परवा एक दुर्दैवी घटना घडली. ती घडायला नको होती. भाषेवरून कुणाचे खून करा, कुणाला मारा अशी आपली मागणी नाही, असे ते म्हणालेत. या प्रकरणी ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे व किशोरी पेडणेकर यांनीही भाजपवर टीकेची झोड उठवली आहे.

मुंबई व उपनगरांतील भाजप व शिंदे गटातील शेकडो कार्यकर्त्यांचा आज शनिवारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश झाला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, शिवसेनेत दररोज प्रवेश होत आहेत. मातोश्रीचा परिसर गर्दीने गजबजून जात आहे. पण ही केवळ गर्दी नाही, तर लढणाऱ्या शिवसैनिकांची ही संघटना व हे सैन्य आहे. आज शिवसेनेत अनेकजण परत आलेत. भाजप व गद्दार गट किती ढोंगी आहे हे हळूहळू सर्वांच्या लक्षात येत आहे. पण ही लढाई सोपी नाही. तुम्ही एका जोशात आहात, जोश तर पाहिजे, पण त्याच बरोबरीने डोळे उघडे ठेवून सगळीकडे पाहा.

# पालघर नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्रिकोणी लढत







■ दीपक मोहिते, पालघर, दि. २२ :

नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत सेनेचे (उबाठा) उत्तम पिंपळे, भाजपचे कैलाश म्हात्रे व शिवसेनेचे ( शिंदे गट) उत्तम घरत हे तिघेजण आपले नशीब अजमावत आहे. वास्तविक हे तिघेही पूर्वाश्रमीचे शिवसैनिक आहेत. या तिघांपैकी उत्तम पिंपळे यानी नगराध्यक्षपद भूषवले तर उत्तम घरत यांनी उपनगराध्यक्षपद भूषवले आहे.या निवडणुकीत हे तिघेही एकमेकांसमोर दंड थोपटून उभे आहेत.

त्यामुळे पालघर शहरातील राजकीय समीकरणे आगामी काळात बदलण्याची दाट शक्यता आहे. पालघरच्या शहरी भागात शिवसेनेला वाखणण्याजोगा जनाधार होता. पण पक्षफुटीनंतर या जनाधारचे विभाजन झाले. त्याचा फायदा या निवडणुकीत भाजपला होण्याची शक्यता आहे.भाजपने,शिवसेनेच्या कैलाश म्हात्रे यांना रिंगणात उतरवून आपण या निवडणुका स्वबळावर लढवण्याचे संकेत दिले आहेत. भाजपने घेतलेल्या या निर्णयामुळे शिंदे गटाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. नगराध्यक्षपदासाठी उतरलेले हे तीनही उमेदवार दिग्गज नेते असल्यामुळे या निवडणुकीत चुरस वाढली आहे. या तिन्ही उमेदवारांची चांगली ओळख, कार्यकर्त्यांचा दांडगा जनसंपर्क आणि स्थानिक प्रश्नांची जाण लक्षात घेता निवडणूक अत्यंत अटीतटीची होण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसत आहे. पाणी, रस्ते, ड्रेनेज,मार्केट व शहरातील वाहतूककोंडी, असे ज्वलंत प्रश्न प्रचारात कळीचे मुद्दे ठरणार आहेत.

# शरद पवारांचे राज-उद्धव यांच्याशी युतीचे संकेत?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :

आज मुंबईत शरद पवारांच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसची महत्त्वाची बैठक पार पडली. मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने शनिवारी एक महत्त्वाचा निर्णय घेतला.

या बैठकीत शरद पवार यांच्या पक्षाने मुंबई मनपाच्या निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्याशी युती करण्याचे संकेत दिले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, राष्ट्रवादीच्या आजच्या बैठकीत मुंबई महापालिका निवडणुकीत युतीसाठी उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेशी चर्चा करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

भाजप सोडून इतरांसोबत युती करण्यास हरकत नाही. समाजवादी पक्ष किंवा मनसे सोबतदेखील युती करण्यास हरकत नाही, अशी एकंदर भूमिका राष्ट्रवादीच्या आजच्या बैठकीत मांडण्यात आली.

गेल्या आठवड्यात काँग्रेसच्या शिष्टमंडळाने शरद पवारांची भेट घेऊन आगामी पालिका निवडणुकीत काँग्रेस राष्ट्रवादीने एकत्र यायला हवे, याबाबत चर्चा केली होती.

काँग्रेसकडून महाविकास आघाडी व्हायची असेल तर मनसे नको, अशी भूमिका घेण्यात आली होती. शरद पवारांकडून पुढील आठवड्यात पक्षांतर्गत बैठक घेऊन निर्णय घेण्याबाबत काँग्रेसला आश्वासनही देण्यात आले होते. त्यामुळे शरद पवार मुंबई महानगरपालिका निवडणुकीत कोणाच्या बाजूने मैदानात उतरणार, याकडे राजकीय वतुर्ळाचे लक्ष लागले होते. अखेर शरद पवार यांनी मुंबईत ठाकरे बंधूंसोबत युती करण्याचा निर्णय घेतल्याचे समजते.

# लाडकी बहीण योजना बंद होणार नाही

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :



एकनाथ शिंदेंचे आश्वासन

डहाणू नगर परिषद निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले असून, प्रचाराच्या मैदानात उतरलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी जोरदार शक्तिप्रदर्शन केले. लाडकी बहीण योजना कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही. ही योजना म्हणजे काळ्या दगडावरची भगवी रेष आहे. मी एकदा कमिटमेंट केली तर स्वतःचीही ऐकत नाही, अशा शब्दांत त्यांनी राज्य सरकारच्या योजना आणि नेतृत्वावर जनतेचा विश्वास टिकून असल्याचा दावा केला. डहाणूतील प्रचारसभेत त्यांनी शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी जनतेला आवाहन केले.

डहाणू नगर परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीने एकत्रितपणे शिवसेना (उद्धव ठाकरे गट), काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांच्या माध्यमातून नगराध्यक्ष पदासाठी भरत सिंह राजपूत यांना पाठिंबा दिला आहे.

दुसऱ्या बाजूला शिवसेना शिंदे गटाने राजेंद्र माछी यांना उमेदवारी दिली असून, या दोन्ही उमेदवारांमध्ये थेट संघर्ष पाहायला मिळत आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी संजय पाटील आणि हाफिजूर रहमान खान यांनी आपले अर्ज मागे घेतल्याने या लढतीला आणखी स्पष्टता आली. त्यामुळे नगराध्यक्ष पदासाठी भाजप आणि शिंदे गट एकीकडे, तर महाविकास आघाडी दुसरीकडे अशा सरळ-साध्या लढतीचे चित्र उभे राहिले आहे.

यंदाच्या निवडणुकीत डहाणूतील अनेक प्रभागांमध्ये थेट एकास एक उमेदवारांमधील लढतीची स्थिती निर्माण झाली आहे. प्रभाग क्रमांक 2, 3, 5, 7, 11 आणि 12 या प्रभागांमध्ये उमेदवारांची संख्या फक्त दोन इतकीच असल्याने मतदारांकडून कोणत्या बाजूला कल झुकतो यावरच निकाल अवलंबून असेल. इतर प्रभागांमध्येही तीन ते चारपेक्षा जास्त उमेदवार मैदानात नसल्याने संपूर्ण निवडणूक सरळ, स्पष्ट लढतीची बनली आहे. स्थानिक राजकारणात ही स्थिती विशेष मानली जात असून, यामुळे प्रभागनिहाय प्रचार अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

# धक्का लागल्यामुळे घाटकोपरमध्ये वृद्धाची हत्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :

घाटकोपर परिसरात गुरुवारी रात्री चालण्यासाठी गेलेल्या एका ६५ वर्षीय वृद्धाची अज्ञात व्यक्तीने हत्या केली. घाटकोपर पोलिसांनी या प्रकरणी तपास करून अवघ्या पाच तासात हत्येचा छडा लावला. धक्का लागल्याच्या क्षुल्लक कारणावरून वृद्धाची हत्या केल्याची कबुली आरोपीने दिली.

घाटकोपरमधील सीजीएस कॉलनी परिसरात एक वृद्ध गंभीर अवस्थेत रस्त्यालगत पडल्याची माहिती एका स्थानिक रहिवाशाने घाटकोपर पोलिसांना दिली. त्यानुसार घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी जखमी वृद्धाला खासगी रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. शवविच्छेदन अहवालात डोक्याला गंभीर इजा झाल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी तत्काळ हत्येचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

सुरेंद्र पाचडकर (६५) असे यातील मृत वृद्धाचे नाव असून ते विक्रोळीमधील त्रिवेणी सोसायटीत वास्तव्यास होते. पाचडकर यांच्यावर हल्ला होताना एका महिलेने पाहिले होते. तिने याची माहिती पोलीसांना दिली. पोलिसांनी तत्काळ परिसरातील सीसी टीव्ही कॅमेऱ्यांतील चित्रण ताब्यात घेऊन आरोपीचा शोध सुरू केला. यावेळी एका सीसी टीव्ही कॅमेऱ्यात आरोपीचा चेहरा कैद झाला होता. त्यानुसार पोलिसांनी आरोपीची ओळख पटवून अवघ्या पाच तासांत त्याला घाटकोपर परिसरातून अटक केली. अमन वर्मा (१९) असे या आरोपीचे नाव असून तो घाटकोपरच्या रमाबाई नगरध्ये वास्तव्याला आहे. पाचडकर यांना आरोपीचा धक्का लागला. याच कारणावरून दोघांमध्ये बाचाबाची झाली. यावेळी आरोपीने रस्त्यालगत पडलेल्या लोखंडी सळईने पाचडकर यांच्यावर हल्ला केला.

# मुंबई महापालिकेच्या मतदारयादीतही वोट चोरी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :



मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी गुरुवारी जाहीर करण्यात आलेल्या प्रारुप मतदारयादीतही वोट चोरी झाल्याचा आरोप शिवसेनेचे (ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी केला. मतदारयादी प्रभागनिहाय विभागताना भाजपला फायदेशीर असे बदल केल्याचा आरोपही ठाकरे यांनी केला. मतदारयादी काटेकोरपणे तपासा आणि अनियमितता समोर आणा, असे आवाहन ठाकरे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना, राजकीय पक्षांना आणि मतदारांना केले.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी गुरुवार, २० नोव्हेंबर रोजी मतदारयादी जाहीर करण्यात आली. प्रारुप मतदार यादीवर २७ नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना नोंदवण्यात येणार आहेत. तर ५ डिसेंबरला अंतिम मतदारयादी जाहीर होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी १ जुलैपर्यंतची मतदारयादी पात्र ठरवण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी स्वतंत्र मतदारयादी तयार केली जात नाही. भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली मतदारयादी वापरली जाते. मात्र १ जुलैपर्यंतची मतदारयादी विधानसभा मतदारसंघनिहाय आहे. ती प्रभाग निहाय विभागून त्याची प्रारुप यादी जाहीर करण्यात आली आहे. मात्र भाजपला फायदा होईल अशा पद्धतीने या मतदारयादीचे विभाजन करण्यात आल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी समाज माध्यमांवरून केला.

मतदारयादी ही संगणकीय पद्धतीने वाचू शकत नाही (मशीन-रीडेबल), त्यामुळे जवळपास ४५ हजार मतदारांमधून नाव शोधण्यासाठी पूर्ण यादी पहावी लागेल, मतदारयादी हेतुपुरस्सर तयार करण्यात आल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला. मतदारयादी रणनीतीपूर्वक, लोकसंख्येच्या आधारे आणि मतांच्या गणितानुसार फोडून, भाजप कमकुवत असलेल्या प्रभागांमध्ये मतदारांचे स्थानांतर करण्यात आले आहे, असाही आरोप ठाकरे यांनी केला आहे. काही ठिकाणी एका इमारतीतील मतदार दुसऱ्या प्रभागातच नाही तर संपूर्ण वेगळ्या विधानसभा मतदारसंघात दाखवण्यात आले आहेत. ही वोट चोरी आहे, अशीही टीका ठाकरे यांनी केली.

मतदारयादीत घोळ ही निवडणूक आयोगाची अकार्यक्षमता असून त्यांना तत्काळ हटवायला हवे, अशीही मागणी ठाकरे यांनी केली. जर हे जाणीवपूर्वक केले जात असेल, तर मतदारांना त्यांच्या घटनात्मक अधिकारापासून वंचित करण्याच्या गुन्ह्यांतर्गत निवडणूक आयोगावर कार्यवाही झाली पाहिजे, अशीही टीका ठाकरे यांनी केली.

## शस्त्रास्त्रांच्या ५० अड्डयांवर बुलडोझर

# २१ पिस्तुले जप्त, ३६ संशयित ताब्यात

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २२ :

पुणे शहर पोलिसांनी संघटित गुन्हेगारीविरोधात मोठी मोहीम राबवत आंतरराज्यीय अवैध शस्त्र उद्योगाचा पदार्फाश केला आहे. या कारवाईत पुणे शहरातून २१ पिस्तुले आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. त्यानंतर पुढील तपासात मिळालेल्या माहितीच्या आधारावर मध्य प्रदेशात छापेमारी करून ३६ संशयितांना ताब्यात घेतले.

या तपासादरम्यान मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलिस उपायुक्त सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्य प्रदेशातील उमराटी गावात पहाटे छापा टाकण्यात आला. येथे पोलिसांनी अवैध शस्त्रनिर्मितीचा मोठा अड्डा उघडकीस आणला. या कारवाईत ३६ संशयितांना जेरबंद करण्यात आले. छापेमारीत मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि त्यांचे सुटे भाग जप्त करण्यात आले. पोलिसांनी शस्त्रे बनवणारे ५० अड्डे बुलडोझरने उद्ध्वस्त केले. तसेच, शस्त्रांवर नावे उमटवण्यासाठी वापरले जाणारे साहित्यही जप्त करण्यात आले.

मागील तीन आठवड्यांपासून विमानतळ, काळेपडळ, गुन्हे शाखा आणि एईसी पथकांनी केलेल्या धडक कारवाईत एकूण २१ शस्त्रे जप्त झाली होती. या प्रकरणी विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या धाडीसाठी शीघ्र कृती दल, गॅस गन सेक्शन, वायरलेस आणि सीसीटीव्ही टीम यांसह मोठा फौजफाटा सज्ज ठेवण्यात आला होता. मोबाइल सर्व्हिलन्स व्हॅन, बुलेटप्रूफ जॅकेट्स आणि बॉडी वॉर्न कॅमेरे यांचाही वापर करण्यात आला.

तपासातील प्राथमिक निष्कषार्नुसार, जप्त केलेली अवैध शस्त्रे "उमराटी शिकलगार आर्म्स " या नावाने तयार करून महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आणि छत्तीसगड या राज्यांत पुरवली जात असल्याचा संशय आहे. ताब्यात घेतलेल्या संशयितांवर कायदेशीर कारवाई केली जात असून, अवैध शस्त्र पुरवठा साखळीचा पूर्ण उलगडा करण्यासाठी तपास वेगाने सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## भाजपाच्या सद्बुद्धी आंदोलनाला शिवसेना व मनसेचे प्रत्युत्तर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :

कल्याण लोकलमध्ये मराठी तरुणाला मराठी भाषेत न बोलल्यामुळे एका टोळक्याने मारहाण केली होती. त्यानंतर त्या तरुणाने आत्महत्या केल्याच्या प्रकरणावरून ठाकरे बंधू आणि भाजपा यांच्यात चांगलेच राजकारण रंगले आहे. या प्रकरणाचे खापर भाजपने ठाकरे बंधूंवर फोडले असून ठाकरे बंधूंना सदबुद्धी द्या, असे फलक झळकावीत मुंबई भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी शिवसेनाप्रमुखांच्या स्मृतीस्थळाजवळ आंदोलन केले. माजी महापौर किशोरी पेडणेकर आणि मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी भाजपचे दिवंगत नेते अटलबिहारी वाजपेयी यांना अभिवादन करून भाजपच्या नेत्यांना सबुद्धी देण्याची प्रार्थना केली. केळकर महाविद्यालयात मुलुंड येथे शिक्षण घेणाऱ्या १९ वर्षांच्या अर्णव खैरे याला लोकलमध्ये चार -पाच जणांच्या टोळक्याने मारहाण केली. या प्रकारामुळे तणावग्रस्त अवस्थेत अर्णवने घरी आला आणि त्याने आत्महत्या केली. या घटनेवरून आता मुंबई भाजप आणि ठाकरे बंधू यांच्या कार्यकर्त्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत.

# सिद्धोबाच्या जयघोषात म्हसवड रथोत्सव संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
सातारा, दि. २२ :

सातारा जिल्ह्यातील म्हसवड येथे श्री सिद्धनाथ आणि माता जोगेश्वरी यांच्या रथोत्सवाचा महापर्व यंदाही अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. पहाटेपासूनच मंदिर परिसरात दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. शहरभर गुलालाचा वर्षाव, ढोल-ताशांचा गजर आणि सिद्धोबाच्या नावाने चांगभलं, या जयघोषाने संपूर्ण नगरी भक्तिरंगात न्हाऊन निघाली. महाराष्ट्रासह कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील हजारो भाविकांनी उपस्थित राहून या ऐतिहासिक रथोत्सवाला भव्यता प्रदान केली. दिवाळी पाडव्यानंतर सुरू झालेला एक महिन्याचा विवाह सोहळा रथोत्सवाच्या रूपाने संपन्न झाला आणि यानिमित्त भाविकांनी दर्शन घेतलं.



ठरलेल्या मुहूर्तावर सालकरी परिवाराच्या घरातून वाजतगाजत उत्सवमूर्ती रथावर विराजमान करण्यात आल्या. मानाच्या सासन काठ्यांच्या भेटीनंतर रथाची मिरवणूक सुरुवात झाली. रथ ओढण्याचा आणि रथावर बसण्याचा मान परंपरेनुसार राजेमाने घराण्याचा असल्याने या कुटुंबातील सदस्यांनी उपस्थित राहून श्रींचे आशीर्वाद घेतले. प्रशासनातील अधिकारी, मान्यवर, तसेच पोलिस यंत्रणा यावेळी उपस्थित होती. रथ सुरू होताच गुलाल आणि खोबऱ्याची उधळण, निशाणे आणि नारळाच्या तोरणांची अर्पणे, तसेच पैशांच्या तोरणांनी भक्तांनी आपली श्रद्धा व्यक्त केली. रथ नगरप्रदक्षिणेला निघाल्यानंतर शहरातील मुख्य मार्ग भक्तांनी गजबजले, तर गुलालाच्या झोतात सारा परिसर लालेलाल झाला.

यंदा माण नदीपात्रात पाणी असल्यामुळे रथोत्सवाचा मार्ग थोड्या बदलांसह पारंपरिक पद्धतीने पार पडला. बायपास रस्त्यातून नगरपरिषद, महात्मा फुले चौक, बसस्थानक असा प्रवास करत रथ साताराझपंढरपूर रस्त्यावर पोहोचला. येथे श्री सिद्धनाथ यांच्या बहिणीस साडी-चोळीचा मानाचा आहेर देण्यात आला.

# शिवसेनाप्रमुखांच्या स्मृतीस्थळाजवळ भाजपचे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :

डोंबिवली- ठाणे लोकलमधील किरकोळ वादातून 19 वर्षीय विद्यार्थी अर्णव खैरेच्या आत्महत्येपर्यंत पोहोचलेल्या घटनेने संपूर्ण मुंबई हादरली आहे. लोकल ट्रेनमध्ये चढताना अर्णवने हिंदीत संवाद साधल्यावर काही प्रवाशांनी त्याच्यावर मराठी बोलता येत नाही का? मराठी बोलण्याची लाज वाटते का? असे प्रश्न वारंवार विचारले. त्यानंतर त्याला शिवीगाळ आणि मारहाण झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या प्रकारानंतर मानसिक तणावाखाली गेलेल्या अर्णवने घरी परतल्यानंतर अत्यंत धक्कादायक पाऊल उचलत गळफास घेऊन आत्महत्या केली. या दुर्घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली असून, भाषावादामुळे तरुणाचे आयुष्य हिरावले गेले, याबद्दल सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.




या घटनेनंतर राजकीय वातावरण आणखी तापले असून, भाजपने ठाकरे गटावर थेट निशाणा साधत मुंबईत सद्बुद्धी द्या प्रार्थना आंदोलन आयोजित केले. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळाजवळ हे आंदोलन पार पडले. भाजप नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी काळ्या फिती बांधून निःशब्द आंदोलन करत या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला. भाषा ही संपकार्चे साधन आहे, संघषार्चे नाही, अशा आशयाचे फलक घेऊन या आंदोलनात उपस्थितांनी भाषावादाच्या विरोधात भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमात मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम, आमदार अतुल भातखळकर आणि अनेक स्थानिक पदाधिकारी सहभागी झाले.

अमित साटम यांनी आंदोलनात बोलताना काही राजकीय पक्षांवर थेट आरोप केले. संपलेले राजकारण सुरू ठेवण्यासाठी भाषावाद आणि प्रांतवाद पेटवण्याचा उद्योग काही नेत्यांकडून करण्यात येतो. अर्णवसारख्या निरपराध मराठी तरुणाला मुद्दाम निर्माण केलेल्या तणावाचा फटका बसला. ही केवळ राजकीय स्वाथार्ची परिणती आहे, असे त्यांनी सांगितले. त्यांनी पुढे म्हटले की, समाजात द्वेष निर्माण करणाऱ्यांना सुबुद्धी मिळावी म्हणून आम्ही प्रार्थना केली. प्रत्येक माणसाने दुसऱ्या माणसाला समानतेने वागवणे हेच मानवतेचे खरे तत्त्व आहे, असेही ते म्हणाले.

महासागर ●रविवार,दि.२३ नोव्हेबर २०२५

अकोला

पान 3

## रस्ते अपघातांची वाढती संख्या

**अकोला :** रस्ते अपघाताच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. हेल्मेट न वापरल्याने डोक्याला गंभीर दुखापत होऊन मृत्यू होणाऱ्यांची संख्या अधिक आहे. तरीदेखील दुचाकीस्वार हेल्मेटचा वापर करताना दिसत नाही.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ऐतिहासिक निर्णय; देशभरातील कामगारांना मिळाला न्याय : कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर

### नवीन श्रमसंहिता लागू; कामगारांच्या हक्कांचे संरक्षण, सामाजिक सुरक्षितता आणि व्यवसाय सुलभता वाढेल

**अकोला,दि २२ (प्रतिनिधी) :** भारतात आजपासून चार नवीन श्रम संहिता देशभरात पूर्णपणे लागू झाल्या आहेत. केंद्र सरकारने हा ङ्गऐतिहासिक निर्णयङ्ग घेतला आहे, त्यामुळे कामगारांच्या हक्कांचे संरक्षण, सामाजिक सुरक्षितता आणि व्यवसाय सुलभता वाढेल. या क्रांतिकारी निर्णयाद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कामगार बांधवांना न्याय मिळवून दिला आहे, अशी प्रतिक्रिया राज्याचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी व्यक्त केली आहे.कामगार मंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, नव्या श्रम संहितांमुळे कामगारांना विशेषतः आयटी, गिग इकॉनॉमी आणि असंघटित क्षेत्रातील ४० कोटी कामगारांना किमान वेतन, वेळेवर पगार, ओव्हरटाइम, पीएफ आणि ग्रॅच्युइटीसारख्या सुविधा मिळतील. कामगार हिताय कामगार सुखाय ठरणाऱ्या ह्या निर्णयाचे मी मनापासून स्वागत करतो आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीं आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनः पूर्वक अभिनंदन आणि आभार मानतो, अशी प्रतिक्रिया कामगार मंत्र्यांनी व्यक्त केली आहे.



# जिल्ह्यात पाच दिवसांत ११ नवीन कुष्ठरुग्णांची नोंद

### राज्यात १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहीम सुरू

**अकोला,दि २२ (प्रतिनिधी) :** राज्यभर राबविण्यात येत असलेल्या कुष्ठरोग शोध मोहिमेअंतर्गत अकोला जिल्ह्यात मागील पाच दिवसांत (१७ ते २१ नोव्हेंबर) एकूण ११ नवीन कुष्ठरुग्ण आढळून आले आहेत. जिल्हाधिकारी मीना वर्षा, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, तसेच उपसंचालक डॉ. सुशील कुमार वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम सुरू आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आरती कुलवाल आणि संचालक डॉ. दिलीप रणमले यांच्या नियोजनानुसार जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर तपासणी मोहिम राबविण्यात येत आहे.मोहिमेच्या पहिल्या पाच दिवसांत ५५९५५१ नागरिकांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ३९९६ संशयित रुग्णांची नोंद झाली आहे. नवीन निदान झालेले ११ रुग्णांवर तात्काळ उपचार सुरू करण्यात आले आहेत. यापूर्वी उपचार घेत असलेल्या १३९ रुग्णांसह जिल्ह्यात सध्या एकूण १५० रुग्णांवर उपचार सुरू आहेत.गाव पातळीवर जागरूकता आणि घराघरातील सर्वेक्षणासाठी १०४२ पथके आणि २०८ पर्यवेक्षक नेमण्यात आले आहेत. आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी आणि समुदाय आरोग्य अधिकारी हे सक्रिय सहभाग घेत असून जिल्हास्तरीय अधिकारी सतत भेटी देऊन मोहीम पाहणी करत आहेत.कुष्ठरोग हा दिसायला साधा वाटला तरी गंभीर आजार असून त्याचे दोन प्रकार पी.बी. (एक डाग असलेले) ६ महिन्यांचा उपचारएम.बी. (दोन किंवा अधिक डाग असलेले) १२ महिन्यांचा उपचार

या आजाराचा अदिशयन कालावधी अत्यंत मोठा असून ३ ते १० वर्षे, तर काहीवेळा २५ वर्षांपर्यंत लक्षणे दिसू शकतात.



**कुष्ठरोगाची प्रमुख लक्षणे:**

त्वचेवर फिकट किंवा रंग फिका पडलेले डाग गाठी किंवा उठाव स्पर्श, गरम-थंड जाणवण्याची संवेदना कमी होणेस्नायू कम कुवत होणे, हातापायांच्या बोटांमध्ये विकृती

**डोळे व श्वसनमार्गावर परिणाम**

कुष्ठरोग वेळेत उपचार घेतल्यास पूर्णपणे बरा होणारा आजार आहे. लवकर निदान केल्यास अपंगत्व टाळता येते, यावर भर देत डॉ. बळीराम गाढवे यांनी नागरिकांना आशा व आरोग्य कर्मचार्यामार्फत घरी येणाऱ्या तपासणीला सहयोग देण्याचे आवाहन केले आहे.

## ऑनलाइन तक्रार निवारण पोर्टल कार्यान्वित

**अकोला,दि २२ (प्रतिनिधी) :** महिला व बालविकास मंत्रालयाने 'शी-बॉक्स' हे ऑनलाइन तक्रार निवारण पोर्टल सुरू केले आहे. आता या पोर्टलवर सर्व खासगी आस्थापनांना नोंदणी करणे बंधनकारक केले आहे. लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा निर्णय घेतला आहे. ज्या आस्थापनांमध्ये १० किंवा त्याहून अधिक कर्मचारी आहेत, तेथे अंतर्गत तक्रार निवारण समिती असणे आवश्यक आहे. सर्व शासकीय, निमशासकीय, खासगी आस्थापनांनी या निर्देशांचे पालन करून आपल्या संस्थेची 'शी-बॉक्स' पोर्टलवर त्वरित नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे.

## आर्थिक फसवणूकप्रकरणी आरोपीला नागपुर येथून अटक

**अकोला,दि २२ (प्रतिनिधी) :** दिनांक १२/०५/२०२५ रोजी फिर्यादी नामे अजय दिनकर देशपांडे, रा. अकोला यांनी पोलीस स्टेशन सिव्हील लाईन येथे तकार दिली की, त्यांना अज्ञात व्यक्तीने फोन करून शेअर मार्केट ट्रेडींग मध्ये गुंतवणूक केली की जास्त नफा मिळवून देईल असे आश्वासन दिले, त्यानंतर फिर्यादी यांनी अज्ञात व्यक्तीवर विश्वास ठेवून त्याचे सांगण्याप्रमणे एकूण २,५८,२१,००० /- रूपये रकमेची गुंतवणूक केली. त्यानंतर फिर्यादी यांनी झालेल्या नफ्याबाबत अज्ञात व्यक्तीस विचारणा केली असता फिर्यादीस उडवाउडवीचे उत्तरे दिली व आणखी गुंतवणूक करण्यास सांगितले. तेव्हा फिर्यादीस आपली फसवणूक झाल्याचे समजले वरून त्यांनी पो. स्टे. सिव्हील लाईन येथे अप क. १७० / २०२५ कलम ३१८ ( ४ ), ३१९ (२), ३(५), बी. एन. एस. सहकलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर सदर तपास मा. पोलीस अधीक्षक साहेब यांचे आदेशाने सायबर पोलीस स्टेशन येथे वर्ग करण्यात आला.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तसेच डिजिटल खुणा आणि तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीचा माग काढण्यात आला. दिनांक २१/११/२०२५ रोजी मा. पोलीस अधीक्षक साहेबाच्या आदेशाने पोस्टे सिव्हील लाईन येथुन पोउपनि संदीप बालोद, पोस्टे सिव्हील लाईन व पोहवा. प्रशांत केदारे, पो. अमं. अतुल अजने व तेजस देशमुख पोस्टे सायबर हे आरोपी अटक करणेकामी नागपुर महाराष्ट्र येथे रवाना झाले.




## थोडक्यात

### करवाढ प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात २६ नोव्हेंबरला सुनावणी

**अकोला :** महापालिकेने केलेल्या वादग्रस्त मालमत्ता करवाढीच्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात येत्या २६ नोव्हेंबर रोजी सुनावणी होणार आहे. मागील ८ ते ९ वर्षांपासून न्यायालयात प्रलंबित असलेल्या या महत्त्वाच्या प्रकरणाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. या सुनावणीसाठी अकोला महापालिकेच्या विधी विभागातील अधिकाऱ्यांचे एक पथक अकोल्यातून दिल्लीला रवाना होणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

महापालिकेने २०१७ मध्ये केलेल्या मालमत्ता करामध्ये केलेल्या वाढीला आव्हान देत माजी नगरसेवक डॉ. जीशान हुसेन यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने ९ ऑक्टोबर २०१९ रोजी ही करवाढ रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला होता. या निर्णयाला आव्हान देत महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. त्यावर १३ ऑक्टोबर २०२० रोजी सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिली. तेव्हापासून हे प्रकरण सर्वो च्च न्यायालयात प्रलंबित आहे. गेल्या काही महिन्यापासून या प्रकरणासाठी वारंवार तारखा निश्चित करूनही, काही कारणास्तव सुनावणी टळत होती. यापूर्वी, १०४ व्या क्रमांकावर प्रकरण असल्याने सुनावणी होण्याची शक्यता होती, पण ती होऊ शकली नाही. यामुळे ही सुनावणी आता २६ नोव्हेंबरला होणार आहे. दरम्यान, महापालिकेने थकबाकीदार करदात्यांकडून दंडासह कर वसूल करण्याची प्रक्रिया सध्या सुरूच ठेवली आहे. २६ नोव्हेंबरला होणाऱ्या या सुनावणीवर मनपाची आर्थिक बाजू आणि कराचे भविष्य अवलंबून असल्याने या निकालाकडे सर्वसामान्य नागरिक आणि करदात्यांच्या नजरा लागल्या आहेत.

### अकोल्यात थंडीचा जोर वाढला!

**अकोला:** अकोला शहरासह संपूर्ण जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून थंडीचा जोर लक्षणीय वाढला आहे. सकाळी दाट धुक्याची चादर पसरत असून तापमानात झालेल्या घसरणी मुळे नागरिकांना गारठ्याचा तीव्र अनुभव येत आहे. विशेषत: शाळकरी विद्यार्थी, सकाळी कामावर जाणारे कर्मचारी तसेच शेतकऱ्यांना थंडीचा सर्वाधिक त्रास होत आहे. रात्रीच्या वेळीही थंडीची तीव्रता वाढल्याने नागरिकांनी घराबाहेरील हालचाल कमी केली आहे. बाजारपेठांमध्ये उबदार कपड्यांची मागणी वाढली असून हॉटेलांमध्ये चहा-कॉफीच्या दुकानांवर गर्दी दिसत आहे. हवामान विभागाने आगामी काही दिवसांत तापमान आणखी घसरण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे नागरिकांनी उबदार कपड्यांचा वापर करून आरोग्याची काळजी घ्यावी.

# अकोला पोलिस दलात 'प्राथमिक व विभागीय चौकशी' विषयावर मार्गदर्शन कार्यशाळा

**अकोला,दि २२ (प्रतिनिधी) :** अकोला पोलीस दलातर्फे पोलिस अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमता व अनुसंधान कौशल्यात भर घालण्यासाठी 'प्राथमिक चौकशी व विभागीय चौकशी' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन दिनांक २२.११.२०२५ रोजी विजय हॉल पोलीस अधीक्षक अकोला येथे दुपारी ०३ वा. करण्यात आले. या कार्यशाळेचे मार्गदर्शन मा. पोलिस अधीक्षक अकोला श्री. अर्चित चांडक यांच्या सर्वंकष मार्गदर्शनाखाली, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अपर पोलिस अधीक्षक अकोला श्री. चंद्रकांत रेड्डी यांनी भूषविले. कार्यशाळा करीता विधीतज्ञ श्री. नरेंद्र राजपुरोहित हे प्रमुख प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या मनः पूर्वक स्वागताने झाली. त्यानंतर विधीतज्ञ श्री. राजपुरोहित यांनी प्राथमिक चौकशी आणि विभागीय चौकशी प्रक्रिया, त्यातील उद्देश, नियमावली, तसेच अंमलबजावणीतील महत्त्वाच्या बाबींवर सखोल माहिती दिली.

## बी आर हायस्कूल आणि अहिल्यादेवी शिशू मंदिर च्या विद्यार्थ्यांनी गिरविले बाल हक्काचे धडे

**अकोला :** बालविवाह मुक्त महाराष्ट्र संकल्प अभियान अंतर्गत बी. आर. हायस्कूल आणि अहिल्यादेवी शिशू मंदिरअकोला येथे बालकांचे हक्क व त्यांना कायद्याचे न्यान मिळावे या उद्देशाने २२ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,महिला व बाल विकास विभाग, जिल्हा बाल संरक्षण कक्ष एन्करेज एज्युकेशनल फाउंडेशन अकोला आणि सखी वन स्टॉप सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने बी आर हायस्कूल आणि अहिल्यादेवी शिशू मंदिर येथे बालकांसाठी मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीमती प्रांजली जैसवाल सदस्य बालकल्याण समिती, ॲड मनिषा भोरे केंद्र प्रशासक सखी वन स्टॉप सेंटर, सुनील लाडूलकर संरक्षण अधिकारी जिल्हा बाल संरक्षण कक्ष, महेंद्र गणोदे अध्यक्ष एन्करेज एज्युकेशनल फाउंडेशन अकोला आणि विशेष उपस्थिती मध्ये मा श्याम राऊत सर विस्तार अधिकारी शिक्षण विभाग हे लाभले होते.



# मुख्यमंत्री मंगळवारी अकोल्यात हिवरखेडला जाहीर सभा

हिवरखेड : राज्याचे मुख्यमंत्री लाडक्या बहिणीचे देवाभाऊ देवेंद्र फडणवीस यांचा अकोट तेल्हारा व हिवरखेड नगरपरिषद निवडणुकीसाठी प्रचारार्थ २५ नोव्हेंबर रोजी अकोला जिल्ह्यात असून त्यांची हिवरखेड येथे देशमुख नगर बसस्टॅड येथे भाजपा कडून सुलभाताई रमेश दुतोंडे, मायाताई घुले, वैशाली शेंडे पालीवाल या नगराध्यक्षांच्या उमेदवारासह नगरसेवकांच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सभेला सबोंधित करण्यासाठी आमदार रणधीर सावरकर खासदार अनुप धोत्रे ॲड आकाश फुंडकर पालकमंत्री या विभागाचे विकास महर्षी आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या नेतृत्वाखाली भाजपा पदाधिकाऱ्यांनी पाहणी केली व या जाहीर सभेत २५ हजार पेक्षा जास्त नागरिक उपस्थित राहणार असून ७८ नगरसेवकांच्या प्रचारार्थ सभेसाठी येणार आहेत या दृष्टीने वेगवेगळ्या जबाबदाऱ्या देण्यात आले आहे विजय अग्रवाल भाजपा जिल्हा अध्यक्ष संतोष शिवरकर डॉक्टर अमित कावरे माधव मानकर डॉ संजय शर्मा उमेश पवार राजेश रावणकर हरीश टावरी गोपाल मोहोळ मंगेश दुंतोडे गणेश रोठे,संदीप उगले संदीप पालीवाल डॉक्टर संजय शर्मा संजय जोशी रमेश दुंतोंडे बाळासाहेब नेरकर किरण सेदाणी सूदाम राऊत सह विविध कार्यकर्त्यांकडे जबाबदारी देण्यात आल्या आहेत. भाजपाने प्रचारार्थ आघाडी घेतली असून भारतीय जनता पक्षाचे नेते वेगवेगळ्या भागांमध्ये प्रचारात फिरत असून वेगवेगळ्या जाती जमाती च्या घटकांना भाजपाने उमेदवारी दिली आहे आणि भारतीय जनता पक्षाने सभेची जय्यत तयारी सुरू केली



## सत्य व सत्तेचे समीकरण समाज सुधारणेस सक्षम : श्री ज्ञानेश्वर महाराज वाघ

**अकोला,दि २२ (प्रतिनिधी) :** अखिल विश्वातील मानव समाज हा राजकीय , प्रापंचिक व परमार्थिक या क्षेत्रत्रयीमध्ये विभागल्या गेला असून ; यातील राजकारण जेव्हा समाजकारणाला घेऊन धर्मकारणाकडे स्वेच्छेने येते तेव्हा समाजात अमुलाग्र परिवर्तन होऊन , तो इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहिल्या जातो. कारण सत्य व सत्तेचे समिकरण समाजसुधारणेचा सक्षम पर्याय असल्याचे अभ्यासपूर्णमत भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ यांनी मांडले. ते आज स्थानिक मलकापूर ग्रामस्थांच्या ( प्रभाग १४ ) वतीने आयोजित भागवत सप्ताहाची सांगता करीत असतांना काल्याच्या किर्तन प्रसंगी बोलत होते. ते पुढे म्हणाले की, समस्त मानव समाज हा सत्व, रज ,तम या त्रिगुणांनी युक्त आहे. त्यातील सत्वगुण शांती प्रधान असून , प्राय: तो निष्क्रिय तर, तमोगुण हा आलस्य प्रधान असून , तो कुंभकर्णप्रमाणे निद्राप्रिय आहे. त्यातील केवळ रजोगुणच क्रिया प्रधान असल्याने तो सदैव सक्रिय असतो. संपूर्ण विश्वाचे जेवढे नुकसान दृष्ट दुर्जनांनी केले नाही त्याहीपेक्षा अधिक प्रमाणात ते निष्क्रिय सज्जनाने केलेले आहे. म्हणून शांतिप्रधान असणाऱ्या सत्वगुणी लोकांना संघटित व सक्रिय करून त्यांच्या शक्तीचा सदुपयोग करण्याचे सत्कार्य सदैव सक्रिय असणारे रजोगुणी लोक करून घेतात. म्हणून रजोगुण जेव्हा तमोनुकूल होतो तेव्हा जगात अधर्म तर, तोच ज्यावेळी सत्वानुकूल होतो तेव्हा सर्वत्र धर्माचे राज्य स्थापित होत असते. म्हणूनच धर्मसंस्थपणेसाठी धर्मकारण व राजकारण एका केंद्रात येणे गरजेचे असते. यांचे समीकरण समाजोद्धारास व विकेंद्रीकरण सत्तांतरास कारणीभूत होते . याच्या उदाहरणांनी पौराणिकते पासून तर , मध्ययुगीन भारताच्या इतिहासाची तसेच अर्वाचीन काळातील वर्तमानपत्रांची पाने खचाखच भरलेली असल्याचे निदर्शनास येत. म्हणूनच देश हिताच्या दृष्टिकोनातून ही युती अतूट राहणे आवश्यक असल्याचे आग्रही प्रतिपादन सुद्धा त्यांनी अनेक पौराणिक दाखले देऊन आपल्या ओघवती वाणीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तदनंतर भव्य महाप्रसादानी कार्यक्रमाचे विधीवत सांगता झाली.



## पातुर वाशिम महामार्गावर दिंडीत टँकर घुसल्याने दोन वारकरी जखमी

### टँकर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**पातुर,दि २२ (प्रतिनिधी) :** पातुर वाशिम महामार्गावर माळराजुरा पातूरघाटा जवळ दी.२१/११/२०२५ रोजी सकाळी साडेनऊ वाजता दरम्यान चालक आकाश विलास राउत वय २९ वर्ष व्यवसाय चालक रा. मुंगळा ता. मालेगाव जि. वाशिम यांच्या तक्रारीवरून माळराजुरा घाटाजवळ आरोपी टैंकर क झइ ४६ थ ८७८५ च्या चालकाने टॅकर समोरुन पालखी जात आहे हे माहीती असतांना रस्त्याच्या परीस्थितीकडे दूलक्ष करून टैंकर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून दिंडीच्या मागे असलेल्या महींद्रा सुप्रो गाडी क्रमांक चक ३७ त ६२१२ मागुन जोराने धडक दीली. टँकरच्या धडकेमुळे माझे गाडीच्या बाजूला पायदळ चालत असलेल्या पालखीतील वारकरी नामे भागवत बबनराव देशमुख वय ३६ वर्ष , दिपक वसंतराव भंगी वय ३५ वर्ष दोन्ही रा. शिरपुर हे वारकरी जखमी झाले आहे.पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी आकाश राऊत मी समक्ष पोलीस स्टेशन ला येवुन जबानी रिपोर्ट वरून राजेश प्रकाश राउत रा. मुंगळा ता मालेगाव जि. वाशिम यांचे महीद्रा सुप्री गाड़ी क्रमांक चक ३७ त ६२१२ यावर चालक म्हणून काम करतो. दि. २१/११/२०२५ रोजी गजानन महाराज पालखी शिरपुर वरून मेडशी व तेथुन शुक्रवारी शेगाव येथे जाण्यासाठी निघाली होती .सकाळी ०९/३० वा च्या सुमारास पालखीचे दर्शनाकरीता अंश संतोष राऊत यांचे परीवारातील लोक घेवुन मुंगळा येथुन पातुर रोडने पालखी जवळ आली व गाडीतील लोक पालखी मध्ये उतवुन मी गाडी पालखीच्या मागे मागे येत असतांना माळराजुरा घाटाजवळ टैंकर क झइ ४६ थ ८७८५ च्या चालकाने टॅकर समोरुन पालखी जात आहे हे माहीती असतांना रस्त्याच्या परीस्थितीकडे दूलक्ष करून टैंकर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून दिंडीच्या मागे असलेल्या माझे ताब्यातील महींद्रा सुप्रो गाडी क्रमांक चक ३७ त ६२१२ मागुन जोराने धडक दीली. त्यामुळे सुप्रो गाडीचे नुकसान झाले व टँकरच्या धडकेमुळे माझे गाडीच्या बाजूला पायदळ चालत असलेल्या पालखीतील वारकरी नामे भागवत बबनराव देशमुख वय ३६ वर्ष, दिपक वसंतराव भंगी वय ३५ वर्ष दोन्ही रा. शिरपुर हे वारकरी जखमी झाले आहे.



## शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी शेकडो कार्यकर्त्यांची कापूस पायी दिंडी अकोलात दाखल

**अकोला,दि २२ (प्रतिनिधी) :** अकोला जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या अन्यायकारक अटी, खरेदीतील विलंब आणि मर्यादित खरेदी धोरणाविरोधात उसळलेल्या संतापाचे रूपांतर भव्य कापूस पायी दिंडीत झाले. प्रहार जनशक्ती पक्षाच्या नेतृत्वाखालील या दिंडीत राष्ट्रवादी शरदचंद्र गट तसेच काँग्रेस पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनीही सक्रीय सहभाग नोंदवत ऐतिहासिक एकजूट दाखवली.

अकोट कृषी उत्पन्न बाजार समितीतून दिंडीची शिस्तबद्ध सुरुवात सकाळी अकोट कृषी उत्पन्न बाजार समिती येथे सर्व कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने एकत्र जमले. समिती गेटवरील हनुमंत रायाच्या मंदिराचे दर्शन घेऊन दिंडीची सुरुवात करण्यात आली. शिस्त, संयम आणि एकतेचे दर्शन घडवत दिंडीने अकोट-अकोला मार्ग धरला. सरकारने शेतकऱ्यांच्या कापूस खरेदीवर घातलेल्या नव्या मर्यादा आणि अटींवर जोरदार नाराजी व्यक्त करत, शेतकऱ्यांना दहा-बारा क्विंटल उत्पादन असूनही फक्त पाच क्विंटल साठ किलोपर्यंतची मर्यादा लावणे हा सरळ-सरळ अन्याय आहे,ङ्ग असा आरोप या नेत्यांनी केला. त्यातही एकाच सातबाऱ्यावर घरातील चार नावे असतानाही प्रत्येकी २०० रुपये देऊन स्वतंत्र ॲफिडेव्हिट करावे लागणे याला कार्यकर्त्यांनी 'शेतकऱ्यांना चोर ठरवण्याचा प्रयत्न' अशी कठोर टीका केली.भव्य दिंडीला विविध पक्षांचा पाठिंबाशेतकरी बांधवांच्या पाच महत्त्वपूर्ण मागण्यांसाठी ही दिंडी निघाली असून, यास राष्ट्रवादी शरदचंद्र गटाचे श्रेयश चौधरी, धीरज हिंगणकार, तसेच काँग्रेस पक्षाचे कपिल ढोके आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रशांत पाचडे यांनी पत्राद्वारे जाहीर पाठिंबा दिला. शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन करून दिंडीला प्रस्थान अकोट शहराबाहेरील विजय नगर येथून निघणाऱ्या दिंडीने प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन आणि हारार्पण केले.

त्यानंतर देशभक्तीपर गीतांनी सजवलेल्या रथासह कापूस भरलेल्या ट्रॅक्टर-ट्रॉल्यांच्या ताफ्यातून दिंडी अकोल्याकडे रवाना झाली.मार्गात वणी वारुळा, देवरी फाटा, कुटासा फाटा, तरोडा-मरोळा, दादाराव सपकाळ परिसर, मोहकार परिवार, पंकज फोकमारे, निवृत्ती वानखडे, कैलास कौऊटकार, गजानन जिनिंग आदी ठिकाणी नागरिकांनी कार्यकर्त्यांचे स्वागत केले.



## अकोला-अकोट ब्रॉडगेज मार्गाचा तिसऱ्या वर्धापन दिन!

# ३ वर्षांत फक्त ३ गाड्या, समस्या व मागण्या 'जैसे थे'








■अकोला,दि २२ (प्रतिनिधी) :

बहुप्रतिक्षित अकोला ते अकोट ब्रॉडगेज रेल्वे मार्गाला २३ नोव्हेंबर २०२२ रोजी लोकार्पण होऊन आज तीन वर्षे पूर्ण होत आहेत. पाच राज्यांच्या कनेक्टिव्हिटीसाठी महत्त्वाच्या असलेल्या या मार्गावर तीन वर्षांच्या काळात केवळ तीनच रेल्वेगाड्या धावत आहेत, तर प्रवाशांच्या समस्या आणि मागण्या आजही 'जैसे थे' राहिल्या आहेत.

गांधीग्राम पुलामुळे मिळाली 'मुहूर्तमेढ'

या मार्गाची चाचणी जुलै २०२० मध्येच पूर्ण झाली होती, तरीही हा मार्ग सुरू करण्यास विलंब होत होता. मात्र, ऑक्टोबर २०२२ मध्ये पूर्णा नदीवरील गांधीग्राम पुलाला तडे गेल्याने तो वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. या संकटानंतर अचानक लोकप्रतिनिधींना जाग आली आणि तातडीने २३ नोव्हेंबर २०२२ रोजी अकोला-अकोट रेल्वे मार्ग सुरू करण्यात आला. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, गांधीग्राम पुलाच्या दुर्घटनेमुळेच हा मार्ग सुरू झाला, पण त्यानंतर मात्र या मार्गाच्या विकासाकडे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. तीन वर्षांत मार्गावर गाड्यांची संख्या वाढवण्यासाठी किंवा सुविधा पुरवण्यासाठी लोकप्रतिनिधींकडून कोणताही ठोस प्रतिसाद मिळालेला नाही.

प्रवाशांच्या प्रमुख मागण्या: कनेक्टिव्हिटी आवश्यक प्रवाशांच्या सोयीसाठी आणि मार्गाचा पूर्ण क्षमतेने उपयोग होण्यासाठी खालील महत्त्वाच्या मागण्या प्रलंबित आहेत:

१) डेमोची कनेक्टिव्हिटी: नागपूर-मुंबईकडे जाणाऱ्या रेल्वेच्या वेळांशी जुळवून 'डेमु' (ऊएचण) ची कनेक्टिव्हिटी सुरू करावी.

२) आरक्षण काउंटर: अकोट रेल्वे स्थानकावर तातडीने तिकीट आरक्षण (ठशीर्शीरींळेप) काउंटर सुरू करण्यात यावे.३) फेऱ्या वाढवा: मार्गावरील सध्याच्या फेऱ्यांमध्ये किमान दोन फेऱ्यांची वाढ करण्यात यावी.४) लोको रिव्हर्सल: अकोट येथे इंजिन रिव्हर्सल (ङेले ठशींशीीरश्र) ची व्यवस्था करण्यात यावी.५) सुविधा व स्टाफ: अकोट रेल्वे स्थानकावर पुरेशी प्रकाश व्यवस्था आणि आवश्यक ऑफिस स्टाफ देण्यात यावा.प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि खंडवा रेल्वे मार्गाचे काम पूर्ण होईपर्यंत या ब्रॉडगेज मार्गाचा अधिक चांगला वापर करण्यासाठी तातडीने या मागण्या पूर्ण करणे आवश्यक आहे.

### कै काकासाहेब ठोंबरे स्मृती सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने दोन दिवसीय व्याख्यानमाला

**अकोला:** वाचकांच्या बौद्धिक विकासासाठी अनेक उपक्रम राबविणाऱ्या स्थानिक कै काकासाहेब ठोंबरे स्मृती सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने वाचनालयाच्या संस्थापिका स्व बेबीताई हरिदास यांच्या स्मृती प्रित्यर्थ दोन दिवशीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.दिनांक २९ व ३० नोव्हेंबर रोजी सायं ६ वाजता जठारपेठ रोडवरील रा.तो. आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित या दोन दिवशीय व्याख्यान मालेत प्रख्यात लेखिका, बहुभाषिक समीक्षक, संस्कृत व अध्यात्मिक तज्ञ डॉ धनश्री लेले या विविध विषयावर व्याख्यान सादर करणार आहेत. शनिवार दि २९ नोव्हेंबर रोजी साय ६ वाजता अविनाश देव यांच्या अध्यक्षतेत आयोजित या व्याख्याना च्या प्रथम पुष्पात डॉ लेले या ज्ञानेश्वरीतील कर्मयोग या विषयावर व्याख्यान सादर करणार आहेत.

# पंचशील वाडीत प्रचंड संताप

## ५२ वर्षांची सत्ता, अडीच वर्षाचे नगराध्यक्षपदः तरीही विकास शून्य

■मुर्तिजापुर,दि २२ (प्रतिनिधी) :

मुर्तीजापूर नगर परिषद निवडणुकीच्या तोंडावर प्रभाग क्रमांक ६, पंचशील वाडीत नागरिकांचा रोष टोकाला पोहोचला आहे. दलित वस्ती असलेल्या या भागात आजही रस्ते नाहीत, घरकुल नाही, नळ आहेत पण पाणी नाही. नाल्यांची सफाई होत नाही, कचऱ्याचे ढीग दररोज वाढत आहेत. नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याने संताप उफाळला असून दलित वस्तीचा निधी इतरत्र वळवला गेला का, हा गंभीर सवाल थेट जनतेतून उपस्थित होत आहे. नजुल समस्येमुळे घरकुलाचा लाभ मिळत नाही आणि वारंवार नगर प्रशासनाला गुहार करूनही न्याय मिळाला नाही, अशी कडवट भावना नागरिकांत खोलवर रुजली आहे.या सर्व परिस्थितीत अर्धशतकाहून अधिक काळ प्रभागावर सत्ता उपभोगणारे आणि योगायोगाने नगराध्यक्षपदाचा अडीच वर्ष लाभ मिळवणारे माजी नगरसेवक निशाण्यावर आहेत. अडीच वर्ष नगराध्यक्ष म्हणून मिळालेल्या शेवटच्या सहा महिन्यांचा कार्यकाळ अचानक दुसऱ्याला का देण्यात आला, यामागील गुप्त हेतू नेमका कोणता होता आर्थिक, राजकीय की स्वतःच्या फायद्यासाठीचा काही सौदा? या तर्कवितर्कांमुळे संपूर्ण तालुक्यात चर्चा पेटली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की माजी नगरसेवकांनी स्वतःच्या




शाळेच्या कामांसाठी प्रशासनावर दबाव, तक्रारी आणि प्रसिद्धीसाठी माध्यमांचा वापर केला, परंतु प्रभागाच्या विकासासाठी मात्र एकही ठोस पाऊल उचलले नाही.पंचशील वाडीतील नागरिक आज एका सुरात म्हणत आहेत ५२ वर्षे दिली, विश्वासाचा गैरवापर झाला. आमच्या वाडीत एक वीटही लावली नाही, आणि आम्हाला फक्त आश्वासनांची धूळ दिली. आता नाही चालणार!ङ्ग प्रभाग क्रमांक ६ मध्ये नागरिकांनी यंदा निष्पक्ष, स्वच्छ प्रतिमेचा, जमिनीवर उतरून काम करणारा खरा गरिबांकडे पाहणारा युवानेता निवडण्याचा ठाम निर्णय घेतला आहे.पंचशील वाडीत उसळलेला हा संताप आता मुर्तीजापूरच्या राजकीय वातावरणाचे समीकरणच बदलून टाकेल, अशी चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

### जुने शहर परिसरातील स्मशानभूमीची दुरवस्था

**अकोला :** जुने शहरातील स्मशानभूमीची दुरावस्था झाली आहे. अपुरा निधी, प्रशासकीय दुर्लक्ष आणि लोकप्रतिनिधींच्या निष्काळजीपणामुळे जुन्या शहरातील गुलजार पुऱ्यातील स्मशान भूमीची अनेक दिवसांपासून दुरावस्था झाली आहे. अग्निसंस्कारासाठी जागा नसणे. सोयी सुविधांचा अभाव, आहे.अस्वच्छता आणि सुरक्षा नसणे, यासारख्या समस्या उद्भवत आहेत. याकडे स्थानिक प्रशासन आणि आजी- माजी नगरसेवक या समस्यांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे दुरवस्था वाढतच आहे. स्मशानभूमीच्या छतावरिल टिनपत्रे सडले. सरणावर पावसाचे पाणी गळत असते. स्मशानभूमींमधील लोखंडी खांब किंवा सिमेंटचे खांब जुने झाले आहेत. कचरा साचलेला असून, अस्वच्छता पसरलेली आहे. या समस्येवर तोडगा काढण्याची मागणी होत आहे.

## अकोल्यात साधना सत्संग सोहळा उत्साहात संपन्न



■अकोला,दि २२ (प्रतिनिधी) :

सनातन संस्थेच्या वतीने जिज्ञासूंसाठी साधना, स्वतःतील स्वभावदोष व अहंकार निर्मूलन कसा करावा तसेच सण , व्रत वैकल्प यांचा अध्यात्म शास्त्रीय दृष्टिकोन ; प्रत्यक्ष आणि ऑनलाइन सत्संगाच्या माध्यमातून सांगण्यात येतो.अकोला शहरातील सत्संगाशी जोडलेले शंभर जिज्ञासूंनी आज सत्संग सोहळ्याचा लाभ घेतला.जीवनामधील सत्संगाच महत्व विशद करताना सौ मंगला पांडे म्हणाल्या 'सत्संगत्वे नि: संगत्वम्' अर्थात विविध प्रलोभनामुळे मनुष्य मायेमध्ये बद्ध झालेला आहे. सत्संगामुळे मायेचे आवरण नष्ट होऊन मनुष्याला जीवनाचा खरा उद्देश समजायला लागतो . साधने संबंधित योग्य कृती केली तर तो अंतिम ध्येय मोक्षप्राप्ती प्राप्त करू शकतो. कारण अध्यात्म हे कृतीच शास्त्र आहे. त्यानंतर उपस्थितांना सेवा करणारे साधक यांचा परिचय करून देण्यात आला. सोहळ्यातील जिज्ञासूंना मार्गदर्शन करताना सौ आनंदी वानखडे यांनी जीवनातील व्यष्टी व समष्टी साधनेचे फरक व महत्त्व समजावून सांगितले.त्या म्हणाल्या 'साधना' म्हणजे ईश्वर प्राप्तीसाठी दररोज करावयाचे प्रयत्न. या साधनेचे दोन प्रकार आहेत.

# सुज्ञ नागरिक शांतः ध्येयनिष्ठ उमेदवार हताश! मुर्तिजापूरला कोण नेणार पुढे?

■मुर्तिजापुर,दि २२ (प्रतिनिधी) :

नगरपालिकेला आदर्शस्थान बनविण्याचे स्वप्न घेऊन उभे राहिलेले सुज्ञ, सुविद्य व जेष्ठ नागरिक सेवकराम लहाने यांनी अपक्ष उमेदवारी दाखल करून नगरविकासाचा भक्कम रोडमॅप जनतेसमोर मांडला होता. दरमहा जनता दरबार, एक दिवस आड पाणीपुरवठा, जुन्या दर्यापूर मार्गावरील रेल्वेगेटखाली भुयारी मार्ग, सांस्कृतिक भवन व पत्रकार भवन, अभ्यासिकेची क्षमता हजार विद्यार्थ्यांपर्यंत वाढविणे, नालेसफाई व कचरा व्यवस्थापनाचा मासिक आढावा, दिल्लीच्या धर्तीवर नगरपालिका शाळांचे आधुनिकीकरण, रेन हार्वेस्टिंगची सक्ती, नगरपालिका हद्दीतील वृक्षांना टॅगिंग, ऑनलाईन तक्रार नोंदणीसाठी वेबसाइट, तसेच शुक्रवार बाजार उड्डाणपुलावर स्ट्रीटलाईट अशी भक्कम, वास्तववादी व तातडीची कामांची यादी त्यांनी लोकांसमोर ठेवली होती.

पारदर्शकतेसाठी वचननामा व व्हिडिओ प्रसिद्ध करून लोकांचा प्रतिसाद जाणून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला; परंतु अपेक्षित सुज्ञ नागरिकांकडून प्रतिक्रिया न मिळाल्यामुळे त्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाला. केवळ काही मोजक्या जागरूक नागरिकांनीङ्गमाधवराव पाटील काळे, प्रा. सुधाकर गौरखेडे, अरुण बोंडे, राजूभाऊ वानखडे, प्राचार्य डॉ. श्रीकांत तिडके, प्रमोद राजंदेकर, प्रशांत हजारी, नंदकिशोर बबानिया, डॉ. समृद्धी तिडकेङ्गत्यांच्या



प्रामाणिक ध्येयवेडाचे कौतुक केले, मात्र व्यापक समाजातून पाठिंबा न आल्याने तीन दिवसांच्या मन:स्तापानंतर सेवकराम लहाने यांनी अखेर आपली उमेदवारी मागे घेतली.

नगरातील जनतेच्या पैशाची ओरबाड, अनागोंदी कारभार आणि वर्षानुवर्षे चालणाऱ्या बेफिकीर व्यवस्थेमुळे नागरिकांचे हताश चित्र सर्वत्र दिसत असताना, विकासाचे ठोस स्वप्न मनाशी बाळगून उभे राहणाऱ्या उमेदवारांना साथ न मिळणे ही समाजाचीच हानी आहे. मुर्तिजापूरचा विकास एका ध्येयनिष्ठ उमेदवाराच्या माघारीमुळे पुन्हा थांबला असून, आता हीच योग्य वेळ आहेङ्गमतदारांनी प्रत्येक उमेदवाराला प्रश्न विचारण्याची, त्यांना जबाबदार धरण्याची आणि नगरपालिकेचे भविष्य कोणाच्या हाती द्यायचे याचा ठाम निर्णय घेण्याची.

## जानकीबाई डिजिटल शाळेत दंत रोग तपासणी शिबिर




■अकोला,दि २२ (प्रतिनिधी) :

दि बेरार एज्युकेशन सोसायटी अंतर्गत सेवारत असणाऱ्या जानकीबाई डिजिटल इंग्लिश स्कूलमध्ये बाल विद्यार्थ्यांची दंतरोग तपासणी करण्यात आली. या शिबिरात दंत तज्ञ डॉ कु अक्षया देशपांडे,डॉ शशांक देशपांडे उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी तेजस्वी वानखडे व वर्ग चौथीचा विद्यार्थी कार्तिक खंडेराव यांनी केले. दरम्यान शिबिर प्रारंभ पूर्वी वैद्यकीय वर्गाने उपस्थित विद्यार्थ्यांची संवाद साधला. दिवसातून दोन वेळा ब्रश करणे, अति तेलकट ,अति गोड पदार्थ,चिकट पदार्थ न खाणे,जेवणानंतर चूळ भरून तोंड स्वच्छ करणे आदी माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी दाताच्या संदर्भात अनेक प्रश्न विचारले.वैद्यकीय वर्गाने या प्रश्नांचे निराकरण केले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका अश्विनी गी. देशपांडे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आरोग्य विषयी माहिती दिली. या शिबिरात ना.मा. चौधरी मराठी माध्यमिक शाळेच्या बाल विद्यार्थ्यांनी ही सहभाग घेत शिबिराचा लाभ घेतला.शिबिराच्या सफलतेसाठी दोन्ही शाळेच्या मुख्याध्यापिका शिक्षिका, कर्मचारी आदींनी मेहनत घेतली.

### अमरावती सेकन्ड कॅम्पसाठी निवड

अकोला : अधिकारी कॅप्टन डॉ. अनिल तिरकर यांनी या दोन्ही कॅडेट्सचा विशेष गौरव केला. बीजीई सोसायटीचे अध्यक्ष अॅड. मोतीसिंह मोहता, वरिष्ठ उपाध्यक्ष विजय तोष्णीवाल, मानद सचिव डॉ. पवन माहेश्वरी यांच्यासह कार्यकारी सदस्यांनी या कामगिरीबद्दल कॅडेट्सचे कौतूक केले आहे.

### श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा वतीने

# मतदार जनजागृती अभियान रॅली




■तेल्हारा,दि २२ (प्रतिनिधी) :

तेल्हारा येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा यांच्या वतीने व तहसील कार्यालय तेल्हारा व नगरपरिषद तेल्हारा पोलिस स्टेशन तेल्हारा यांच्या संयुक्त विद्यमानाने मतदार जनजागृती अभियान रॅली काढण्यात आली यावेळी व्हि डी गावंडे मुख्याध्यापक व बाळासाहेब पाटील मार्के आजिव सदस्य यांनी हिरवी झेडी देऊन सुरूवात केली आहे.यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले आहे मतदार जनजागृती संदेश जनसामान्यांना दिला आहे.एन सी सी पथक, बँड पथक शाळेतील हरितक्रांती सेनापथक यांनी सहभाग घेतला आहे यावेळी नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला आहे.शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी वर्ग विद्यार्थी उपस्थित होते रॅली चे सुत्रसंचालन शांतीकुमार सावरकर ,सौ. शर्वरी हिंगणकर यांनी केले आहे तहसील कार्यालय ,नगर परिषद, पोलिस स्टेशन तेल्हारा यांनी सहकार्य केले आहे.

**सार्वजनिक सूचना**

मी AMAR DADARAO WARTHE हे जाहीर करतो की माझे नाव चुकीने AMAR DADARAO WARATHE असे नोंदविण्यात/मुद्रित करण्यात आले आहे.माझे योग्य नाव AMAR DADARAO WARTHE आहे. पुढे सर्व ठिकाणी मला AMAR DADARAO WAR>THE या नावाने ओळखण्यात यावे.

## आदित्य, सुगत, अभिजितची वेस्टर्न इंडिया स्पर्धेसाठी निवड

**अकोला :** मध्यप्रदेशातील उज्जैन येथे होणाऱ्या मेयर ट्रॉफी- वेस्टर्न इंडिया झोनल बॉडी बिल्डिंग चॅम्पीयनशीप २०२५ स्पर्धेसाठी अकोला जिल्हा संघात आदित्य अवस्थी, सुगत इंगळे आणि अभिजीत या शरीरसौष्ठव पटूची निवड करण्यात आली आहे. येत्या ३० नोव्हेंबर रोजी मेयर ट्रॉफी- वेस्टर्न इंडिया झोनल बॉडीबिल्डिंग चॅम्पीयनशीप स्पर्धा उज्जेनच्या नगरपालिका निगम, कार्तिक मेला परिसर क्रिष्णा रिव्हर येथे आयोजित आहे. या स्पर्धेसाठी मृत्युंजय जीम अॅन्ड फिटनेस सेंटर येथे निवड चाचणी घेण्यात आली त्यामध्ये सुगत इंगळे - ५५-६० वजनगट, आदित्य अवस्थी - ६५-७० वजनगट आणि अभिजित घाटोळे ९० किलो वजनगटात निवड करण्यात आली. सदर निवड चाचणी बॉडी बिल्डिंग अॅन्ड फिजिक स्पोर्टस असोशिएशनचे जिल्हाध्यक्ष संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आली.

**CHANGE IN NAME**

I have change my name
Old Name :
**Mujibullah Khan Habib Khan**
New Name :
**Mujeeb Ullah Khan Habeeb Khan**
**Address:** Mujawar Pura Patur Tq Patur Distt.Akola 444501 Maharashtra (India)

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Educational Documents
-------From-------
**Vishnudas Narayan Mondokar**
--------To---------
**Vishnudas Narayanrao Mondokar**
My Residential Address is :--- Near Pundalik Baba Mandir, Ranpise Nagar Akola 444001

# संत सोने असून त्यांचे साहित्य परिस आहेः ह भ प सावळे गुरुजी

■पातुर,दि २२ (प्रतिनिधी) :

संत हे अस्सल सोने असून त्यांचे साहित्य परिस आहे ज्ञानेश्वर माऊलीची ज्ञानेश्वरी तुकाराम महाराजांची गाथा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीता हे परिस असून ज्या लोकांनी त्यांच्या उपदेशावर आधारित या ग्रंथाचे वाचन करून आचरण केले त्या गुरुदेव प्रेमींचे सोने झाल्याशिवाय राहणार नाही असे मत पातुर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सेवा आश्रम येथे आयोजित संत ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळा तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यतिथी निमित्त काल्याच्या किर्तन प्रसंगी सावळे गुरुजींनी मत व्यक्त केले पातुर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सेवाश्रमामध्ये दिनांक १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर पर्यंत अध्यात्मिक सोहळ्याचे



आयोजन करण्यात आले होते या सात दिवसीय सत्संग सोहळ्यामध्ये सकाळी सामुदायिक ध्यान तर सकाळी नऊ वाजता पासून ग्रामगीता ग्रंथाचे सामुदायिक पारायण सायंकाळी सामुदायिक प्रार्थना तर रात्री आठ ते दहा या वेळेत राष्ट्रीय कीर्तनाचा कार्यक्रम होता यामध्ये बाल कीर्तनकार कुमारी प्रार्थना अटायकर,शिवाजी कुकडकर,संजय महाराज पाटील,सौ शालिनी पाटील, सौ अर्चना उमाळे, सौ नर्मदा गाडगे,सौ योगिता उमाळे, सौ शोभाताई कोथळकर,दिलीप खा करे,अरविंद भाजीपाले सौ माला भाजीपाले सौ वंदना देवकर, श्रीमती वर्षा आटायकर, श्रीमती नंदाबाई इंगळे आदी कीर्तनकार गुरुवर्य तीमांडे महाराज यांच्याकडून प्रशिक्षित झालेले महिला पुरुष यांनी या सात दिवस सोहळ्यामध्ये राष्ट्रीय कीर्तन करून सेवा दिली. या अध्यात्मिक सोहळ्यामध्ये एकादशीच्या दुसऱ्या दिवशी बाराच निमित्त सुधाकरराव उगले अमोल उगले महेश उगले आदींनी त्यांचे बाल भजन मंडळ महिला मंडळ च्या वतीने खंजिरी भजन गाऊन सेवा दिली काल्याचे किर्तन सावळे गुरुजी यांनी केले तर या संपूर्ण अध्यात्मिक सोहळ्याला कवळेश्वर भजन मंडळाचे जयवंत पुरुषोत्तम तथा संत सिदाजी महाराज भजन मंडळाचे सेवानिवृत्त प्राध्यापक विलासरावजी राऊत गजानन गिरे बापू ठाकरे बापू राजूभाऊ संजय राऊत आदींनी साथ संगत दिली काल्याच्या कीर्तनानंतर सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली.

### ईलना संघटनेच्या अध्यक्षपदी प्रकाश पोहरे यांची सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड

■अकोला,दि २२ (प्रतिनिधी) :



इंडियन लँग्वेजेस न्यूज पेपर्स असोसिएशन (ईलना) ची ८१ वी वार्षिक आमसभा दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदन येथे देशभरातील वृत्तपत्र मालक व संपादकांच्या उपस्थितीत पार पडली. सोशल मीडिया असोसिएशनचे अध्यक्ष व ईलनाचे माजी अध्यक्ष सुनील डांग यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा संपन्न झाली. नियमित विषयांची पूर्तता झाल्यानंतर, निवृत्तीमुळे रिक्त झालेल्या ७ कार्यकारिणी सदस्यांच्या जागांसाठी निवडणुकीची घोषणा करण्यात आली. या निवडणुकीसाठी सुनील डांग निवडणूक अधिकारी म्हणून उपस्थित होते. सर्व ७ सदस्य बिनविरोध निवडून आल्याची घोषणा करण्यात आली. निवडून आलेल्या सदस्यांमध्ये प्रकाश पोहरे, रवी विष्णोई, अंकित बिश्नोई, देवेंद्रसिंग तोमर, ललित भारद्वाज, अर्जुन चोपडा आणि संजय गुप्ता यांचा समावेश आहे. नंतर झालेल्या नवीन कार्यकारिणीच्या बैठकीत विदर्भ पब्लिकेशन ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर व देशनोन्नती, राष्ट्रप्रकाश आणि कृष्कोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे यांची सलग दुसऱ्यांदा ईलनाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ेमला स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )**

# शालेय विद्यार्थ्यांच्या आत्महत्या आणि सामाजिक वास्तव

आज संपूर्ण समाजाला हादरवून सोडणारी आणि मानवी संवेदनांना प्रश्न विचारणारी सर्वात गंभीर घटना म्हणजे शालेय विद्यार्थ्यांच्या आत्महत्या. शाळेतील मुलांच्या हातात पेन, वही, स्वप्नं आणि भविष्य असावं; पण त्यांच्या हातात दोरी, ब्लेड किंवा आत्महत्येचे मार्ग येऊ लागले, ही केवळ व्यक्तिगत समस्या राहिलेली नाही, तर ती आपल्या शिक्षण पद्धतीचा, कुटुंबीय संस्कारांचा, डिजिटल युगातील स्पर्धेचा आणि समाजाच्या यंत्रणेचा परिणाम आहे.

----------------

अलीकडे घडलेल्या अनेक आत्महत्यांच्या घटना, विशेषतः दिल्ली, पुणे, कोटा, वर्धा आणि इतर भागातील विद्यार्थ्यांच्या मृत्यूने संपूर्ण समाजाच्या मनावर प्रश्न निर्माण केला आहे की अखेर एवढं काय घडलं की एक निष्पाप विद्यार्थी स्वतःचं जीवन संपवण्याचा निर्णय घेतो? समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास विद्यार्थी आत्महत्या ही वैयक्तिक कमजोरी नसून सामाजिक दाब, सांस्कृतिक अपेक्षा, कौटुंबिक वातावरण, शालेय मूल्यांकन पद्धती आणि मानसिक आरोग्याविषयीच्या अज्ञानाची संयुक्त निर्मिती आहे.

आजच्या कुटुंब रचनांमध्ये मुलांची संख्या कमी झाल्याने एकुलता एक किंवा लाडका-लाडकी संस्कृती वाढली आहे. पालकांच्या नजरेत मुलं आता निर्माण करायचे चारित्र्य नसून गुंतवणुकीवर मिळणारा परतावा झाली आहेत. जेथे पालक स्वतःच्या अपूर्ण आकांक्षा, सामाजिक प्रतिष्ठा आणि आर्थिक स्पर्धा मुलांच्या शिक्षणावर लादतात. त्यामुळे मुलांवर अपेक्षांचे ओझे वाढते.

अनेक मुलांमध्ये ताण सहन करण्याची कौशल्ये विकसितच होत नाहीत. पूर्वीच्या संयुक्त कुटुंबात भावंडे, आजी-आजोबा, खेळ, शिक्षा, शिस्त आणि संवाद होते; आज मात्र घरात शांतता आहे पण मनांत आवाज आहेत, मोबाईल आहे पण संवाद नाही, महागडी शाळा आहेत पण भावनिक शिक्षण नाही. शिक्षा किंवा मयार्दा लावणे आता मानसिक हिंसा समजली जाते आणि मुलांना अपयश किंवा नकार स्वीकारण्याची मानसिक सवयच राहत नाही.

अलीकडच्या काळात शालेय विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण चिंताजनकपणे वाढताना दिसत आहे. शाळा म्हणजे ज्ञान, शिस्त, समविचारांची देवाणघेवाण आणि भविष्याचे घडते पाऊल असे आपण मानतो; परंतु जेव्हा हीच शाळा, हा शैक्षणिक प्रवास विद्यार्थ्यांसाठी जिवाभावाचा भार बनतो, तेव्हा समाजाची मूल्यव्यवस्था किती बदलली आहे हे प्रकर्षाने जाणवते.

आत्महत्या ही केवळ वैयक्तिक निर्णय नसतो; तो एक सामाजिक संदेश असतो की कुठेतरी काही चुकले आहे, आणि गंभीरपणे चुकत आहे. शालेय वयातील विद्यार्थ्यांनी आत्महत्या करणे हे सामाजिक, कौटुंबिक, शैक्षणिक आणि मानसिक आरोग्याच्या घटकांचे गुंतागुंतीचे मिश्रण आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून ही समस्या पाहिली तर या घटना केवळ काही दुःखद किस्से नाहीत, तर वाढत्या सामाजिक दडपणाचे प्रतिबिंब आहेत.

आजचा विद्यार्थी कट्टर स्पर्धेच्या जगात जगत आहे. शाळा म्हणजे फक्त वर्ग, पुस्तके आणि परीक्षा नव्हे; ती स्पर्धेची रणभूमी झाली आहे जिथे पहिले येणारेच यशस्वी मानले जातात, बाकी सर्व हरलेले ठरविले जातात. विद्यार्थ्यांच्या भावनिक जगण्यापेक्षा त्यांच्या गुणपत्रिकेला अधिक प्रतिष्ठा दिली जाऊ लागली आहे.

शिक्षकांची अपेक्षा, पालकांचे स्वप्न आणि समाजाचे मूल्यांकन या तिपेडी दडपणाखाली विद्यार्थी स्वतःचा वेगळा आवाज हरवून बसतात. मानसिक आरोग्याला अजूनही नाजूकपणा समजले जाते आणि मुलांवर होणारा भावनिक ताण अदृश्य राहतो.

अशा परिस्थितीत जेव्हा विद्यार्थी मोठ्या भावनिक आव्हानांशी झुंजतात, तेव्हा त्यांना आधार, संवाद किंवा समजून घेणारा हात मिळत नाही आणि ते मौनात तुटू लागतात.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
समाजशास्त्राचे अभ्यासक

कुटुंबव्यवस्था या समस्येत निर्णायक भूमिका बजावते. अणुकुटुंबामुळे संवाद आणि भावनिक सहजीवन कमी झाले आहे. पालकांच्या नोकऱ्या, व्यस्त दिनक्रम आणि तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेले दैनंदिन जीवन मुलांशी असणाऱ्या संवादाला बाधित करत आहे.

अनेकवेळा मुलांचे मी ठीक नाही, मला भीती वाटतेह्न, मला जमत नाही हे संकेत पालकांच्या लक्षातही येत नाहीत. दुसरीकडे एकुलता एक किंवा कमी अपत्य असलेल्या कुटुंबांमध्ये मुलांवर अतिप्रेम, अतीसंरक्षण आणि त्याचबरोबर अवास्तव अपेक्षा यांचे अनोखे मिश्रण तयार झाले आहे. परिणामी, मुलांनी चुका करणे किंवा अपयश स्वीकारणे अशक्य झाले आहे. तू कसं नाही करू शकत?, इतर मुलं करू शकतात मग तू का नाही? या प्रश्नापेक्षा त्यांना हवं असतं ते तुला काय त्रास होतोय? मी आहे ना.

शाळांनी मुलांना फक्त ज्ञान देऊन चालणार नाही; त्यांना भावनिक स्थैर्य, ताणतणावांचं व्यवस्थापन, आत्मस्वीकृती आणि जीवनकौशल्ये शिकवणे अधिक आवश्यक आहे. परंतु शिक्षण पद्धतीत परीक्षांच्या, रँकिंगच्या आणि कामगिरीच्या आकड्यांना अधिक महत्त्व देण्यात येते.

इथे विद्यार्थ्यांचे मानसिक जग समजून घेणारी, त्यांची भीती कमी करणारी आणि त्यांना मानवी मूल्ये शिकवणारी प्रणाली अद्याप रुजली नाही. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील नातेसंबंधही यांत्रिक झाले आहेत ते म्हणजे नाव, चेहरा आणि रोल नंबर एवढ्यापुरतेच. शालेय परिसरातील छळवाद, टोमणे, अपमान आणि शिक्षकांकडून होणारा ताण व ओरडणी हे अनेक विद्यार्थ्यांसाठी असह्य वास्तव बनते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून जर या घटनांचा विचार केला, तर एमिल दुर्खाइमच्या अनोळखी आत्महत्या या संकल्पनेशी त्यांची तुलना करता येते. जेव्हा समाजातील मूल्यव्यवस्थेत अचानक बदल होतात आणि व्यक्तीला त्यांच्याशी जुळवून घेता येत नाही, तेव्हा आत्महत्येचे प्रमाण वाढते.

आजचा समाज यश, पैसा, स्पर्धा आणि प्रतिष्ठा या चार स्तंभांवर उभा आहे, जिथे करुणा, संवाद, शांतता, संवेदनशीलता आणि स्वीकार यांना कमी जागा मिळते. सोशल मीडियामुळे तुलना, अपूर्णतेची भावना, लोकप्रियता आणि "इतरांसारखे होण्याची" जबरदस्त इच्छा विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर परिणाम करत आहे. तंत्रज्ञानाने जग जवळ आणले पण हृदये दूर नेली आहेत.

ही परिस्थिती बदलण्यासाठी कुटुंब, शाळा, समाज आणि शासन यांना एकत्रित प्रयत्न करावे लागतील. विद्यार्थ्यांना आत्महत्या हा मार्ग नसून त्यांच्यासाठी मदत उपलब्ध आहे, अशी जाणीव निर्माण होणे अत्यावश्यक आहे. शाळांमध्ये काउन्सेलिंग केंद्रे, मानसिक आरोग्य तज्ञ, हेल्पलाईन, "ओपन कन्वर्सेशन" तास, सहानुभूतीवर आधारित शिक्षण आणि ताण व्यवस्थापनाचे प्रशिक्षण असणे आवश्यक आहे.

पालकांना मुलांशी भावनिक नातेसंबंध बांधण्याचे प्रशिक्षण देणे तितकेच महत्त्वाचे आहे. समाजाने गुणांवर आधारित मुलांचे मूल्यांकन करणे थांबवून त्यांची मूल्ये, आवडी, कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व ओळखण्याची गरज आहे.

शेवटी, प्रत्येक बालक हे अपूर्ण, वाढणारे, शिकणारे आणि चुका करणारे अस्तित्व आहे, विद्यार्थी हे प्रकल्प नसतात, ते जगणारे जीव असतात. आत्महत्येने संपणारी मुलांची स्वप्ने ही केवळ त्या मुलाची हानी नसून संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेचा मृत्यू आहे.

आज आपण मुलांना शिकवतो कसे जिंकायचे, स्पर्धा कशी करायची, पण जीवन जगायचे कसे हे शिकवायला आपण विसरलो आहोत. जोपर्यंत हा विसर दूर होत नाही, तोपर्यंत या घटनांची सावली आपल्या भविष्यातील पिढीवर अंधार बनून राहील. कारण प्रश्न अजूनही तोच आहे की विद्यार्थी अभ्यासासाठी दबावाखाली आहेत की जगण्यासाठी?

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका

# नेत्यांचे वचन वेगळे, वास्तव घराणेशाहीचे

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे कार्यकर्त्यांच्या कष्टांचे, त्यांच्या निष्ठेचे आणि त्यांच्या राजकीय प्रवासाचे शिखर– अशी धारणा नेते दरवेळी औपचारिक भाषणांत मांडतात.

या निवडणुका कार्यकर्त्यांच्या आहेत, पक्षाचा पाया कार्यकर्त्यांनीच उभारला आहे, उमेदवारीसाठी प्रामाणिक मेहनत महत्वाची– अशा अनेक घोषणा हमखास ऐकायला मिळतात. पण प्रत्यक्ष उमेदवारीची यादी जाहीर झाली की या सर्व विधानांचे वास्तवाशी असलेले नाते अचानक दिसेनासे होते.

उमेदवारी सूची पाहिली की लक्षात येते–ही निवडणूक कार्यकर्त्यांची नव्हे, नेत्यांच्या नातेवाईकांचीच. कोणत्या ना कोणत्या पक्षात, सर्वच स्तरांवर, उमेदवारीचा पहिला हक्क घरातील व्यक्तींनाच असल्याचे चित्र दिसते. राजकीय घराण्यांच्या वारसांची निवडणूक ही स्थानिक पातळीवरही परंपरा झाली आहे.



दीपक कैतके
मुंबई.

अनेकदा तर पदाधिकारी आपल्या कुटुंबातील लोकांमध्येच जागांचे वाटप पूर्ण करून ठेवतात. कार्यकर्त्यांनी कितीही वर्ष निष्ठेने झटले, तरी उमेदवारीच्या क्षणी त्यांना पुढच्या वेळेस पाहूह्नअशी थातूरमातूर दिलासा देणारी वाक्येच मिळतात.

ही परिस्थिती केवळ निराशाजनक नाही, तर राजकीय व्यवस्थेतील लोकशाहीच्या मूलभूत संकल्पनेवर प्रश्न उपस्थित करणारी आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे लोकांच्या थेट कारभाराचे प्रतीक. इथे नेमक्या तळागाळातील समस्या समजून घेणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी मिळाली पाहिजे.

तेच कार्यकर्ते वर्षानुवर्षे पक्षासाठी झटतात–मतदार याद्या तपासतात, बूथ बांधतात, प्रसार करतात. पण निवडणूक जवळ आली की त्यांच्याच डोक्यावर नेतृत्वाची नातेवाईकांची सावली येते आणि त्यांच्या श्रमांची किंमतच उरत नाही.

कार्यकर्त्यांच्या मनात दरवर्षी उगवणारी एक हलकीशी आशा या घराणेशाहीच्या राजकारणात कायमच हरवते. त्यांच्या निष्ठेचा उपयोग निवडणुकीत मत मागण्यासाठी होतो, पण उमेदवारपद देताना त्यांची पात्रता, त्यांचा संघर्ष, त्यांचे योगदान–काहीच आठवत नाही.

या परिस्थितीचा सर्वात मोठा तोटा लोकशाहीला आहे. कारण कार्यकर्त्यांच्या अपेक्षा खच्ची झाल्या की पक्षातील तळागाळ कमकुवत होतो. सामाजिक जाण असलेल्या, मतदारांशी थेट संवाद असलेल्या नवीन नेतृत्वाचा उदय थांबतो. आणि लोकशाहीच्या नावाखाली हळूहळू राजकीय वंशावळ मजबूत होत जाते.

आज स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये ही घराणेशाही केवळ अपवाद राहिलेली नाही, तर तीच नीती बनत चालली आहे. आणि याची जाणीव आजच्या मतदारांना तितकीच आहे.

मतदारही आज त्यांच्या समोर उभ्या केलेल्या उमेदवारांकडे प्रतिनिधी म्हणून नव्हे, तर घराण्याच्या वारसांप्रमाणे पाहू लागले आहेत.

लोकशाहीची खरी सुंदरता ही नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आहे, तळागाळातील लोकांना नेतृत्वात स्थान देण्यात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची उद्दिष्टे साध्य करायची असतील तर कार्यकर्त्यांना खरी संधी देणे हे कोणत्याही पक्षाचे कर्तव्य ठरते.

नाहीतर–उमेदवारीचे दरवाजे काही मोजक्यांसाठीच उघडे आणि कार्यकर्त्यांसाठी मात्र कायम बंद राहतील.जाहीर सभांतील नेत्यांचे शब्द आणि प्रत्यक्षातील कृती–दोन्ही नेहमीसारखेच परस्परविरोधी राहतील.

■ ■ ■

# अभ्यासातून घडते मुलांचे खरे व्यक्तिमत्त्व

आज अनेक घरांमध्ये एकच तक्रार ऐकू येते मुले अभ्यास करत नाहीत. सतत मोबाईल, टीव्ही पाहणे, शाळेतून घरी आल्यानंतर दप्तर बाजूला टाकून खेळायला धाव घेणे, अभ्यासासाठी वारंवार सांगावे लागणे या गोष्टी पालकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहेत.

शालेय विद्यार्थी, पालक आणि शिक्षक या सगळ्यांसाठी मुलांचा अभ्यास ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. परंतु केवळ पुस्तकासमोरील वेळ म्हणजेच अभ्यास, अशी संकुचित व्याख्या करणे योग्य ठरेल का? अभ्यास हा केवळ वही-पुस्तकांपुरता मर्यादित नसून तो एक निरंतर चालणारी शिकण्याची प्रक्रिया आहे.

विद्यार्थी जेव्हा घरातून शाळेकडे निघतो, तेव्हा तो आजूबाजूचा परिसर पाहतो, लोकांचे वागणे निरीक्षण करतो, विविध आवाज ऐकतो हे सर्व त्याचेच एक प्रकारचे अप्रत्यक्ष शिक्षण असते.



अरुण सोपानराव कराळे
दत्तवाडी, नागपूर.
९०९६३२६२७२

पाठ्यपुस्तकाबरोबरच अवांतर वाचन, आवडीची गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे, कागदकामातून वस्तू तयार करणे, एखाद्याची मुलाखत घेणे, बाजारात खरेदी करताना पैशांचा हिशोब करणे, सुंदर चित्रे काढणे, खेळात तल्लीन होणे, एखाद्या विषयावर निबंध लिहिणे, दैनंदिनी लिहिणे, गणिती उदाहरणे सोडवणे, कुंडीत झाड लावून त्याचे निरीक्षण करणे, अन्नाची नासाडी टाळणे, पाणी व वीज वाचवणे, परिसर भेटी करणे या सर्व क्रियाकलापांतूनही मुलांचे शिक्षण घडत असते.

अशा विविधांगी अभ्यासातून मुलांमध्ये मूलभूत शैक्षणिक कौशल्ये, भाषिक व गणितीय क्षमता, तर्कशक्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, समयसूचकता, निर्णयक्षमता, हजरजबाबीपणा, नेतृत्वगुण आणि संवाद कौशल्ये विकसित होतात.

जर अभ्यासात नावीन्य, खेळाधारित उपक्रम आणि मेंदूला चालना देणारे आनंददायी अनुभव असतील, तर मुले तो अभ्यास आवडीने करतात. कोणतीही गोष्ट मनापासून केली तर तिचे फळ निश्चितच चांगले मिळते, मग तो अभ्यास असो किंवा इतर कोणतेही काम.

म्हणूनच, मुलांच्या अभ्यासाकडे केवळ पुस्तकातील धडे म्हणून न पाहता, त्यांच्या दैनंदिन जीवनातील प्रत्येक शिकण्याच्या संधीला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. अशा पद्धतीनेच आपण अभ्यासातून मुलांचे खरे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडवू शकतो.

# विरोधी पक्षांच्या शांततेने लोकशाहीची दिशा भरकटली!

भारताची लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते. संविधान, स्वतंत्र न्यायपालिका, स्वायत्त संस्था, निवडणुका, आणि जनतेचे हक्क हे सर्व या लोकशाहीचे मुख्य आधारस्तंभ आहेत. परंतु या सर्वांची खरी शक्ती कुठे असते, तर ती असते सशक्त आणि आक्रमक विरोधी पक्षात.

सत्ताधाऱ्यांकडे अधिकार असतात, परंतु विरोधकांकडे असतो सरकारला जबाबदार धरण्याचा अधिकार,चुकीचे धोरण रोखण्याचा अधिकार, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जनतेचा आवाज बनण्याची जबाबदारी.आज मात्र देशभरात आणि महाराष्ट्रात आपण एक धोकादायक परिस्थिती अनुभवत आहोत .

विरोधी पक्ष कोमात गेला आहे ।त्यांची जागा आता सोशल मीडिया पोस्ट, निवडणुकीपुरते भाषण, आणि अधूनमधून केलेली औपचारिक टीका यांनी घेतली आहे. जनतेवर अन्यायाचा भडिमार पण विरोधक गायब अलीकडच्या काळात जनतेवरील अन्याय, लूट, महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांवरची दडपशाही, कामगारांच्या हक्कांचे क्षीण होणे जनसुरक्षा सारखे कायदे होणे हे अत्यंत वेगाने वाढले आहे.

कापसाच्या दराने शेतकरी अक्षरशः रडत आहेत सोयाबीन उभे राहण्याची किंमतही मिळत नाही. महागाईने घराघरात श्वास घेणे कठिण झाले. नोकरभरती थांबली, बेरोजगारीने विक्रमी उंची गाठली. कामगार कायद्यांतून कामगारांचे संरक्षण कमी झाले. सरकारी सेवांमध्ये मनमानी वाढली. सर्व क्षेत्रात खाजगीकरण होत आहे . आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्याचे प्रमाण भयंकर वाढले. शासकीय यंत्रणेचा गैरवापर होत आहे. या सगळ्याच्या केंद्रस्थानी आहे "सत्ता" ज्याचे वर्तन आक्रमक होत चालले आहे. पण या सर्वांच्या लढ्यात ज्यांनी पुढे येऊन आवाज उठवायला हवं होतं ते विरोधक कुठे आहेत?

कोणत्या रस्त्यावर त्यांचा मोर्चा दिसतो? कोणत्या तालुक्यात त्यांचे सत्याग्रह दिसतात? कोणत्या जिल्ह्यात त्यांचे नेतृत्व जनतेच्या बाजूने लढताना दिसते? उत्तर स्पष्ट आहे . कुठेही नाही! विरोधकांचे राजकारण निवडणुकीपुरते . लोकांचे प्रश्न त्यांना महत्त्वाचे नाहीत. मराठवाडा, विदर्भ, खानदेश, आदी प्रदेश सगळीकडे शेतकऱ्यांचा अक्षरशः आक्रोश ऐकू येतो. पण विरोधी पक्ष फक्त निवडणुकीच्या रॅलीत याबद्दल बोलतात. नंतर पाच वर्षे शांत.

पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना लोकांच्या वेदना दिसतच नाहीत कारण ते फक्त पद, तिकीट, अंतर्गत गटबाजी आणि सोशल मीडिया इमेज यात व्यस्त आहेत.

जनतेची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत असताना विरोधकांची शांतता म्हणजे लोकशाहीवर आघातच आहे. सगळीकडे दिसतात फक्त सामाजिक संघटना, संस्था सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी संघटना आणि यामुळेच लोकशाहीला फटका. विरोधकांचे काम जे आहे ते आता सामाजिक संस्था, युवा संघटना, कामगार संघटना, शेतकरी गट करत आहेत. गावोगावी कापूस घेऊन मोर्चा काढला तर त्यात विरोधक नाही. तहसील कार्यालयावर धरणे धरले तर तेथे विरोधक नाहीत. महागाईविरोधात आंदोलन केले तर त्यात विरोधक नाहीत. कामगारांच्या मागण्यांसाठी मोर्चा निघाला तरी त्यात विरोधक नाहीत. सामाजिक संस्थांनाच सगळा भार उचलावा लागत आहे. याचे दोन मोठे तोटे आहेत लोकशाहीची भुमिका उलटी फिरते. सत्ताधारी पक्ष आणखी बिनधास्त होतो. सरकारकडून जनविरोधी धोरणे विरोधकांनीच स्वीकारली?

आज अनेक क्षेत्रात सरकारकडून घेतलेले निर्णय जनविरोधी आहेतः शेतकऱ्यांसाठी अत्यंत कठोर खरेदी अटी. कामगार कायद्यांत बदल. मालमत्ता हस्तांतरण धोरण आंदोलकांवर गुन्ह्यांचा पाऊस. व्यवहारात सरकारी दडपशाही. शाळा बंद करणे आरोग्याच्या सुविधा न पुरवणे किंवा त्याचे खाजगीकरण करणे. ग्रामपंचायत, नगरपालिका निवडणुकीतील गैरप्रकार. महागाईवरील शून्य नियंत्रण सार्वजनिक उपक्रमांचे जाणीवपूर्वक खाजगीकरण या सर्व विषयांवर विरोधकांनी ठोस भूमिका घेतलीच नाही.

ज्या प्रश्नांवर सरकारला कठीण प्रसंग आला पाहिजे होता, तिथेच विरोधकांनी मौन बाळगले.हे मौन म्हणजे सरकारला अप्रत्यक्ष पाठबळ देणे नाही का? मौनातून समोर येणारा धोक्याचा इशारा विरोधी पक्ष कमकुवत झाला की सरकारची जबाबदारी संपून जाते प्रशासन मनमानी करते, लोकांवर अन्याय वाढतो पत्रकारितेवर दबाव वाढतो आंदोलकांना दडपून टाकले जाते राज्यकर्ते अवैध शक्ती मिळवतात आणि सर्वात महत्त्वाचे जनतेचा आवाज हरवतो आज आपण हाच चेहरा पाहतोय.

गजानन कुसुम ओंकार हरणे
खडकी, अकोला.
9822942623

लोक म्हणू लागले "विरोधक जिवंत आहेत की नाही? "ही स्थितीच लोकशाहीसाठी सर्वात मोठा धोका आहे. जनतेचे प्रश्न अनुत्तरित आणि विरोधकांच्या कपाळावर आठीही नाही. लोकांचे प्रश्न वाढत आहेत, पण विरोधक मात्र त्यात रस घेत नाहीत. कुठेही निर्णायक नेतृत्व नाही. कुठेही संघर्षाची तयारी नाही . कुठेही धोरणात्मक लढाई नाही. भाषणात आक्रमकता, पण कृतीत पोकळपणा. परिणाम असा की आज जनता स्वतःच लढते आहे. शेतकरी स्वतः रस्त्यावर उतरतोय, विद्यार्थी स्वतः मोर्चे काढतोय, कामगार स्वतः संप करतोय, शेतकरी संघटना, सामाजिक संस्था संघटना सामाजिक कार्यकर्ते स्वतः जनतेसाठी न्याय मागतायत विरोधकांची जागा जनतेनेच घेतली आहे . ही स्थिती अत्यंत धोकादायक आहे.

लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर विरोधी पक्षांनी जागं होण्याची हीच योग्य वेळ आहे. एकटे राहुल गांधी आंदोलन करून संघर्ष करून यात्रा काढून सरकारवर दबाव येणार नाही. गावागावात जिल्हात तालुक्यात या अन्यय अत्याचारी शासनाच्या विरोधात आवाज उठणे गरजेचे आहे आंदोलन होणं गरजेचे आहे.

लोकशाही कागदावर लिहिलेल्या संविधानाने जिवंत राहत नाही. ती जिवंत राहते प्रश्न विचारण्यात, आवाज उठवण्यात, अन्यायाविरुद्ध उभे राहण्यात आणि हे काम विरोधी पक्षाशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. म्हणून विरोधी पक्षांनी रस्त्यावर उतरावे. संघर्षात सामील व्हावे, विधानभवनात आक्रमक भूमिका घ्यावी. सरकारला झोप उडवणारे प्रश्न विचारावे. नाहीतर आगामी काळात लोकशाहीचे नुकसान अपरिमित होईल.

विरोधकांनी संघर्ष करणे गरजेचे आहे. सत्तेवर असणारा पक्ष कितीही बळकट असला तरी लोकशाही त्या वेळेपर्यंतच सुरक्षित असते, जोपर्यंत विरोधक तितकेच ताकदवान असतात. विरोधी पक्षांनी आता तरी जागे व्हायलाच हवं. नाहीतर लोकशाही धोक्यात येईल जनता आणखी त्रस्त होईल, सत्ताधाऱ्यांचा दडपशाही प्रवास वाढेल आणि विरोधकांचा इतिहास त्यांना कधीही माफ करणार नाही.

देशाला आज सशक्त सत्ताधारी नाही, तर जागृत आणि आक्रमक विरोधी पक्ष हवा आहे. त्यासाठी सर्वच विरोधी पक्षांनी एकत्रित होऊन संघर्ष, लढा उभारणे काळाची गरज आहे.

# गोल्ड मॉनिटायझेशन योजनेत व्याज व भांडवली नफा मिळविण्यासाठी नेमकी काय प्रोसिजर करावी लागेल?

गेल्याआठवड्यात आपण बघितले कि घरात असलेल्या सोन्याच्या तुकड्यावर किंवा रत्नावरटॅक्स फ्री व्याज मिळू शकते का? आज आपण बघणार आहोत कि या योजनेत व्याज मिळविण्यासाठी काय प्रोसेस किंवा स्टेप्स घ्यावे लागतील. हे नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोतर रुपात राहणार आहे.

**प्रश्न** - गोल्ड मॉनिटायझेशन योजनेतअन्उत्पादित सोन्यावर व्याज मिळविण्यासाठी प्रोसेस करावे लागेल? असे आपण बघितले. प्रोसेस म्हणजे काय?

■ येथे सोप्या भाषेत असे म्हणता येईल की प्रोसेस करणे किंवा स्टेप्स घेणे म्हणजेच व्याज मिळविण्यासाठी तसेच सोन्यावर वाढ सुद्धा मिळविण्यासाठी काय प्रोसिजर आपल्याला करावे लागतील की ज्यामुळे विधीवत कायदेशीर पूर्तता पूर्ण घेऊन या योजनेत आपण पूर्णतः पात्र होऊ.




**प्रश्न** - या योजनेत पूर्णतः पात्र होण्यासाठी किती स्टेप्स घ्यावे लागतील?

■ यासुवर्ण मुद्रीकरण योजनेत पात्र होण्यासाठी चार स्टेप्स घ्यावे लागतील.

## सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.

**प्रश्न** - स्टेप्स 1 काय आहे?

■ या मध्ये पहिली कारवाई अशी की XRF मशीन टेस्ट करावी लागेल. ही टेस्ट म्हणजेच परीक्षा. तुमच्या कडील असलेल्या वस्तूंचे वजन होय. सोप्या भाषेत यालाच असे म्हणता येईल की तुमच्या कडे असलेल्या दागिने किंवा वस्तू मध्ये किती शुद्ध सोनं आहे हे या परीक्षा न. 1 वरून समजेल.

**प्रश्न** - या टेस्ट नं. 1 करण्यासाठी काही खर्च लागतो का?

■ होय, एक सामान्य फीस या योजनेसाठी आकारली जाऊ शकते.

**प्रश्न** - या टेस्ट नं. 1 केल्याचा फलीत काय असतो?

■ याचा फलीत असे असते की येथे तुम्हाला निर्णय घ्यावा लागेल की तुम्हाला सरकारला या योजनेत वस्तू द्यायची आहे किंवा नाही. जर तुम्हाला दागिना द्यायचा असेल तर तुम्हाला काढलेल्या शुद्ध सोन्यावर व्याज मिळेल आणि वस्तू नाही द्यायची असेल तर बिना मेल्टींग केलेला दागिना तुम्ही परत घेऊ शकता. जर दागिना या योजनेत द्यायचा असेल तर तुम्हाला त्याची लेखी परवानगी द्यावी लागेल.

**प्रश्न** - स्टेप्स 2 कायअसते?

■ स्टेप्स 2 म्हणजेच दुसरी प्रोसेस किंवा दुसरी कार्यवाही काय असते. तुम्ही परवानगी दिल्या नंतर या सोन्याच्या वस्तू मधुन धुळ, कॉलर किंवा शर्टचे बटन, मोठ्यामाथाचा खिळा, मीना इत्यादी काढून मग वजन काढले जाते. या नंतर अग्निमुल्यन करून त्याची खरी शुद्धता काढली जाते.

**प्रश्न** - स्टेप्स 3 कायआहे?


याअग्निमुल्यन नंतर जर तुम्हाला परत नसेल तर तुम्ही सोनं परत घेऊ शकता किंवा तुम्ही प्रमाणपत्र घेऊ शकता. 995 फाईननेसस्टॅन्ड गोल्डचे हे प्रमाणपत्र असते.

**प्रश्न** - स्टेप्स 4 कायआहे?

■ या प्रमाणपत्राच्या आधारे तुमचे गोल्ड डीपॉजीट अकाऊंट क्रेडीट केले जाईल. सोनं जमा केल जाईल. बँकके वाय सी करेल.

या विषयाची नवीन अधिकची माहिती पुढील आठवड्यात बघणार आहोत.

■ ■ ■



# कोमट मिठाच्या पाण्यात पाय बुडवणे अनेक आजार होतात बरे

कोमट पाण्यात पाय भिजवणे हा एक सामान्य घरगुती उपाय वाटू शकतो, परंतु त्याचे शरीरावर लक्षणीय सकारात्मक परिणाम होतात. पूर्वी देखील लोकं कोमट पाण्यात पाय बुडवायचेह्न दिवसभर चालल्यानंतर किंवा बराच वेळ उभे राहिल्यानंतर, आपले पाय संपूर्ण शरीराचा भार सहन करतात. म्हणून, दिवसाच्या शेवटी पायांना थोडी विश्रांती देणे खूप गरजेचं. ही प्रक्रिया केवळ शरीराला आराम देत नाही तर मनालाही शांती देते.

कोमट पाण्यात पाय भिजवण्याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. ही पद्धत नियमितपणे अवलंबल्याने काही आजार दूर राहण्यास मदत होते. यामुळे रक्तप्रवाह सुधारतो, ताण कमी होतो आणि दैनंदिन थकवा दूर होतो. कोमट पाण्यात पाय भिजवल्याने तुमच्या शरीराचे तापमान थोडे वाढते, ज्यामुळे रक्तप्रवाह सुधारतो. या प्रक्रियेमुळे तुमच्या पायांच्या नसांमधील ताण कमी होतो आणि वेदना कमी होतात.

जर तुम्ही बराच वेळ उभे राहून काम करत असाल तर हा उपाय तुमच्यासाठी एक नैसर्गिक उपचार म्हणून प्रभावी ठरू शकतो. कोमट पाणी तुमच्या स्नायूंना आराम देते आणि दिवसभराचा थकवा कमी करण्यास मदत करते. ही पद्धत सुरक्षित आणि फायदेशीर मानली जाते, विशेषतः जेव्हा पाय सुजलेले असतात, वेदना होत असतात.

पायांना विश्रांती दिल्याने मानसिक ताण देखील कमी होतो, कारण त्याचा परिणाम संपूर्ण शरीरावर होतो. ज्यांना हिवाळ्यात पाय थंड होण्याची समस्या असते त्यांच्यासाठी हा उपाय पाय उबदार ठेवण्यासाठी आणि रक्ताभिसरण सुधारण्यासाठी खूप उपयुक्त ठरू शकतो.

मिठामध्ये असलेले मॅग्नेशियम आणि इतर खनिजे सूज किंवा जळजळ कमी करण्यास मदत करतात. ते शरीरातील अशुद्धता काढून टाकण्याच्या प्रक्रियेला देखील प्रोत्साहन देते.

खारट पाणी खूप उपयुक्त ठरते, विशेषतः जर पायांना दुर्गंधी किंवा जळजळ सारखी समस्या असेल तर. यासाठी एप्सम मीठ किंवा सिंधव मीठ उत्कृष्ट मानले जाते.

गरम पाण्यात पाय बुडवणे हा तापावरचा एक जुना आणि सुप्रसिद्ध घरगुती उपाय मानला जातो. ही पद्धत शरीराची उष्णता संतुलित करण्यास मदत करते आणि हळूहळू ताप कमी करण्यास मदत करते.

गरम पाण्यात पाय ठेवल्याने तेथील नाड्या सक्रिय होतात आणि शरीराची ऊर्जा स्थिर होते. ही प्रक्रिया शरीराची अतिरिक्त उष्णता खाली खेचते, ज्यामुळे डोक्यातील उष्णता कमी होते. कपाळावर कोल्ड कॉम्प्रेस आणि पायांसाठी गरम पाणी यांचा एकत्रित वापर ताप कमी करण्यासाठी विशेषतः प्रभावी मानला जातो.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



# बंडखोरी..!

कर्तृत्ववान व्यक्तिला
पक्षाने दिली उमेदवारी
तर सांगा बरं पक्षात
कशाला होईल बंडखोरी..!

बंडखोरांना शांत करण्यासाठी
करावी लागते मोठी कसरत
मोठ्ठ चॉकलेट नाही तर
साम दाम दंड भेदची
ठेवावी लागते हैशत!

ईलेक्शन म्हणजे
भौ जुगाराचा डाव
फासे कसे पडतील
सांगता येत नाही राव!

# शालिनीताई मेघे हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या टीमवर्कमुळे अत्यंत धोकादायक गर्भावस्थेत सुरक्षित प्रसूती

**नागपूर, २२ नोव्हेंबर :** वानाडोंगरी, नागपूर येथील १०२० बेड्सच्या शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमध्ये अलीकडेच एक हृदयस्पर्शी आणि उल्लेखनीय घटना घडली. इसासनी, हिंगणा येथील ३० वर्षीय गर्भवती महिलेने प्लासेंटा प्रेव्हिया अक्रीटा या अतिशय उच्च-जोखीमीच्या गर्भावस्थेच्या गुंतागुंतीवर धैर्याने मात केली आणि आई आणि बाळ दोघांनाही सुखरूप डिस्चार्ज देण्यात आला. ही घटना केवळ वैद्यकीय दृष्टीकोनातूनच नव्हे, तर अनेक शस्त्रक्रिया विभागांनी दाखवलेल्या उत्कृष्ट टीमवर्क, नवोन्मेषी उपचारपद्धती आणि समन्वयामुळेही विशेष ठरली.

प्लासेंटा प्रेव्हिया अक्रीटा ही गर्भधारणेदरम्यान आढळणारी अतिशय दुर्मिळ पण जीवघेणी स्थिती आहे. या अवस्थेत प्लासेंटा गर्भाशयाच्या भिंतीत असामान्यरीत्या खोलवर चिकटतो आणि काही वेळा गर्भमुखालाही झाकून टाकतो. त्यामुळे गर्भावस्था किंवा प्रसूतीदरम्यान तीव्र रक्तस्राव होऊ शकतो आणि अशा वेळी आधीच विशेष शस्त्रक्रियेचे नियोजन करणे आवश्यक होते. अनेकदा अशा प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात रक्तस्राव, गर्भाशय काढण्याची गरज किंवा गंभीर परिस्थितीत जीविताला धोका निर्माण होऊ शकतो. अशा रुग्णांवर उपचार करण्यासाठी त्वरित निर्णय, कुशल शस्त्रक्रिया तज्ज्ञ आणि अनेक शस्त्रक्रिया विभागांमधील प्रभावी समन्वय अत्यावश्यक असतो.



या प्रकरणाची गुंतागुंत ओळखून, स्त्रीरोग विभागातील टीमने प्रोफेसर डॉ. स्मिता पराते यांच्या नेतृत्वाखाली, डॉ. स्नेहल देशमुख, डॉ. मृण्मयी हेमाने आणि डॉ. कृष्ण केला तसेच विभागप्रमुख, प्रसूती व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. राजसी सेनगुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली कॅथ लॅबमध्ये अत्यंत उच्च-जोखीमीची क्लासिकल सिझेरियन सेक्शन शस्त्रक्रिया केली. ही पद्धत हॉस्पिटलमध्ये प्रथमच वापरली गेली. इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजिस्ट डॉ. निकुंज चौधरी यांनी गर्भाशयातील आणि इंटरनल इलियाक आर्टरीचे एम्बोलायझेशन करून शस्त्रक्रियेतील रक्तस्रावाचा धोका मोठ्या प्रमाणात कमी केला, ज्यामुळे आईचा जीव वाचवणे अधिक सुरक्षित झाले.

अनेस्थेशिया विभागातील डॉ. करूणा गायकवाड आणि डॉ. प्रियांका पराते, तसेच विभागप्रमुख डॉ. अंजली मोडक यांच्या टीमने शस्त्रक्रियेच्या संपूर्ण काळात रुग्णाची प्रकृती स्थिर ठेवली. नवजात शिशुरोग तज्ज्ञ डॉ. कुश झुनझुनवाला यांनी बाळाला त्वरित आणि योग्य काळजी दिली. रेडिओलॉजिस्ट डॉ. आनंद हतगावंकर आणि डॉ. वैशाली धवन यांनी लवकर आणि अचूक निदान करून या जटिल शस्त्रक्रियेचे नियोजन करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. आयसीयू टीम, ओटी कर्मचारी आणि नर्सिंग टीम सिस्टर विशाखा हिवरकर (एएनएस), सिस्टर भाग्यश्री महाकळकर, सिस्टर सुषमा चव्हाण (एमसीएच), सिस्टर रागिनी, ब्रदर निलेश, सिस्टर प्रेमशिला तसेच कॅथ लॅब टेक्निशियन चैतन्य यांनी शस्त्रक्रियेपूर्वी आणि शस्त्रक्रियेनंतर आवश्यक ते सर्व सहाय्य पुरवले.


या प्रकरणाबद्दल बोलताना प्रोफेसर डॉ. स्मिता पराते म्हणाल्या, प्लासेंटा प्रेव्हिया अक्रीटा ही प्रसूतीशास्त्रातील अत्यंत कठीण आणि जोखमीची स्थिती आहे. यात रक्तस्रावाचा धोका खूप जास्त असतो. त्यामुळे आई आणि तिचे गर्भाशय दोन्ही वाचवण्यासाठी अत्यंत काळजीपूर्वक नियोजन करावे लागते. कॅथ लॅबमध्ये शस्त्रक्रिया केल्यामुळे आम्हाला रक्तस्रावावर प्रभावी नियंत्रण मिळाले. हे यश आमच्या टीममधील उत्कृष्ट समन्वय आणि मातांच्या सुरक्षिततेबद्दलच्या आमच्या वचनबद्धतेचे उदाहरण आहे.

डॉ. अनुप मरार, संचालक नागपूर कॅम्पस, डीएमआयएचईआर (डीयू) यांनी सांगितले, या प्रकरणामुळे आमच्या हॉस्पिटलच्या एकत्रित आणि समन्वित उपचारपद्धतीची ताकद स्पष्ट दिसते. एखादा जीव वाचवण्याच्या उद्देशाने अनेक विभाग एकत्र आले की परिणाम खरोखरच विलक्षण होतो. या अत्यंत उच्च-जोखीमीच्या रुग्णाचा उपचार करण्यासाठी आमच्या संपूर्ण टीमचे कौशल्य, धैर्य आणि नवोन्मेषी उपचारपद्धती पाहून मला अत्यंत अभिमान वाटतो.

शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. वसंत गावंडे म्हणाले की, आई आणि बाळाचा सुरक्षित डिस्चार्ज हा आमच्या हॉस्पिटलसाठी अभिमानाचा क्षण आहे. हे यश दाखवून देते की टीमवर्क, कौशल्य आणि सहानुभूती यांच्या जोरावर सर्वात कठीण वैद्यकीय आव्हानांवरही मात करता येते.

# गौतम अदाणी यांनी इंडोलॉजी मिशनला १०० कोटी रुपयांचे योगदान जाहीर केले

**अहमदाबाद, २२ नोव्हेंबर :** अदाणी ग्लोबल इंडोलॉजी कॉन्क्लेव्हच्या उद्घाटन सत्रात, अदाणी ग्रुपचे अध्यक्ष गौतम अदाणी यांनी भारत नॉलेज ग्राफ बांधण्यासाठी एक ऐतिहासिक वचनबद्धता जाहीर केली. ही कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात भारताच्या सभ्य ज्ञानाचे जतन, रचना आणि भविष्यासाठी योग्य अशी पहिली डिजिटल चौकट आहे.



अदाणी ग्रुप, शिक्षण मंत्रालयाच्या इंडियन नॉलेज सिस्टीम्स (आयकेएस)च्या सहकार्याने, भारताच्या सभ्यता, भाषा, तत्वज्ञान, विज्ञान आणि सांस्कृतिक वारशाचा जागतिक शैक्षणिक अभ्यास - इंडोलॉजीला पुनरुज्जीवित करण्यासाठी तीन दिवसीय ग्लोबल इंडोलॉजी कॉन्क्लेव्हचे आयोजन करत आहे.

कार्यक्रमात मुख्य भाषण देताना, गौतम अदाणी म्हणाले, सुरुवाती म्हणून, भारत नॉलेज ग्राफ बांधण्यासाठी आणि या इंडोलॉजी मिशनमध्ये योगदान देणाऱ्या विद्वान आणि तंत्रज्ञांना पाठिंबा देण्यासाठी मी १०० कोटी रुपयांचे संस्थापक योगदान जाहीर करत आहे. ही संस्कृतीच्या कर्जाची परतफेड आहे.

या परिषदेचे प्रमुख पाहुणे स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती जी होते, जगदुरु शंकराचार्य, ज्योतिर्मय मठाचे – पूज्य आचार्यांच्या अखंड वंशातील ४६ वे, ज्यांनी आदि शंकराचार्यांकडे आपला आध्यात्मिक अधिकार दर्शविला आहे.

परिषदेला संबोधित करताना शंकराचार्य म्हणाले, जेव्हा मी शंकराचार्यपद स्वीकारले तेव्हा मी म्हटले होते की जेव्हा भारत विश्वगुरु (जागतिक शिक्षक) होईल तेव्हाच माझी भूमिका अर्थपूर्ण होईल. आणि आज, गौतम अदाणीजींचा पुढाकार माझ्या स्वप्नाला एक मोठा आधार आहे.

ग्लोबल इंडोलॉजी कॉन्क्लेव्ह २० ते २२ नोव्हेंबर २०२५ दरम्यान अहमदाबाद येथील अदाणी कॉर्पोरेट हाऊस (एसीएच) येथे आयोजित केला जात आहे. जगभरातील इंडोलॉजी विभाग आकुंचित होत असताना, हा प्रयत्न भारताच्या ज्ञान प्रणालींवरची मालकी पुन्हा सिद्ध करण्याचा आणि त्यांना एका प्रामाणिक, संशोधन-चालित भारतीय दृष्टिकोनातून जगासमोर सादर करण्याचा प्रयत्न करतो.

जर एखादी संस्कृती आपल्या सांस्कृतिक आणि भावनिक चौकटींचे सक्रियपणे रक्षण करत नसेल, तर मानवी वर्तन संस्कृती किंवा परंपरेकडे नाही तर यंत्राच्या अल्गोरिदमच्या थंड तर्काकडे झुकेल. हा बदल शांत, हळूहळू होईल आणि आपण आपल्या देशाला कसे अनुभवतो, शिकतो आणि त्याचे विश्लेषण कसे करतो हे पुन्हा आकार देईल, असे गौतम अदाणी पुढे म्हणाले.

ही भागीदारी अदाणी समूहाच्या राष्ट्र उभारणीसाठी दीर्घकालीन वचनबद्धतेला एकत्र आणते आणि आयकेएसच्या भारताच्या पारंपारिक ज्ञान चौकटींना समकालीन शिक्षणात समाकलित करण्याच्या आदेशासह. राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० अंतर्गत सुरू केलेले, आयकेएस विविध विषयांमध्ये प्राचीन भारतीय ज्ञानाला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम करते, आंतरविद्याशाखीय संशोधन, ग्रंथ आणि पद्धतींचे जतन आणि अभियांत्रिकी, पर्यावरण विज्ञान, भाषाशास्त्र, सार्वजनिक धोरण आणि आरोग्यसेवा यासारख्या आधुनिक संदर्भांमध्ये व्यावहारिक अनुप्रयोगास प्रोत्साहन देते.

इंडोलॉजीने ऐतिहासिकदृष्ट्या भारताच्या जागतिक समजुतीला आकार दिला आहे, भाषाशास्त्र, खगोलशास्त्र, गणित, प्रशासन, साहित्य आणि आरोग्य विज्ञान यासारख्या विविध क्षेत्रांवर प्रभाव पाडला आहे. परंतु दशकांपासून घटत्या संस्थात्मक पाठिंब्याने त्याची शैक्षणिक खोली कमकुवत केली आहे. या आव्हानाला तोंड देण्यासाठी, अदाणी समूह आणि आयकेएस आघाडीच्या संस्थांमधील १४ पीएचडी विद्वानांना पाठिंबा देण्यासाठी पाच वर्षांचा कार्यक्रम देखील चालवत आहेत. त्यांचे संशोधन पॅनिनियन व्याकरण आणि संगणकीय भाषाशास्त्र, प्राचीन खगोलशास्त्रीय प्रणाली, स्वदेशी आरोग्यसेवा चौकटी, पारंपारिक अभियांत्रिकीमधील शाश्वतता तत्त्वे, राजकीय विचार, वारसा अभ्यास आणि शास्त्रीय साहित्य यांचा समावेश असेल.

आयआयटी, आयआयएम, आयकेएस-केंद्रित विद्यापीठे आणि प्रख्यात विद्वानांचा समावेश असलेल्या कठोर राष्ट्रीय सल्लामसलतद्वारे विद्वानांची निवड करण्यात आली. डेटा सायन्स, सिस्टम थिंकिंग आणि मल्टीमोडल आर्काइव्हिंग सारख्या प्रगत साधनांसह शास्त्रीय ज्ञानाचे एकत्रीकरण करून, हा कार्यक्रम समकालीन शैक्षणिक प्रवचन आणि जागतिक शिष्यवृत्तीसाठी इंडोलॉजीला प्रासंगिक बनवण्याचा प्रयत्न करतो.

जग एक कुटुंब म्हणून या प्राचीन भारतीय नीतिमत्तेच्या वसुधैव कुटुंबकमच्या भावनेत रुजलेला हा उपक्रम अदाणी समूहाच्या भारताच्या सॉफ्ट पॉवर आणि सभ्य नेतृत्वाला बळकट करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करतो.

# नीती आयोग आणि जनाग्रह तर्फे सिटीडेटा ॲण्ड ॲनालिटिक्स प्लॅटफॉर्म (सीडीएपी) सादर



**मुंबई, २२ नोव्हेंबर :** भोपाळ येथे झालेल्या नीती आयोगाच्या डेटा फोरम २०२५ मध्ये मध्य प्रदेशचे मुख्य सचिव अनुराग जैन यांच्या हस्ते सीडीएपी चे अनावरण करण्यात आले. नीती आयोगाच्या मुख्य आर्थिक सल्लागार आणि प्रकल्प संचालक ॲना रॉय यांच्या भाषणाने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर जनाग्रहचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत विश्वनाथन यांनी सीडीएपी ची माहिती दिली. यावेळी जागतिक बँकेचे वरिष्ठ अर्थतज्ज्ञ थॉमस डॅनिअलविट्झ आणि मध्य प्रदेशचे अतिरिक्त मुख्य सचिव (सामान्य प्रशासन विभाग) संजय कुमार शुक्ला उपस्थित होते. त्याचप्रमाणे राज्यातील वरिष्ठ अधिकारी, केंद्र सरकारचे प्रतिनिधी, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ उपस्थित होते.

२०५० पर्यंत भारतातील शहरी लोकसंख्या ८०० दशलक्षचा टप्पा पार करेल, असा अंदाज आहे. सध्या शहरीभागाचा जीडीपीतील वाटा ६३ टक्के आहे. हा सहभागही २०४० पर्यंत ७५ टक्क्यांपर्यंत पोहोचेल. भारतातील शहरांच्या क्षमतांचा पुरेपूर वापर तसेच नागरिकांना उत्तम जीवनशैली मिळण्याची खात्री करण्यासाठी जे लक्ष्यितबदल केले जातील ते विश्वासार्ह, सत्यापित आणि एकात्मिक डेटा माहितीवर आधारित असणे अत्यंत आवश्यक आहे.

सध्या शहरां संदर्भातील डेटा विविध विभाग, शहरी स्थानिक सरकारे आणि निमसरकारी संस्था यांच्या तर्फे स्वतंत्रपणे आणि कोणताही समन्वय न साधता हाताळला जातो. सीडीएपी याच समस्येवर काम करते. राष्ट्रीय, राज्य, जिल्हा आणि शहर पातळीवरील माहिती यामुळे एकत्रित केली जाते. सरकारी डेटा सेट्सच्या साह्याने काम करणाऱ्या या व्यासपीठामुळे विविध क्षेत्रांमध्ये, भौगोलिक पातळीवर आणि वेळेनुसार डेटा दृश्यरूपात सादर करण्याची आणि त्याचे विश्लेषण करण्याची क्षमता उपलब्ध झाली आहे.

सीडीएपी मुळे नगर विकासासाठी डेटावर आधारित निर्णयप्रक्रिया शक्य होईल. तसेच पारदर्शकता, जबाबदारी, सर्व समावेशकता आणि शाश्वततेला चालना देत यात नगर रचना आणि समस्या निराकरणाला स्थानिय पातळीवर सर्वांगिण दृष्टिकोन लाभतो.

कालांतराने या व्यासपीठावर माहितीची सखोलता आणि व्यापकता सातत्याने आणि टप्प्याटप्प्याने वाढत जाईल आणि त्यामुळे जिल्हा, शहर आणि वॉर्ड पातळीवर अधिक समृद्ध डेटा उपलब्ध होईल, असा दृष्टिकोन सीडीएपीच्या संकल्पने मागे आहे. यामुळे पुरावे किंवा सत्य माहितीच्या आधारे नियोजन आणि निर्णय प्रक्रियेला चालना देणाऱ्या प्रमाणित शहरी डेटाचा एक भक्कम पाया तयार होईल.

# एंजल वनने गुंतवणूकदारांना फसवणूक करणारे सोशल मीडिया ग्रुप्स आणि अनधिकृत गुंतवणूक योजनांबाबत केले सतर्क

**नागपूर, २२ नोव्हेंबर :** एंजल वन लिमिटेड या फिनटेक क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने गुंतवणूकदारांना एंजल वनच्या नावाचा गैरवापर करून आणि त्यांचे वरिष्ठ अधिकारी असल्याचे खोटे सांगत फसवणूक करणाऱ्या सोशल मीडिया ग्रुप्सबाबत सतर्क केले आहे.

कंपनीला व्हॉट्सॲप व टेलिग्राम अशा सोशल मेसेजिंग प्लॅटफॉर्म तयार करण्यात आलेले अनेक अनधिकृत ग्रुप्स निदर्शनास आले आहेत, जे एंजल वन लिमिटेडचे ब्रँड नाव व लोगोचा, तसेच त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावांचा व प्रतिष्ठेचा बेकायदेशीर व फसवणूक करणाऱ्या पद्धतीने गैरवापर करत आहेत.

एंजल वन ने ओळखले आहे की फसवणूक करणारे हे ग्रुप्स बेकायदेशीर कृती करत आहेत, जसे आवश्यक सेबी नोंदणी/परवानगीशिवाय सुरक्षिततेसंबंधित सल्ला किंवा शिफारशी देणे, तसेच सेबीच्या मान्यतेशिवाय सिक्युरिटीजशी संबंधित परतावे व कामगिरीबाबत अनधिकृत दावे करणे.

''आम्ही सांगू इच्छितो की, सिक्युरिटीज बाजारपेठेत गुंतवणूकीबाबत अनधिकृत सल्ला देणे किंवा परताव्यांची हमी देणे पूर्णपणे प्रतिबंधित आहे. आम्ही गुंतवणूकदारांना आमच्या कंपनीकडून असल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही संवादाची सत्यता बारकाईने पडताळून पाहण्याचे आवाहन करतो. सखोल संशोधन करत आणि अधिकृत स्रोतांकडून मिळालेल्या माहितीनुसार कायदेशीर गुंतवणूक करण्याचा निर्णय घ्यावा. एंजल वन लिमिटेडचा कोणतेही बनावट ॲप्लीकेशन्स, वेब लिंक्स किंवा खाजगी व्हॉट्सॲप/टेलिग्राम ग्रुप्ससोबत प्रत्यक्षरित्या किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा संबंध नाही आणि फसवणूक करणारे ॲप्लीकेशन्स किंवा वेब लिंक्ससोबत व्यवहार केल्याने होणाऱ्या कोणत्याही आर्थिक नुकसानासाठी किंवा परिणामांसाठी जबाबदार नाही,'' असे एंजल वन ने सांगितले.

एंजल वनने स्पष्टपणे सांगितले की कंपनी अनधिकृत सोशल मीडिया ग्रुप्समध्ये ग्राहकांना सामील करत नाही, मेसेजिंग प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून संवेदनशील वैयक्तिक माहिती देण्याची विनंती करत नाही, अनधिकृत चॅनेल्सच्या माध्यमातून निधी मागत नाही किंवा हमीपूर्ण परताव्यांचे आश्वासन देत नाही. सर्व कायदेशीर व्यवहार फक्त एंजल वनच्या अधिकृत प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून केले पाहिजेत आणि अधिकृत स्रोतांमधून व अधिकृत ॲप स्टोअर्समधून ॲप्लीकेशन्स डाऊनलोड केले पाहिजेत.

एंजल वन गुंतवणूकदारांच्या हितांचे संरक्षण करण्याप्रती आणि सुरक्षित ट्रेडिंग पद्धतींना चालना देण्याप्रती कटिबद्ध आहे. कंपनी सर्व गुंतवणूकदारांना सतर्क राहण्यचे आणि आर्थिक नुकसानापासून संरक्षणासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करते.

सर्वांना अशा कंपन्यांसोबत व्यवहार करण्यापासून दूर राहण्याचा आणि कायदा अंमलबजावणी संस्थांना त्वरित कोणत्याही संशयास्पद क्रियाकलापांची तक्रार करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. तुमच्याबाबतीत कोणताही संभाव्य घोटाळा झाल्यास सायबरक्राइम पोर्टल cybercrime.gov.in च्या माध्यमातून किंवा हेल्पलाइन १३० शी संपर्क साधत किंवा तुमच्या जवळच्या पोलिस स्टेशनमध्ये जाऊन किंवा आम्हाला ceoescalation@angelone.in येथे ईमेल करत संबंधित घोटाळ्याची तक्रार करू शकता.

# आत्मनिर्भरतेसाठी गुंतवणूकदार शिक्षण आणि सहभागात नावीन्य आणण्यासाठी विद्यार्थ्यांना आमंत्रित करत सीडीएसएलने केली आयडीयाथॉनची सुरुवात

**मुंबई, २२ नोव्हेंबर :** आशियातील पहिली सूचीबद्ध डिपॉझिटरी आणि १६.७ कोटींहून अधिक डी-मॅट खात्यांची विश्वासार्ह संरक्षक असलेली सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडने (सीडीएसएल) विद्यार्थ्यांसाठी एक नवीन आव्हानात्मक उपक्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी पहिले आयडीयाथॉन लाँच केले आहे. सीडीएसएलच्या वार्षिक रीइमॅजिन चर्चासत्राच्या तिसऱ्या आवृत्तीअंतर्गत पुनर्कल्पना आयडीयाथॉन हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

भारतातील शिकण्याच्या, गुंतवणूक करण्याच्या आणि वाढीच्या पद्धतीत बदल घडवून आणतील अशा उपाययोजना डिझाइन करण्यात तरुण नवोन्मेषी मनांना गुंतवून ठेवणे हे आयडीयाथॉनचे उद्दिष्ट आहे. जेणेकरून बाजारातील सहभाग अधिक जबाबदार आणि समावेशक होईल.

२१ कोटींहून अधिक गुंतवणूकदारांच्या डीमॅट खात्यांच्या मालमत्तेचे डिपॉझिटरी संरक्षण इकोसिस्टम करते. सिक्युरिटीज मार्केटमधील सहभाग आणखी वाढवण्याची तसेच नागरिकांना याचा फायदा घेण्यापासून रोखणाऱ्या अडथळ्यांना धोरणात्मकरित्या तोंड देण्याची मोठी क्षमता यात आहे.

अधिकाधिक लोकांना आर्थिक क्षेत्रात आणण्यासाठी, त्यांचे दृष्टिकोन समजून घेण्यासाठी तसेच त्यांनी योगदान द्यावे यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी सीडीएसएल तरुण नवोन्मेषकांना प्रोत्साहन देत आहे. सेबी आणि आरबीआय सारख्या नियामकांच्या समान उपक्रमांवर त्यांचे उपक्रम आधारित आहेत.

गुंतवणूकदारांचे शिक्षण वाढवून आणि मोठ्या प्रमाणात जाणीवपूर्वक तसेच जबाबदार सहभाग वाढवून बाजारपेठेतील प्रवेशाचे लोकशाहीकरण करण्याचा प्रयत्न करतो. यातील सहभागी त्यांना आवडेल त्या मार्गांचा वापर करून उपाय शोधू शकतात. मग ते गेमिफिकेशन, वातावरणीय बदल, संवाद, डिझाइन, तंत्रज्ञान किंवा समुदाय-बांधणी, असे कोणतेही असोत. मात्र या उपायांमध्ये सक्षमीकरण, समावेशन आणि विश्वास या तीन प्रमुख तत्त्वांचा समावेश व्हायला हवा.

पुनर्कल्पना आयडीयाथॉन हा एक जबाबदार नवनिर्मितीचा उत्सव आहे. सतत विकसित होत असलेल्या मार्केट लँडस्केपमध्ये, तंत्रज्ञान हे एक उत्प्रेरक आणि विश्वासाचे फ्लायव्हील म्हणून काम करते जे गुंतवणूकदारांना योग्य साधने आणि अंतर्दृष्टी देऊन सक्षम करते. सिक्युरिटीज मार्केट अंतर्ज्ञानी, सर्वसमावेशक आणि प्रत्येक गुंतवणूकदारासाठी प्रवेशयोग्य असणे आवश्यक आहे. हे आयडीयाथॉन राष्ट्र उभारणीचे तसेच आत्मनिर्भर गुंतवणूकदाराचा दृष्टिकोन भक्कम करण्याची सीडीएसएलची वचनबद्धता प्रतिबिंबित करते. सगळ्या गोष्टींची माहिती असलेला गुंतवणूकदार हा सुरक्षित गुंतवणूकदार आहे, जो त्यांच्या आकांक्षा पूर्ण करणारे निर्णय घेण्यास सक्षम आहेआपले भविष्य घडवण्याच्या या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आम्ही विद्यार्थ्यांना आमंत्रित करतो, असे नेहल व्होरा, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, सीडीएसएल म्हणाले.

आयडीयाथॉनमध्ये नावीन्य आणि सर्जनशीलतेसाठी एकूण ११.५ लाखांचे बक्षीस दिले जाईल. विजेत्या कल्पनेसाठी ५ लाख, उपविजेत्यांना ३ लाख आणि २ लाख तर चौथ्या आणि पाचव्या स्थानासाठी प्रत्येकी ७५,०००, अशी बक्षिसे दिली जातील.

# सोनी सबवर एकेन बाबूची हिंदीत डबिंग केलेली आवृत्ती लॉन्च होण्याअगोदर चाहत्यांना एकेन बाबूचे विश्व कसे आहे याचा संक्षिप्त परिचय देत आहेत

**मुंबई, २२ नोव्हेंबर :** दिनांक २४ नोव्हेंबर रोजी सोनी सब वाहिनीवर एकेन बाबूची हिंदीत डबिंग केलेली आवृत्ती लॉन्च होणार आहे, तर त्या अगोदर सुंबुल तौकीर खान, श्रेनु परीख, करुणा पांडे तसेच या वाहिनीवरील अन्य लोकप्रिय कलाकारांनी या अतरंगी डिटेक्टिव्हचे आगळेवेगळे विश्व कसे आहे याचा संक्षिप्त परिचय आपल्या चाहत्यांना करून दिला आहे.



या प्रसिद्ध बंगाली मालिकेच्या हिंदी टेलिव्हिजनवरील लॉन्चच्या निमित्ताने या कलाकारांनी एका खास एकेन बाबू टूलकिटचे अनावरण केले आणि त्याच्या माध्यमातून आपल्या चाहत्यांना या विक्षिप्त डिटेक्टिव्हच्या जगाची सुंदर झलक दाखवली. आपल्या वैयक्तिक प्रतिक्रिया शेअर करताना सुंबुल, श्रेनु आणि करुणाने प्रेक्षकांना अशा जगात पाऊल टाकण्यासाठी निमंत्रित केले, जेथे एकेन कुणी साचेबंद गुप्तहेर नाही तर एक लोभस, विक्षिप्त सामान्य माणूस आहे- जो चहा आणि झालमुरीचा आस्वाद घेत घेत किंवा आपल्या डायरीत काहीतरी चिरखडून एखादे प्रकरण सोडवून टाकतो. एकेन बाबू सोनी सबवर येणार म्हटल्यावर प्रेक्षकांना ती आपलेपणाची, कुतुहलाची आगळीवेगळी भावना जाणवू लागली आहे.

'गणेश कार्तिकेय' मालिकेत देवी पार्वतीच्या भूमिकेत लोकप्रिय झालेल्या श्रेनु परीखने एकेन बाबूची ओळख त्याच्या साधेपणात आणि तल्लख बुद्धिमत्तेत असल्याचे सांगितले आहे.

इत्ती सी खुशी मालिकेतील भावनिक आणि प्रामाणिक अभिनयाबद्दल कौतुकास पात्र ठरलेली अभिनेत्री सुंबुल तौकीर खान हिने सांगितले की एकेन बाबू कसे डिटेक्टिव्हच्या पारंपरिक प्रतिमेला आव्हान देतो. एरवी अनेक गुन्हेगारी मालिका गंभीर स्वरूपाच्या असतात, पण तिने एकेन बाबूच्या विक्षिप्त आणि खाद्यप्रेमी स्वभावाचा उल्लेख केला आहे.

पुष्पा इम्पॉसिबलमधील शीर्षक भूमिकेत गाजत असलेली अभिनेत्री करुणा पांडेने आपल्या खास मोहक शैलीत एकेन बाबूच्या मोहकतेवर भर दिला आहे.

## राशीभविष्य

**मेष :** तुमच्या कामात प्रगतीच्या संधी तुम्हाला मिळतील. गृहिणींना कामाचा ताण वाढू शकतो. त्यामुळे आरोग्याची काळजी घ्या. जुने आजार पुन्हा उद्भवू शकतात.

**वृषभ :** आजचा दिवस संमिश्र राहील. तुमचे प्रलंबित असलेले सरकारी काम आज पूर्ण होण्याची दाट शक्यता आहे. मीडिया आणि मार्केटिंगशी संबंधित लोकांना त्यांच्या कामात विशेष फायदा मिळेल.

**मिथुन :** गुंतवणुकीच्या योजना सुरू करण्यासाठी आजचा दिवस अत्यंत शुभ आहे. भविष्यात चांगला फायदा मिळेल. अविवाहित लोक आज नवीन नातेसंबंध किंवा मैत्रीची सुरुवात करू शकतात.

**कर्क :** कौटुंबिक बाबींमध्ये बाहेरील व्यक्तीचा हस्तक्षेप होऊ देऊ नका. जुन्या मित्राची भेट फायदेशीर ठरु शकते. आपले वैयक्तिक विचार आणि बाहेरील लोकांसोबत शेअर करणे टाळा.

**सिंह :** कामाच्या ठिकाणी तुमच्या योगदानामुळे तुम्हाला आदर मिळण्याची शक्यता आहे. तुमचे खर्च नियंत्रणात ठेवा. अनावश्यक खर्च करणे टाळा, यामुळे तुमची आर्थिक बाजू मजबूत राहील.

**कन्या :** आजचा दिवस आनंददायी जाईल. वैवाहिक जीवनातील समस्या सुटतील. कुटुंबातील सदस्यांमध्ये आनंददायी वातावरण असेल. मुलांसोबत वेळ घालवल्याने आनंद मिळेल.

**तूळ :** आजचा दिवस तुमच्या बाजूने असेल. तुम्हाला नशिबाची चांगली साथ मिळेल. व्यवसायात अनपेक्षित आर्थिक फायदा होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे तुमची आर्थिक बाजू मजबूत होईल.

**वृश्चिक :** कामाच्या ठिकाणी संयम ठेवा. कोणताही निर्णय घाईत घेऊ नका. तुमच्या मुलाच्या शिक्षणाशी संबंधित असलेल्या समस्या आज सोडवल्या जातील. त्यांना तुमच्या मदतीने प्रगती करता येईल.


**धनु :** आजचा दिवस कौटुंबिक बाबींसाठी शुभ आहे. कौटुंबिक समस्या आपोआपच सुटतील. तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत आनंदाने वेळ घालवाल. धार्मिक कार्यात तुमची आवड वाढेल.

**मकर :** कौटुंबिक स्तरावर असलेले जुने वाद संपू शकतात. ज्यामुळे घरात सौहार्द राहील. कोणालाही अनावश्यक सल्ला देणे टाळा, यामुळे गैरसमज निर्माण होऊ शकतात.

**कुंभ :** नोकरी करणाजया व्यक्तींना त्यांच्या कामाची योग्य दखल घेऊन नवीन जबाबदाजया दिल्या जाऊ शकतात. करिअरमध्ये प्रगती होईल. तणाव निर्माण करणे टाळा आणि शांतता राखा.

**मीन :** आज दिवसभर थोडा आळस जाणवण्याची शक्यता आहे, पण कामावर लक्ष केंद्रित करून तो आळस दूर करा. धार्मिक कार्यात सहभागी झाल्यास मनाला शांती आणि सकारात्मक ऊर्जा मिळेल.

## शब्दकोडे क्रमांक २२७६



**आडवे शब्द :-**
- १) पुष्कळ वेळा
- ४) बासरी
- ६) वीस मणाचे माप
- ७) अश्लील, **** विचकट
- ९) रस्ता, सडक
- १०) धुसफूस जिवाला होणारा त्रास
- १२) गेरू
- १३) चोपडी
- १४) नवरदेव
- १६) बरेवाईट, मागेपुढे करणे, सरसनिरस
- १७) शूर
- १९) छोटी वस्ती
- २०) संतोष, तृप्ती
- २२) बगळा
- २३) सोन्याची साखळी
- २५) दंश
- २६) पैंजण
- २८) भीती
- ३०) क्ष किरण
- ३१) पाकळी, पान
- ३२) मत्सर
- ३३) दावानल
- ३४) मुलायम, मऊ, तलम कापड
- ३६) पुरुष
- ३८) विनय
- ३९) राख
- ४१) मोठी नदी
- ४२) माफ
- ४३) जखमेवर चोपडायचा औषधी प्रकार
- ४४) पृथ्वी
- ४६) लक्ष्मीचे एक नाव
- ४८) मीठ
- ५०) उत्सव
- ५१) वडाचे झाड
- ५८) धाकटा
- ६०) नारळाचे झाड
- ६१) अर्धी ओंजळ
- ६२) रंग बदलणारा प्राणी
- ६४) अर्धवर्तुळाकार
- ६६) तरुण
- ६७) शरीरावर उमटलेली माराची खूण
- ६८) रोखलेली नजर
- ६९) सप्तस्वरातील पहिला स्वर
- ७०) नवा, न वापरलेला
- ७१) पूगीफल
- ७४) एक सुगंधी वनस्पती
- ७६) दिवस
- ७८) सारखा
- ७९) मोठी उथळ वाटी
- ८०) देव आनंदचा एक चित्रपट
- ८१) कमळ
- ८२) कापसाची बी

**उभे शब्द :-**
- १) अवास्तव, गैरवाजवी
- २) बळ, दम
- ३) देणगीपत्र
- ४) गवताचे पान
- ५) पूर्वज
- ६) जमिनीचा मोठा भाग
- ७) हिंमत, धैर्य
- ८) पोथीतील शेवटचा अध्याय
- ११) होडी
- १५) बातमी
- १८) खोडण्याचे साधन
- १९) श्रीविष्णूचे बटु रुप
- २१) संकटसमयी देवाला बोलाविणे
- २४) श्रीमंत, दैववान
- २६) दिल्लीच्या विमानतळाचे नाव
- २७) वल्लरी
- २८) बाराचा समूह (इं.)
- २९) तरुण आणि शूर
- ३१) चिखलाची जमीन
- ३४) अंत:करण
- ३५) (रोगाची) चाहूल
- ३७) रमविणारा, पती
- ४०) खारट पदार्थ
- ४५) दक्षतेचा इशारा
- ४७) खवा
- ४९) बारा महिन्याचा काळ
- ५०) एका मागून एक घातलेले घाव
- ५२) रोखलेली नजर
- ५४) माल, चीज वस्तू
- ५५) मत्स्य
- ५६) बारीक दगड
- ५७) श्वसनेंद्रिय
- ५९) लाजणारा
- ६१) अट, परंतु
- ६३) वस्तुंची यादी
- ६५) मन, मनातील विचार
- ६७) उपवासाचे तांदूळ
- ७२) पर्ण
- ७३) ढोंगी, खोटे खोटे वागणारा
- ७५) मक्केच्या मशिदीतील पवित्र दगड
- ७६) दिवस, घाव
- ७७) आवड, रुची, द्रवपदार्थ
- ७९) पावसाची झड

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# भक्तिमार्ग

## मंगलमय मार्गशीर्ष

**भक्तिभाव जागृत ठेवणारे, उपासनेची प्रेरणा देणारे, या योगे हातून धर्मकृत्य घडवून आणणारे दिवस प्रत्येक महिन्यात असतात. मार्गशीर्षही याला अपवाद नाही. खंडोबाच्या नवरात्रापासून सुरू होणारा हा महिना श्रीकृष्णाच्या अस्तित्वाचे संकेत देतो. चंपाषष्ठी, दत्त जयंती, विवाह पंचमी, मार्गशीर्ष गुरूवार आदी शुभमुहूर्त या महिन्याचं मांगल्य वाढवतात. प्रभूचरणी लीन होण्याची संधी देतात.**



दिवाळीच्या आसपास अवतरणारी थंडी वातावरणाचा नूरच पालटून टाकते. सृष्टीचा स्नानसोहळा उरकून वर्षाऋतू परतलेला असतो. जलाभिषेकानंतर महादेवाची पिंड देखणी दिसावी तसे आता डोंगरकड्यांचे कातळ तुकतुकीत दिसत असतात. धुळीचं नावनिशाण नसणाऱ्या या काळात रस्त्याच्या दुतर्फा फुललेली रानफुलं पांथस्ताचं लक्ष वेधून घेतात. त्यांची पिवळसर, केशरी छटा केशराच्या रानातून प्रवास करत असल्याचा आभास देते. आता शेताशिवारातील धान्य परिपक्व अवस्थेत असतं. त्याचा सुगंध हवेवर तरंगत असतो. कुठे तांदळाच्या साळींचे ढीग लागलेले तर कुठे हरबऱ्याचे घाटे भरलेले, कुठे पक्व पेरुंना चोची मारणाऱ्या पोपटांचे थवे तर कुठे बोरीच्या-आवळ्याच्या झाडांवर दगडं मारणाऱ्या पोरासोरांची टोळकी... आता तर पावसाची रिपरिपही संपली आहे. काही दिवस उन्हाचा अंमल अनुभवल्यानंतर आता साम्राज्य पसरतंय ते गुलाबी थंडीचं. अशा या आल्हाददायक ऋतूत अवतरणारा महिना म्हणजे मार्गशीर्ष...

प्रत्येक महिन्याची काही वैशिष्ट्ये आहेत. या न्यायाने मार्गशीर्ष महिनाही काही खास दिवस घेऊनच अवतरतो. सृष्टीचा देव्हारा सजलेला असताना, शेताशिवारात धनधान्याच्या राशी लागलेल्या असतात, सुगीचे वेध लागलेले असताना तनामनामध्ये पावित्र्य, ईश्वरभक्ती आणि ध्यानधारणेचा मंत्र सांगणारा हा महिना साक्षात प्रभू श्रीकृष्णाच्या अस्तित्वाचं द्योतक आहे. चराचरातील आपल्या अस्तित्वाच्या खाणाखुणा सांगताना महिन्यांमध्ये आपण मार्गशीर्ष मासात असल्याचं प्रभू सांगतात. यावरुन या महिन्याच्या परममांगल्याची पावती मिळते.

या महिन्याची सुरूवात होते तीच खंडोबाच्या नवरात्राने. खरं तर हे षडरात्र. मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा ते मार्गशीर्ष शुद्ध षष्टी या सहा दिवसात खंडोबाचं नवरात्र साजरं होतं. महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील भाविक खंडोबाची मनोभावे आराधना करतात. मार्गशीर्ष शुद्ध षष्टीच्या दिवशी चंपाषष्टीचा कुळधर्म साजरा होतो. याच दिवशी ऋषींच्या विनंतीचा मान राखत खंडोबाने मणी-मल्लाचा वध केला आणि ते लिंगद्वय रुपाने प्रकट झाले असा उल्लेख पुराणांमध्ये आढळतो. हे सहा दिवस खंडोबाचं नवरात्र साजरं होतं. घरोघरी नवरात्र बसतं. ताम्हणात टाक विराजमान होतात. दिवटी-बुधलीच्या प्रकाशात, सकाळ-संध्याकाळी होणाऱ्या आरतीच्या घोषात वातावरण मंगलमय होतं. पाच दिवस उपवास करुन सहाव्या म्हणजेच चंपाषष्ठीच्या दिवशी कुळधर्म केला जातो. घरातील पुरुषमंडळी खंडोबाची तळी उचलत ‘यळकोट यळकोट जय मल्हार’चा जयघोष करतात. भंडारा-खोबरं उधळलं जातं. तो सोनेरी रंग सृष्टीत बहरलेल्या सोनवर्णाशी सलगी करुन जातो. पुरणपोळी, भरीत रोडग्याचा नैवेद्य दाखवून या नवरात्राची सांगता होते. हे नवरात्र बसतं तो दिवस देव दीपावली म्हणूनही साजरा होतो. सामान्यांची दिवाळी साजरी झाल्यावर देवाच्या दारात साजऱ्या होणाऱ्या या दीपावलीच्या निमित्ताने मंदिरांमध्ये आकर्षक रोषणाई केली जाते. देवळांमध्ये दीपोत्सव साजरा होतो. सर्वदूर आनंदाचा प्रकाश फाकतो.

देवदीपावलीच्या दिवशी अनेक ठिकाणी गाय-बैल आदी पाळीव जनावरांना न्हाऊमाखू घालून सजवून, आंबोळ्या, पुरणपोळ्या खाऊ घालतात. कृतज्ञतेचा हा सुंदर सोहळा भारतीय संस्कृतीने आजही जतन केला आहे. उंदीर, कुत्र्यापासून, नाग, गाई-गुरे आदी सर्वांना संस्कृतीत आदरपूर्वक सामावून घेण्याची, त्यांच्या उपयुक्ततेची महती पटवून देण्यासाठी काही खास दिवस सणावाराच्या रुपाने पाळण्याची ही पद्धत विलोभनीय आहे. या परंपरांच्या रूपानं माणसं ऋणानुबंध जपतात. म्हणूनच त्याचं महत्त्व कालातीत आहे. पूर्वी कालगणनेत मार्गशीर्ष महिना पहिला धरून मोजण्याची प्रथा होती. मृगशीर्ष या नक्षत्राला अग्रहायणी किंवा वर्षारंभाचे नक्षत्र मानले जात असे. पूर्वी मार्गशीर्षापासून सुरूवात करून कार्तिकअखेर वर्ष संपे. संध्येमध्येसुद्धा केशवाय नम: हे आद्य नमन मार्गशीर्ष महिन्याची अधिदेवता केशव याच्यासाठी आहे. पूर्वी मार्गशीर्ष महिन्यातली शुद्ध पंचमी ही नागपूजेसाठी वंद्य मानली जात असे. स्नानादी पुण्यकृत्यं करून दानधर्म करून नागाची कृपा संपादन करण्याचा हा दिवस. मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी म्हणजे चंपाषष्ठी, स्कंदषष्ठी हे तिचं दुसरं नाव. या महिन्यात जेजुरीप्रमाणेच अन्य भागांमध्येही जत्रांचं, उरुसांचं आयोजन होतं. गावोगावी जत्रा भरतात. गावदैवताची पूजा-अर्चा होते. त्याला नैवेद्य दाखवला जातो. नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येऊन भक्तीभावाने या जत्रांचा, तेथे भरणाऱ्या बाजाराचा आणि पूजाविधींचा आनंद लुटतात. उत्सवप्रिय भारतीयांसाठी ही एक मोठी पर्वणी असते.

मार्गशीर्ष एकादशी ही मोक्षदा एकादशी म्हणून साजरी होते. या एकादशीचं महात्म्य ‘गीताजंयती’ म्हणूनही काही विशेष आहे. या दिवशी श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतेचा उपदेश केला म्हणून गीताजयंती साजरी होते. भगवदगीता हा असा ग्रंथ आहे ज्यात भारतीय तत्वज्ञान परिपूर्ण तऱ्हेने प्रतिबिंबित झालेलं आहे. ज्ञानयोग, भक्तीयोग, कर्मयोग आदी तऱ्हांनी जगण्याला बळ देणारा हा अमर ग्रंथ असंख्य अभ्यासकांसाठी हजारो वर्षं ‘ज्ञानदीप’ होऊन राहिला आहे.

मार्गशीर्ष पौर्णिमा हा दत्तजन्माचा सोहळा. या पौर्णिमेला मृगनक्षत्रावर सायंकाळी दत्ताचा जन्म झाला. नृसिंह सरस्वतींनी दत्तोपासना सुरू केली असं मानलं जातं परंतु त्यापूर्वीही दत्तदेवतेचे उपासक होतेच. दत्तात्रेयाने एकूण १६ अवतार घेतले. त्रिगुणात्मक त्रैमूर्ती असं त्याचं स्वरूप आहे.

तीन शिरे, सहा हात
तया माझा दंडवत
काखे झोळी, पुढे श्वान,
नित्य जान्हवीचे स्थान
शंखचक्रगदा हाती
पायी खडावा गर्जती
तुका म्हणे दिगंबर
तया माझा नमस्कार

दत्ताच्या मागे एक गाय, आजूबाजूला चार कुत्री आणि एक गाय असं स्वरूप असतं. अर्थात हे प्रतिकात्मक रूप मानलं जातं. गाय ही पृथ्वीची प्रतिनिधी आणि आजूबाजूचे चार कुत्रे हे चार वेद.

त्रिमुखी दत्तात्रयाप्रमाणे एकमुखी, द्विमुखी असंही त्याचं रुप पहायला मिळतं. एकमुखी, दत्तात्रयाला विशेष महत्त्व आहे. योग आणि तंत्र या क्षेत्रात दत्त हा आचार्य मानला जातो. दत्तात्रयाचा वास औदुंबर वृक्षाच्या तळी असतो. दत्तोपासकात औदुंबर पवित्र मानला जातो. औदुंबर वृक्षाखाली गुरूचरित्राचं अनुष्ठान करणारे अनेकजण आहेत. गुरूचरित्राचं पारायण, सायंकाळचं दत्तजन्माचं कीर्तन अशा पद्धतीने दत्तजयंती साजरी होते. औदुंबर, नरसोबाची वाडी, गाणगापूर इत्यादी दत्तक्षेत्रं यात्रांसाठी प्रसिद्ध आहेत. दत्तात्रयाची उपासना महानुभाव, नाथ, वारकरी, समर्थ या चारही संप्रदायात केली जाते. विशेष म्हणजे त्याच्या उपासकात मुस्लिम बांधवही आहेत. धर्म, जातीभेदांना उल्लंघून समन्वयाचं, गुरूतत्वाचं रुपक बनलेला दत्तात्रय हा माणसाच्या विकासाच्या संस्कृतीचं प्रतीक मानला जातो.

मार्गशीर्षातील शुक्ल पंचमी विवाह पंचमी म्हणून ओळखली जाते. शास्त्रामध्ये या दिवसालाही महत्त्व देण्यात आलं आहे. त्रेता युगात याच दिवशी भगवान राम आणि सीतेचा विवाह झाला होता. या घटनेचं स्मरण म्हणून भारत आणि नेपाळमधील विभिन्न मंदिरांमध्ये मोठा समारंभ आयोजित होतो. अनेक देवळांमध्ये विवाहपंचमीचा उत्सव धूमधडाक्यात साजरा होतो. सीतेची जन्मभूमी जनकपूर आणि राम जन्मभूमी अयोद्धा या दोन्ही ठिकाणी तर विवाहपंचमीचा विशेष उत्साह दिसून येतो. या पवित्र दिवशी दोन्ही ठिकाणी रोषणाई केली आहे. लोक राम-सीतेच्या आठवणीमध्ये रंगून जातात. सोहळा साजरा करतात.

तर असा हा थंडीचा, पानझडीचा, पुढे पौषात येणाऱ्या संक्रमणाची चाहूल देणारा, कालगणनेतला एक महत्त्वाचा टप्पा म्हणून भगवंतांनी गौरवलेला महिना. त्याचा आनंद घेऊ या. भक्तीरंगी तल्लीन होऊ या.

भक्ती विशेष

**पंकजा देव**

## जयजयकार सद्‌गुरूंचा

दासबोधातल्या पाचव्या दशकातल्या पहिल्या समासात समर्थ रामदास स्वामी गुरूनिश्चयाचं वर्णन करतात. पहिल्या दशकात ते म्हणतात, जयजयजी सद्‌गुरू पूर्णकामा। परमपुरूषा आत्मयारामा। अनुर्वाच्य तुमचा महिमा। वर्णिला न वचे।।१।। जें वेदांस सांकडे। जे शब्दांसि कानडें। तें सच्छिष्यास रोकडे। अलभ्य लाभे।।२।। जें योगियांचे निजवर्म। जें शंकराचे निजधाम। जें विश्रांतीचे निजविश्राम। परम गुह्य अगाध।३।। तें ब्रह्म तुमचेनि योगे। स्वयें आपणचि होईजे आंगें। दुर्घट संसाराचेनि पांगे।पांगिजेना सर्वथा।।४।। याचा अर्थ असा की, श्री सद्‌गुरू राया तुमचा जयजयकार असो. तुम्ही पूर्णकाम आहात. तुम्ही परमपुरूष, परमेश्वर आहात. भक्तांच्या हृदयात असणारं आत्मस्वरूप आत्मरामही तुम्हीच आहात. तुमचा महिमा अनिर्वचनी आहे. म्हणजे तुमच्या महिम्याचं वर्णन शब्दांमध्ये करता येणार नाही. वेदांनाही तुमचं वर्णन करणं कठीण आहे. ज्याचं वर्णन शब्दांमध्ये करता येत नसल्यानं दुर्बोध आहे अशा आत्मतत्त्वाचा अलभ्य लाभ तोही तुम्ही भक्ताला करून देता. जे योग्यांचं परम रहस्य आहे, जे शंकराचं राहण्याचं ठिकाण आहे, जिथे विश्रांतीला विश्राम मिळतो, असं जे अगाधपरमगुह्य असं ब्रह्म ते तुमच्या कृपेच्या योगानं स्वत:च तदाकार होतं आणि अशा रितीने भक्त ब्रह्मरूप झाला म्हणजे क्लिष्ट अशा संसाराच्या जंजाळात कधीही बद्ध होत नाही. संसाराच्या जबाबदारीने पंगू होत नाही.



ते पुढे म्हणतात,
आतां स्वामिचेनि लडिवाळपणें। गुरूशिष्यांची लक्षणें। सांगिजेती तेणेंप्रमाणें। मुमुक्षें शरण जावें।।५।। गुरू तो सकळांसी ब्राह्मण। जर्‍हीं तो जाला क्रियाहीन। तरी तयासीच शरण। अनन्यभावें असावें।।६।।

म्हणजे वक्त्यांचं हे वचन ऐकून श्रोते त्यांना विनंती करतात की, स्वामींनी आता लडिवाळपणाने गुरूशिष्यांची लक्षणं अशा प्रकारे वर्णन करावी की ती ऐकून मुमुक्षांना तात्काळ सद्‌गुरूला शरण जाता यावं. स्वामीही श्रोत्यांना यासंबंधी मार्गदर्शन करतात. विद्वान, अभ्यासू, व्यासंगी लोकांना गुरूपद द्यावं आणि त्यांच्याकडून ज्ञान मिळवावं, त्यांना शरण जावं असं ते सांगतात.

दासबोधातून...

## सुखी सहजीवनासाठी...

सध्याच्या काळात पती-पत्नींमध्ये सतत वादविवाद होत असतात. अनेकांचं वैवाहिक आयुष्य ताणतणाव, समस्यांनी भरलेलं असतं. पण पती-पत्नींनी एकमेकांच्या भावना आणि वागणं समजून घेतलं तर सहजीवन बऱ्याच अंशी सुरळीत होऊ शकतं. संत तुकारामांच्या या कथेतून आपण हे समजून घेऊया...

संत तुकाराम अत्यंत शांत आणि मृदू स्वभावाचे होते. तर त्यांच्या पत्नी जीजाबाई थोड्या रागीट होत्या. त्या कठोरपणे बोलत असत. संत तुकारामांशी भांडण झाल्यानंतर त्या अपशब्द काढायच्या. कटू बोलायच्या. रागाच्या भरात आपण काय बोलत आहोत, हे जीजाबाईंच्या लक्षात येत नसे. पण तुकाराम महाराज अशा परिस्थितीतही अत्यंत शांत राहात असत. जीजाबाईंना ते काहीही बोलत नसत. संत तुकाराम आणि जीजाबाई यांचं आयुष्य असंच सुरू होतं. पण एके दिवशी घडलेल्या घटनेने जीजाबाईंचं वागणं बदलून गेलं आणि त्या प्रेमाने वागू लागल्या.

स्वमदत



एके दिवशी संत तुकाराम शेतातून ऊस घेऊन येत होते. वाटेत काही आप्तांनी त्यांच्याकडे ऊस मागितला. मृदूभाषी, प्रेमळ स्वभावाच्या तुकारामांनी लागलीच त्यांना ऊस देऊन टाकला. शेवटी त्यांच्याकडे अवघा एक ऊस शिल्लक राहिला. हा ऊस घेऊन ते घरी आले. तुकारामांची आर्थिक स्थिती फारशी चांगली नव्हती. त्यातच त्यादिवशी घरी खायलाही काही नव्हतं. त्यामुळे एक ऊस दिल्यानंतर त्यांच्या पत्नी खूप रागावल्या. हा ऊस त्यांनी तुकारामांच्या पाठीवर मारला. उसाचे दोन तुकडे झाले. अर्थात पत्नीच्या या कृतीवर तुकाराम अजिबात रागवले नाहीत. ते मंद हसले आणि म्हणाले की हे विठ्ठला बरं झालं. या ऊसाचे तूच दोन तुकडे केले. नाही तर मलाच याचे दोन तुकडे करावे लागले असते. हे ऐकून त्यांच्या पत्नीही हसू लागल्या. त्यांचा राग दूर पळून गेला आणि वातावरण आनंदी बनून गेलं.

आपण एखाद्या गोष्टीकडे कसं बघतो यावर राग आणि लोभ अवलंबून असतो. दृष्टीकोन सकारात्मक असेल तर वाईट परिस्थितीतही मनावर नियंत्रण ठेवता येऊ शकतं. यामुळे आपलं आयुष्यही सुंदर आणि आनंदी बनतं.




## पंचायती हनुमान मंदिर

देशभरातल्या लहान-मोठ्या मंदिरांचं स्वत:चं असं महत्त्व आहे. प्रत्येकाच्या स्थापनेमागे एक इतिहास आहे. छत्तीसगडमधल्या बिलासपुर शहरातल्या बजरंगी पंचायत मंदिराचंच बघा. या ठिकाणी बजरंगाची म्हणजे हनुमानाची पंचायत भरते. पंचायतीने घेतलेला निर्णय सर्वांना मान्य असतो. या निर्णयामागे साक्षात हनुमंताची इच्छा आहे, असं भक्तमंडळी मानतात. म्हणूनच पंचक्रोशीतले बहुसंख्य न्यायनिवाडे या मंदिरात होतात. गेल्या ८० वर्षांपासून ही परंपरा सुरू आहे. समस्या छोटी असो किंवा मोठी, निवाड्यासाठी लोक या मंदिरात येतात. इथे भरणाऱ्या पंचायतीसमोर समस्या मांडतात आणि पंचायतीचा निर्णय निमूटपणे मान्यही करतात.

तीर्थक्षेत्र

मंदिराच्या निर्मितीमागील एक कथा सांगितली जाते. ती अशी की, जवळपास ८० वर्षांपूर्वी सुखरू न्हावी नावाच्या भक्ताने पिंपळाच्या पारावर हनुमानाच्या मूर्तीची स्थापना केली होती. त्यानंतर पंचायतीचे सदस्य आणि हनुमान भक्तांच्या मदतीने याठिकाणी मंदिर बांधण्यात आलं. १९८३ मध्ये मंदिर बांधून पूर्ण झालं. तेव्हापासून पंचायतीचे सगळे निर्णय इथेच होतात.

या ठिकाणची सगळी मंगलकार्य हनुमानाच्या आशीर्वादानेच सुरू होतात. नवी नवरी गृहप्रवेशाआधी हनुमानाचा आशीर्वाद घेते. या मंदिराची ख्याती आसपासच्या परिसरात पसरली आहे. त्यामुळे भाविक मोठ्या संख्येने इथे येतात.

## पठण शिव चालीसाचं

इच्छित फळ मिळवण्यासाठी विविध मंत्र, स्तोत्रं म्हटली जातात. स्तोत्र पठणामुळे मन:शांती मिळते. अध्यात्मिक समाधान लाभतं. इष्ट देवतेला प्रसन्न करून घेण्यासाठी त्या देवतेची स्तुती करणारी स्तोत्रं म्हणावी लागतात. भगवान शंकराशी संबंधितही अनेक स्तोत्रं आहेत. या सर्व स्तोत्रांमध्ये शिव चालीसाचं मोठं महत्त्व आहे. शिव चालीसाचं पठण केल्यामुळे घरात आनंद, सुख, समृद्धी आणि शांतता नांदते. सोमवारी स्नान करून शिव चालीसाचं पठण केल्यामुळे मनातल्या सर्व इच्छा पूर्ण होतात. या पठणामुळे शंकर भगवान प्रसन्न होतात आणि भक्तांच्या सगळ्या समस्या दूर करतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. शंकराच्या देवळात बसूनही शिव चालीसा वाचता येतं. शिव चालीसाचं वाचन केल्यामुळे शंकरच नाही तर गणपतीही प्रसन्न होतो.

मंत्रजागर

शिवशंकराची आराधना करणाऱ्या भक्ताला अपमृत्यूचं भय राहत नाही. शिव चालीसा पठणाने मन कणखर बनतं. अडचणींवर मात करण्याची शक्ती मिळते. शिव चालीसामध्ये भगवान शंकराची स्तुती करण्यात आली आहे. यात भगवंताने भक्ताच्या आयुष्यातल्या सगळ्या अडचणी, अडथळे दूर करावे यासाठी करूणा भाकण्यात आली आहे. त्यामुळे भगवान शंकराच्या भक्तांनी शिव चालीसाचं मनोभावे पठण करायला हवं. शिव चालीसा म्हणताना भक्तांनी सगळं लक्ष शंकरावर केंद्र करायला हवं. शंकराची मूर्ती किंवा




फोटो समोर ठेऊन शिव चालीसा म्हणता येईल. शिवपुराणावरून शिव चालीसाची निर्मिती करण्यात आली आहे. जीवनातल्या सर्वसाधारण समस्या दूर करायच्या असतील तर दिवसातून एक ते तीन वेळा चालीसाचं पठण करायला हवं. गंभीर समस्या सोडवण्यासाठी चालीसाची नऊ आवर्तनं करता येतील. शिव चालीसा म्हणण्याची पद्धत अत्यंत साधी, सोपी आणि सरळ आहे. शिव चालीसा पठणाची सुरूवात द्वादशी, प्रदोष, त्रयोदशी किंवा मासिक शिवरात्रीपासून करता येईल. शिव चालीसाचं पठण दररोज व्हायला हवं. हे शक्य नसेल तर सोमवारी आणि वर नमूद केलेल्या दिवशी तर पठण व्हावं.

## ही आहेत जीवनमूल्यं

हिंदू धर्मातल्या विविध ग्रंथांमध्ये जगण्यासंबंधीची मूल्यं नमूद करण्यात आली आहेत. या मूल्यांमध्ये जीवनातल्या विविध समस्या सोडवण्याची क्षमता असते. गरूड पुराणातही अशी काही मूल्यं सांगण्यात आली आहेत. त्याविषयी जाणून घेऊ या.

* बरेचदा माणूस विचारांऐवजी भावनांच्या आहारी जातो. पण भावना सावलीसारख्या असतात. त्या कधी साथ सोडतील याची शाश्वती नसते.



* मनुष्याला आकर्षित करणारी जगातली एकमेव गोष्ट म्हणजे प्रेम.

* फुलांमधून दरवळणारा सुगंध वाऱ्याच्या दिशेलाच पसरतो. पण मनुष्याची सत्कर्म आणि सद्‌गुण यांचा सुगंध चारही दिशांना सारखाच पसरतो.

* मनावर ताबा मिळवणं गरजेचं आहे. मन हेच मनुष्याच्या बंधनाचं आणि मोक्षाचं कारण आहे. मनावर ताबा मिळेपर्यंत मनुष्य इंद्रियांचा गुलाम बनून राहतो.

* शरीराचं पालन योग्य प्रकारे करायला हवं. चिंतेमुळे शरीर खंगत जातं.

आत्मबोध

विद्या हाच मनुष्याचा सर्वश्रेष्ठ अलंकार मानला जातो.

* विश्वास हीच प्रेमाची पहिली पायरी आहे. विश्वासातून स्नेह निर्माण होतो. तर अविश्वासामुळे नाती दुंभगतात. म्हणूनच विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न करायला हवा.

* सगळ्या इच्छा-आकांक्षांचा त्याग केलेला, मीपणातून मुक्त झालेला मनुष्य खऱ्या अर्थाने समाधानी आणि शांत जीवन जगू शकतो.

* मनुष्याच्या जीवनात चढ-उतार असतात. प्रत्येक मनुष्याने आयुष्याचं ध्येय ठरवायला हवं. या ध्येयाआड येणाऱ्या सुखदु:खांचा त्याग करून पुढे जायला हवं.

## का लावू नये टिकली?



महिलांच्या सोळा श्रृंगारांपैकी एक म्हणजे कुंकू. पुरुष कपाळावर टिळा लावतात. टिळा किंवा कुंकू कपाळाच्या मध्यभागी लावलं जातं. या स्थानी तिसरा डोळा असतो, असं म्हणतात. कपाळाच्या मध्यभागी टिळा किंवा कुंकू लावल्यामुळे तिसऱ्या डोळ्याचं चक्र कार्यरत होतं आणि आपल्या आसपास सकारात्मक ऊर्जा नांदू लागते. महिलांच्या सोळा श्रृंगारामागे विज्ञान आहे. शरीरातली विविध चक्र कार्यरत करून सकारात्मक ऊर्जेचा संचार राहण्याच्या दृष्टीने ही संकल्पना मांडण्यात आली असावी, असं मानलं जातं. आजकाल महिला कुंकवाऐवजी टिकली लावतात. पण ही टिकली धार्मिक कार्यांमध्ये बाधा आणू शकते. त्यामुळे टिकलीऐवजी कुंकू लावणं योग्य ठरतं. याविषयी जाणून घेऊ या...

* कुंकू दोन भुवयांच्या मधोमध म्हणजे तिसऱ्या डोळ्याच्या चक्रावर लावलं जातं. तिसऱ्या डोळ्याच्या चक्रासोबतच या स्थानी आज्ञा चक्रही असतं. म्हणूनच हे स्थान शरीराचा अत्यंत महत्त्वाचा भाग मानलं जातं. हे स्थान ईडा, पिंगळा आणि सुशूमना या तीन नाड्यांचा छेदबिंदू मानलं जातं.

* ज्ञानेंद्रिय विश्वाच्या अफाट शक्तीशी जोडली जातात आणि माणूस समाधीस्थ होतो तेव्हा याच स्थानाद्वारे मेंदू स्थितीवर नियंत्रण ठेवतो. त्यामुळे या स्थानालगत कोणताही अडथळा असू नये. हे स्थान मोकळं असायला हवं. तिथे टिकली चिकटवू नये.



* दररोजच्या पूजनादरम्यान किंवा विशिष्ट धार्मिक कार्यादरम्यान कुंकवाऐवजी टिकली लावली तर या चक्राच्या कार्यात अडथळा निर्माण झाल्याने स्वत:मधल्या अफाट शक्तीची जाणीव करून देणाऱ्या विश्वाच्या किंवा ब्रह्मांडाच्या शक्तीशी आपण जोडले जात नाही.

जाणून घ्या

* काही लोक यज्ञ किंवा इतर धार्मिक कार्यादरम्यान निद्रेच्या स्थितीत जातात. यज्ञ, होमहवनाच्या सानिध्यात असणाऱ्या व्यक्तीची सगळी चक्र कार्यरत होतात आणि तिसऱ्या डोळ्याचा बिंदू जागृतावस्थेत यायला सुरूवात होते. कुंकवामुळे जागृतावस्थेत येण्याची ही प्रकिया अधिक जलद गतीने होते तर टिकलीमुळे या प्रक्रियेत अडथळे येतात आणि आपल्याला अपेक्षित अनुभूती मिळत नाही. म्हणून शुभकार्यावेळी टिकली लावू नये.

### संत्रा : स्पेन, इस्त्रायल-व्हाया विदर्भ पुस्तक शेतकऱ्यांसाठी ठरेल मार्गदर्शक : नितीन गडकरी

# तुलनात्मक अभ्यासावर आधारित पुस्तकाचे प्रकाशन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :

संत्रा : स्पेन, इस्त्रायल-व्हाया विदर्भ हे पुस्तक संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल. या पुस्तकाच्या मदतीने नव्या प्रयोगांची तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराची प्रेरणा शेकऱ्यांना मिळेल, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या पुस्तकाचे प्रकाशन गडकरी यांच्या हस्ते ॲग्रोव्हिजन प्रदर्शनात झाले. यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, भाजपचे जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) आनंदराव राऊत, माजी आमदार सुधीर पारवे, जयकुमार वर्मा, सतीश शिंदे, सुधीर दिवे, डॉ. विवेक भोईटे, अरविंद गजभिये, श्रीधर ठाकरे, मोरेश्वर वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



नितीन गडकरी म्हणाले, या पुस्तकात इस्त्रायल, स्पेन आणि विदभार्तील पारंपरिक संत्रा लागवडीबाबत अभ्यासकांनी तुलनात्मक निरीक्षण मांडले आहे. काही महिन्यांपूर्वी विदभार्तील ४० संत्रा उत्पादकांची टीम स्पेन येथील व्हॅलेन्शिया संत्रा लागवडीचा अभ्यास करण्यासाठी गेली होती. मी स्वतः या शेतकऱ्यांसोबत दौऱ्यावर होतो. व्हॅलेन्शिया येथील संत्रा लागवडीची पद्धत, येथील नर्सरी, पॅकेजिंग, ब्रँडिंग, मार्केटिंग इतर अनेक गोष्टींची इत्तंभुत माहिती आम्ही घेतली.

स्पेनवरून आल्यानंतर आम्ही संत्रा उत्पादकांची एक कार्यशाळा देखील नागपुरात घेतली. यामध्ये जवळपास चारशे संत्रा उत्पादक सहभागी झाले होते. या कार्यशाळेचा उत्तम परिणाम झाला. त्यानंतर इस्त्रायल, स्पेन आणि विदर्भातील पारंपरिक संत्रा लागवडीच्या संदर्भात तंत्रशुद्ध निरीक्षण मांडणारी माहिती पुस्तकाच्या रुपात यावी अशी कल्पना होती. त्यानुसार हे पुस्तक आज शेतकऱ्यांच्या हाती देताना आनंद होत आहे, असेही नितीन गडकरी म्हणाले.

टँगो संत्रा, नागपुरी संत्र्याची निर्यात क्षमता, इंडो-इस्त्रायल संत्रा लागवड, संत्रा उत्पादनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा चा वापर, हवामान बदलाचे परिणाम, फळ व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, हार्वेस्टिंग, प्रोसेसिंग, मार्केटिंग, छाटणीचे तंत्रज्ञान याची माहिती एका पुस्तकात मिळावी, अशी इच्छा होती. त्यानुसार या पुस्तकात आम्ही स्पेन, इस्त्रायल आणि विदर्भातील संत्रा लागवडीचे सध्याचे चित्र मांडले आहेच. शिवाय कोणत्या नव्या बदलांची गरज आहे, हे सांगताना एआयचा कसा फायदा होऊ शकतो हे देखील तांत्रिक निकषांचा आधार घेऊन मांडले आहे. त्याचवेळी वाशीमसारख्या आकांक्षी (अस्पायरन्ट) जिल्ह्यासह वऱ्हाडात संत्रा उत्पादकांनी केलेले यशस्वी प्रयोग देखील यात आहेत, असे नितीन गडकरी म्हणाले. नितीन कुळकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या पुस्तकाचे संकलन-संपादन नितीन नायगांवकर यांनी केले आहे. गडकरी यांचे सहायक खासगी सचिव डॉ. प्रवीण भालेराव यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले आहे. नितीन कुळकर्णी यांनी संपादकीय समन्वयाची भूमिका पार पाडली. पुस्तकाचे मुखपृष्ठ, सजावट व मांडणी राजेंद्र क्षीरसागर यांची आहे.

**या अभ्यासकांचे योगदान**

संत्रा : स्पेन, इस्त्रायल- व्हाया विदर्भ या पुस्तकामध्ये नितीन गडकरी यांचा टँगो संत्रा : वैदर्भीय शेतकऱ्यांसाठी वरदान हा लेख आहे. याशिवाय डॉ. सी. डी. मायी, विलास शिंदे, डॉ. डी.एम. पंचभाई, डॉ. विवेक भोईटे, डॉ. प्रवीण भालेराव, विशाल लंगोटे, राकेश मानकर, डॉ. गोपाल भक्ते, नवीनकुमार पेठे, डॉ. सुधीर भोंगळे, विनोद इंगोले, गोपाल हागे, नितीन कुळकर्णी, मनोज जवंजाळ, डॉ. विनोद राऊत, सचिन कुळकर्णी यांच्या लेखांचा समावेश आहे.

# काँग्रेसची अवस्था चिंताजनक

### पक्ष दिवसेंदिवस कोसळतोय : चंद्रशेखर बावनकुळे



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :

काँग्रेसमध्ये कुणीही- कुणाला सहन करायला तयार नाही.त्यामुळे काँग्रेस पक्ष रोज कमजोर होत आहे, त्यांचे कार्यकर्ते रोज भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. नेत्यांमध्ये समन्वय दिसून येत नाही. असमन्वय असल्याने नेत्यांना कार्यकर्त्यांना सांभाळायला कुणी तयार नाही. त्यामुळे अस्वस्थ कार्यकर्ते रोज भाजपमध्ये प्रवेश करत आहेत, असे भाजपचे नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. यशोमती ठाकूर या यातूनच अस्वस्थ होत बोलल्या असतील असे बावनकुळे यांनी म्हटले आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, उबाठाच्या मुखपत्रात काय लिहून येते ते गांभीर्याने घेण्याची काही गरज नाही. अस्वस्थ लोक तिथे लिहितात त्यामुळे त्यांची काही काळजी करण्याचे काम नाही.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बंधू जे बिनविरोध निवडून आले आहेत. ते सृजन, सांस्कृतिक, धार्मिक कार्यामधील चांगले नेतृत्व आहे. तिथल्या संपूर्ण जनतेने त्यांच्या निवडीला मान्यता दिली आहे.आता आल्हाद कलोती यांच्याकडून अपेक्षा आहे तिथे आम्ही पर्यटनाचा एक प्रकल्प करतो आहे त्यांनी तिथे मोठे डेव्हलपमेंट करावी अशी आम्हाला अपेक्षा आहे. म्हणून जनतेने त्यांना अविरोध निवडून दिले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, जनतेला भाजप आणि महायुतीवर विश्वास आहे. देवेंद्र फडणवीस यांचे सरकार हे विकासाचा विषय घेऊन काम करत आहे. डबल इंजिन सरकारला जनतेची गरज आहे, जनता आमच्या मागे उभी आहे.मोदी-देवेंद्र फडणवीस हेच विकास करु शकतात ही जनतेची भावना आहे, म्हणून महायुतीचे उमेदवार विजयी होत आहे. ५१ टक्के मते आम्हाला मिळणार आहे. काही ठिकाणी महायुती नाही तिथे आम्ही एकटे लढू पण महायुतीमध्ये मत अन मनभेद होणार नाही यांची काळजी घेऊ. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, कॅन्सर ग्रस्त रुग्णांसाठी काम करणाऱ्यांना महसूलच्या जागा देण्याचा आमचा विचार आहे. रुग्णांसाठी काम करणाऱ्या संस्थांना मजबूती मिळाली तर त्या अधिक रुग्णांसाठी त्या काम करू शकतील. रुग्ण सेवा आरोग्य सेवा हे सरकारचे ब्रीद आहे म्हणूनच आम्ही जागा देण्याचा निर्णय केला आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसने जर मनसेसोबत युती केली असती तर बिहारमधील मतदारांनी काँग्रेसला मतदान केले नसते, म्हणून मनसेच्या मुद्द्यावर काँग्रेसने मनसे नको अशी भूमिका घेतली, हे सर्व जाणीवपूर्वक घेतली. उद्धव ठाकरे-राज ठाकरे युतीच्या चर्चा सुरू असल्याने काँग्रेसला पर्याय नसल्याने ते सोयीचे वक्तव्य करत आहेत.

# शिंदेसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २२ :

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या शिंदे गटा कडून राज्यातील जिल्हा संपर्क प्रमुखांची आज घोषणा करण्यात आली. बुलढाणा शिवसेना संपर्कप्रमुख पदी माजी खासदार तथा विधान परिषद आमदार हेमंत पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



बुलढाण्यात हेमंत पाटील यांची नियुक्ती

नगर पंचायत, नगर परिषदा आणि आगामी जिल्हा परिषदा व महापालिका निवडणुकीत भक्कमपणे लढण्यासाठी जिल्हा संपर्क प्रमुखपदी पक्षातील ज्येष्ठ नेते, खासदार आणि आमदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणूक कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत संपर्क प्रमुखांनी जिल्ह्यातच थांबावे, असे स्पष्ट निर्देश शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. शिवसेना सचिव संजय मोरेंकडून प्रसिद्धी पत्रक जारी करण्यात आले असून जिल्हा संपर्क प्रमुख पदांची घोषणा करण्यात आली आहे.

बुलढाणामध्ये हेमंत पाटील, नागपूर ग्रामीण आणि नागपूर शहरसाठी दिपक सावंत तसेच गडचिरोलीसाठी दिपक सावंत यांच्यासह किरण पांडव यांच्यावर जिल्हा संपर्क प्रमुख पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. भंडारासाठी गोपीकिशन बाजोरिया, अमरावतीसाठी नरेंद्र भोंडेकर, वधार्साठी राजेंद्र साप्ते, यवतमाळमध्ये हेमंत गोडसे, वाशिममध्ये जगदीश गुप्ता, हिंगोलीमध्ये हेमंत पाटील, अकोलामध्ये अभिजित अडसूळ, चंद्रपूर किरण पांडव आणि अहिल्यानगरमध्ये विजय चौघुले यांची जिल्हा संपर्क म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# साकोलीत काँग्रेसच्या 13 पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :

साकोली नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षात मोठी खळबळ उडाली आहे. ठेकेदारांना उमेदवारी दिल्याचा आरोप करत काँग्रेसच्या १३ पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत. हे राजीनामे शहर अध्यक्ष दिलीप मासुरकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले आहेत.

या प्रकारामुळे साकोली शहरातील काँग्रेस पक्षात ठेकेदारीच्या मुद्द्यावरून तीव्र मतभेद निर्माण झाले आहेत. निष्ठावंत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना डावलून ठेकेदारांना उमेदवारी दिल्याने आम्ही सर्वजण एकमताने राजीनामे देत असल्याचे या पदाधिकाऱ्यांनी पत्रात नमूद केले आहे.

एकीकडे काँग्रेसमध्ये हा वाद सुरू असताना, दुसरीकडे साकोलीत 'ठेकेदारी बंद' शपथपत्राची मोहीम जोरात सुरू आहे. नगरपरिषदेत ठेकेदारी आणि कमिशनखोरी कायमची बंद होऊन पारदर्शक व भ्रष्टाचारमुक्त विकास व्हावा, यासाठी जनतेकडून स्टॅम्प पेपरवर शपथपत्र करारनामा करून घेतला जात आहे. 'मी नगरसेवक झाल्यास कोणतीही ठेकेदारी किंवा कमिशनखोरी करणार नाही, आढळल्यास माझ्या पदाचा राजीनामा देऊन गुन्हा दाखल करण्यात यावा,' असे या शपथपत्रात म्हटले आहे.

# ताडोबा व्याघ्रप्रकल्पातून नवेगाव व्याघ्रप्रकल्पात चितळांचे यशस्वी स्थलांतर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :

ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पातून नवेगाव-नागझिरा व्याघ्रप्रकल्पात चितळ स्थलांतर करण्यात येणार आहेत. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात २१ नोव्हेंबरला दहा चितळांचे स्थलांतर करण्यात आले.

नवेगाव-नागझिरा व्याघ्रप्रकल्पात चितळांना सोडण्यासाठी ताडोबातून या चितळांना आधी सुरक्षितरित्या पकडण्यात आले आणि त्यांना आफ्रिकन शैलीतील बोमा संरचनेत ठेवण्यात आले. कोलारा पर्वतरांगातील जामनी कुरण क्षेत्रात या बोमा संरचना बांधण्यात आल्या आहेत. विस्तीर्ण कुरण आणि चितळांची संख्या जास्त असल्याने, जामनी हे बोमा उभारण्यासाठी सर्वात योग्य ठिकाण होते. या उपक्रमाची तयारी गेल्या चार महिन्यांपासून सुरू होती.



बोमा येथून, विशेषतः डिझाइन केलेल्या ट्रान्सलोकेशन वाहनांमध्ये प्राण्यांची वाहतूक करण्यात आली. या वाहनांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, फॉगर्स आणि दुखापती टाळण्यासाठी कुशनिंग आहेत. हालचाली दरम्यान प्राण्यांना लिंगानुसार वेगळे करण्याची परवानगी देण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. या प्रकल्पासाठी विशेषतः दोन वाहने खरेदी करण्यात आली आणि त्यात बदल करण्यात आले. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाच्या गाभा क्षेत्राचे उपसंचालक आनंद रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील चमूने व सहाय्यक वनसंरक्षक विवेक नातू यांच्या सहकार्याने या प्रकल्पाचे काटेकोर नियोजन करण्यात आले. सहाय्यक वनसंरक्षक अनिरुद्ध ढगे, वनपरिक्षेत्र अधिकारी भाविक चिवंडे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल वैद्य यांनीही महत्त्वाचे योगदान दिले. ताडोबाच्या चमुला मध्य प्रदेशातील तज्ज्ञ पथकाने मदत केली. यात वनपरिक्षेत्र अधिकारी डॉ. बलवंत केशवाल,चौधरी, उईके आणि वनपाल भाई यांचा समावेश होता. त्यांना तज्ञ मार्गदर्शन देण्यासाठी बोलावण्यात आले होते.

सध्याचे संवर्धन आणि मानव-वन्यजीव परस्परसंवाद आव्हाने लक्षात घेता अशा सक्रिय व्यवस्थापन उपक्रमांची गरज आहे. महाराष्ट्र वन विभाग भविष्यातही अशा सक्रिय उपाययोजना करत राहील.
**एम.एस. रेड्डी, मुख्य वन्यजीव रक्षक**

# दोन मुख्याध्यापक निलंबित

**जिल्हा परिषद प्रशासनाची कारवाई**

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा , दि. २२ :

बेजबाबदार वागणुकीमुळे शिक्षकी पेशाची बदनामी करणाऱ्या दोन मुख्याध्यापकाना सेवेतून तत्काळ निलंबित करण्यात आले. यामध्ये शाळेत मद्यपान करून प्रार्थनेच्या वेळी धिंगाणा घालणाऱ्या व विध्यार्थ्यांना वृतपत्राच्या रद्दीवर खिचडी खाऊ घालणाऱ्या मुख्याध्यापकांचा समावेश आहे. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या जिल्हा परिषद शाळेतच दारू ढोसून आलेल्या मेहकर तालुक्यातील मोहना बुद्रुक जिल्हा परिषद शाळेचा प्रभारी मुख्याध्यापक धम्मसागर साहेबराव कांबळे व विद्यार्थ्यांना चक्क रद्दी पेपरवर पोषण आहार देणारा बावनबीर येथील मुख्याध्यापक नरहरी टिकार यांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी निलंबित केले. एकाच दिवशी दोन मुख्यापकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याने जिल्ह्याच्या शैक्षणिक वतुर्ळासह जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या दोन्ही मुख्यापकांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी काल दिले होते.

मेहकर तालुक्यातील मोहना बुद्रुक या गावात जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेची पटसंख्या १०७ आहे.शाळेच्या नियमित मुख्याध्यापकाची सप्टेंबर २०२५ मध्ये बदली झाल्याने प्रभारी मुख्याध्यापक म्हणून धम्मसागर साहेबराव कांबळे (वय ४५) हा शिक्षक कार्यभार सांभाळत होता.

विशेष म्हणजे हा शिक्षक मागील दोन वर्षांपासून शाळेमध्येच एका वर्गखोलीत वास्तव्याला होता. दररोज शाळेतच राहणे आणि तेथेच शिकविण्याचे काम करीत होता. याशिवाय तेथेच अधूनमधून दारूही डोसत होता. घटनेच्या दिवशी त्याने कहरच केला. शाळेची नियमित प्रार्थना सुरु असतांना दारू पिऊन शाळेच्या आवारातच धिगाणा घालायला सुरुवात केली. सोबतच त्याने विद्यार्थ्यांसोबत असभ्य वर्तणूक केली. त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला.

# खोलमारा शिवारातील विहिरीत पडलेल्या बिबट्याची सुटका

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. २२ :

वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या मौजा खोलमारा येथील एका शेतकऱ्याच्या विहिरीत पडलेल्या बिबट्याला वनविभागाच्या पथकाने शर्थीचे प्रयत्न करून सुखरूप बाहेर काढले. शनिवारी (दि. २२ नोव्हेंबर) सकाळी ही घटना उघडकीस आली. वनविभागाच्या तत्परतेमुळे बिबट्याला जीवदान मिळाले असून वैद्यकीय तपासणीनंतर त्याला नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले आहे.

या बाबत मिळालेल्या माहितीनुसार नियतक्षेत्र दांडेगाव अंतर्गत येणाऱ्या मौजा खोलमारा येथील शेतकरी ईश्वर भिवाजी डोये यांचे खासगी गट क्रमांक १५ व १६ मध्ये शेत आहे. आज (दि. २२) सकाळी डोये हे आपल्या शेतातील विहिरीवरील विद्युत मोटारपंप सुरू करण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांनी विहिरीत डोकावून पाहिले असता, त्यांना आतमध्ये बिबट्या पडलेला असल्याचे दिसून आले. त्यांनी प्रसंगावधान राखत तात्काळ या घटनेची माहिती वनविभागाला दिली.



माहिती मिळताच लाखांदूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी आपल्या कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. बिबट्याला पाहण्यासाठी गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. कोणताही मानवी-वन्यप्राणी संघर्ष उद्भवू नये, यासाठी वन कर्मचाऱ्यांनी जमावाला नियंत्रित करत सुरक्षिततेच्या सूचना दिल्या.

घटनेचे गांभीर्य ओळखून उपवनसंरक्षक (भंडारा) आणि सहाय्यक वनसंरक्षक (साकोली) यांना माहिती देण्यात आली. त्यानंतर बिबट्याला सुखरूप बाहेर काढण्यासाठी वन्यप्राणी बचाव दल (शीघ्र कृती दल), भंडारा आणि च्या चमुला पाचारण करण्यात आले.

बचाव पथकाने घटनास्थळाची पाहणी करून विहिरीत जाळी सोडून बिबट्याला सुरक्षितरित्या पिंजऱ्यात जेरबंद केले. बिबट्याला बाहेर काढल्यानंतर साकोलीचे पशुधन विकास अधिकारी मेघराज तुलावी यांनी त्याची वैद्यकीय तपासणी केली. बिबट्या शारीरिकदृष्ट्या पूर्णपणे तंदुरुस्त असल्याचा अहवाल मिळताच, त्याला पुन्हा त्याच्या नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले. हे संपूर्ण बचाव कार्य उपवनसंरक्षक (भंडारा) योगेंद्र सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

# विदेशी मद्यासह दोन आरोपी ताब्यात



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २२ :

राज्य उत्पादन शुल्क विभागाने काटोल परिसरात मोठी कारवाई करत मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात बेकायदेशीररीत्या आणण्यात येत असलेला तब्बल ३७३ लिटर विदेशी मद्यसाठा जप्त केला आहे. ही कारवाई २२ नोव्हेंबर रोजी गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली.

राजेश देशमुख, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रसाद सुर्वे, सहआयुक्त (अमल), मुंबई; गणेश पाटील, विभागीय उपआयुक्त, नागपूर विभाग; आणि सुरज कुमार रामोड, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्या सूचनांनुसार ही धडक कारवाई करण्यात आली.

नागपूर विभागातील वनरीक्षक आनंद पर्वार, बालाजी चाळणे, तसेच दुय्यम वनरीक्षक अविनाश तोंडे (वासा तपासणी नाका, सापार, ता. सावनेर, जि. नागपूर) यांनी काटोल पोलीस स्टेशन हद्दीतील गलपुरा ते अंबाडा रोड, मरामाय नगर परिसरात ही कारवाई केली.

गुप्त माहितीवरून MH-३२-अ-२३७२ या संशयित वाहनाची तपासणी करण्यात आली. त्यात मध्यप्रदेश निर्मित व विक्रीस असलेल्या आणि महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या एकूण १०,०७,८३६/- किमतीचा विदेशी दारू साठा आढळून आला. या प्रकरणात आरोपी १. आकाश अजय मोटघरे, रा. वॉर्ड क्र. १४, रामनगर, वर्धा २. जतेंद्रसिंग रणजितसिंग ठाकूर, रा. वॉर्ड क्र. १४, रामनगर, वर्धा ताब्यात घेण्यात आले.

### निवडणुकीत दादागिरी, गुंडगिरी, पैसा व दबावाचा वापर

# विजय वडेट्टीवार यांचा भाजपवर आरोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना गंभीर आरोप केला आहे. दादागिरी, गुंडगिरी, पैसा आणि दबावाचा वापर करून मतदारांना धमक्या देऊन तसेच प्रलोभने दाखवून निवडणुका जिंकल्या जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवारांपासून भाजपच्या नगरसेवकांपर्यंत मतदारांना खुलेआम धमकावले जात आहे, असा दावा वडेट्टीवार यांनी केला. अजित पवारांनी थेट मतदारांना 'मी काय साधू संत नाही. तुम्ही मला मतदान करा, मी तुम्हाला कामे करून देईन' असे सांगितले. 'मी बोललेले सगळं करणार, तुम्ही काट मारली की मी पण काट मारणार' असेही पवार म्हणाले होते, असे वडेट्टीवार यांनी नमूद केले.

याच संदर्भात, जळगावचे मंत्री राणा जगजितसिंह पाटील राजपूत असले तरी सत्तेचा वापर करून ते 'राजपूत भामटा' झाले आहेत. ते मतदारांना खुलेआम धमकावत आहेत, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

सध्या सरकार आणि मंत्र्यांची मनमानी सुरू असून, यापुढे निष्पक्ष आणि पारदर्शी निवडणुका होणे कठीण आहे, अशी चिंता वडेट्टीवार यांनी व्यक्त केली. मात्र, जनतेच्या डोक्यात जेव्हा हे जाईल, तेव्हा जनताच यांचे गाल सुजवेल, असे ते म्हणाले.

पुणे जमीन घोटाळ्यात शीतल तेजवानी यांना व्हीआयपी ट्रिटमेंट मिळणे यात काही नवीन नाही. धन पाहून ट्रिटमेंट मिळत असेल तर न्यायाची अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे. अचानक प्रकरण उजेडात आले म्हणून जमीन वाचली, असेही त्यांनी सांगितले.

स्थानिक पातळीवर अधिकार दिल्यामुळे काही भागांमध्ये मनसेसोबत आघाडी आहे. भाजपला हरवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन लढले पाहिजे, ही शरद पवारांची भूमिका सकारात्मक आहे. या संदर्भात थोडा विचार झाला पाहिजे, अशी आमच्या लोकांची भूमिका असून, चर्चा सुरू असल्याचे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

राहुल गांधींवरील सावरकर बदनामी खटला रद्द करण्याच्या न्यायालयाच्या निर्णयाचे त्यांनी स्वागत केले. जगात गांधी, नेहरू, आंबेडकरांचे नाव आहे. उद्या हे गोडसेलाही महापुरुष म्हणायला सांगतील, अशी टीकाही त्यांनी केली.

सरसंघचालक मोहन भागवत यांनी 'समाज घडवायचा असेल तर हिंदूंनी एकत्र आले पाहिजे आणि एकसंध राहिले पाहिजे, तरच या समाजाची प्रगती होईल' असे विधान केले होते.

यावर वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया दिली की, पहिले ब्राह्मण संस्कृती होती. दोन टक्के लोक देश ताब्यात घेऊ शकत नाहीत हे लक्षात आल्यावर 'हिंदू' शब्द आला हे सर्वांना माहिती आहे. महात्मा फुलेंनी छत्रपती शिवरायांची समाधी शोधली आणि शिवजयंती सुरू केली. त्यानंतर टिळकांनी गणेशोत्सव सुरू केला. यात धार्मिक उद्देश अजिबात नव्हता, तर समाजाला एकत्र आणण्याचा उद्देश होता. गांधींनी काँग्रेस सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवली तेव्हा काही मनुवाद्यांच्या मनात गांधींविषयी राग निर्माण झाला. त्यातून उत्सवांनाही धार्मिक रंग देणे सुरू झाले, असे वडेट्टीवार म्हणाले.